**मे. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांच्या कार्यरत कोराडी औष्णिक प्रकल्पात नविन २ X ६६० मेगावॅट क्षमतेचा कोळशावर आधारित सुपरक्रिटिकल औष्णिक विद्युत प्रकल्प गाव-कोराडी, तालुका-कामठी, जिल्हा-नागपूर, महाराष्ट्र येथे उभारणीच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २९-०५-२०२२ |
| वेळ | : | दुपारी १२.३० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ -<br>मे. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी<br>मर्यादित (महानिर्मिती),<br>कॉन्फरन्स हॉल, जनरेशन कन्स्ट्रक्शन कार्यालय, कोराडी प्रकल्प, तालुका-कामठी,<br>जिल्हा-नागपूर, महाराष्ट्र |

प्रस्तावनाः-

मे. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांच्या कार्यरत कोराडी औष्णिक प्रकल्पात नविन २ X ६६० मेगावॅट क्षमतेचा कोळशावर आधारित सुपरक्रिटिकल औष्णिक विद्युत प्रकल्प गाव-कोराडी, तालुका-कामठी, जिल्हा-नागपूर, महाराष्ट्र येथे उभारणीच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीकरीता म.प्र.नि.मंडळास अर्ज सादर केला. प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर दिनांक २६/०६/२०२० रोजी मान्यता दिलेली आहे.

वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्लीची अधिसूचना दि. १४/०९/२००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरण विषयक मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्पास पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

म.प्र.नि.मंडळ नागपूर व जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने, मा.जिल्हाधिकारी नागपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २९ मे, २०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्लीची अधिसूचना दि. १४/०९/२००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृतपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ नागपूर-१ यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, मुख्य आवृत्ती मराठील व टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक २७-०४-२०२३ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा आयडी नंबर व पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक नागपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांना २१२ लेखी आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

| | |
|---|---|
| १ | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मादाम कामा रस्ता, मुंबई -४०० ०३२ |
| २ | सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३ रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सिने प्लानेटसमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई - ४०० ०२२ |
| ३ | जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर; |
| ४ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदषण नियंत्रण मंडळ. उद्योग भवन, ५ वा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१ |
| ५ | उप प्रादेशिक अधिकारी, नागपूर - १, महाराष्ट्र प्रदषण नियंत्रण मंडळ. उद्योग भवन, ५ वा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१ |
| ६ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन्स, नागपूर |
| ७ | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१ |
| ८ | उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, कामठी, जिल्हा-नागपूर, |
| ९ | तहसीलदार, तहसील कार्यालय-कामठी, तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर, |

| | |
|---|---|
| १० | मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद, कामठी, जिल्हा- नागपूर |
| ११ | सरपंच, ग्राम पंचायत, कोराडी, तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर, |
| १२ | सरपंच, ग्राम पंचायत, लोणीकरी, तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर, |
| १३ | सरपंच, ग्राम पंचायत महादुला, तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर |
| १४ | सरपंच, ग्राम पंचायत सुरादेवी, तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर |
| १५ | सरपंच, ग्राम पंचायत म्हसाळा, तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर |
| १६ | सरपंच, ग्राम पंचायत खैरी, तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर |
| १७ | सरपंच, ग्राम पंचायत, कवठा, तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर |
| १८ | सरपंच, ग्राम पंचायत, बाबूलखेडा, तालुका - कामठी,जिल्हा - नागपूर |
| १९ | सरपंच, ग्राम पंचायत, वारेगाव, तालुका - कामठी,जिल्हा - नागपूर; |
| २० | सरपंच, ग्रामपंचायत, खसाळा,तालुका-कामठी,जिल्हा- नागपूर |
| २१ | सरपंच, ग्राम पंचायत, बीना, तालुका - कामठी, जिल्हा - नागपूर; |
| २२ | क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर ४४० ००१ |

वरिल अनुक्रमांक ०६ ते २२ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करून व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३४/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२३०५०४-एफटीएस-००२४ दिनांक ०४-०५-२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, नागपूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर - सदस्य

३) उप प्रादेशिक अधिकारी,नागपूर-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर - समन्वयक

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत २१७ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री उमाशंकर भादुले, उप प्रादेशिक अधिकारी,नागपूर-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. नागपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा.डॉ.विपीन इटनकर,भाप्रसे, जिल्हादंडाधिकारी, नागपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. नागपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करून जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त, सर्वांसाठी आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात

येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण (व्हिडीओ शुटींग) करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांनी आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तरे देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीका, टिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयक प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना केली.

<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/</u> पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती <u>यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणेः-</u>

टिप:- प्रश्न उत्तराच्या दरम्यान उपस्थित जनतेचे सर्व प्रश्न समितीने प्रथम ऐकुण घेतले व त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकाने सर्व प्रश्नांची उत्तरे दिली.

श्री विशाल मुत्तेमवार, सहसचिव, महाराष्ट्र कॉंग्रेस पक्षः

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण असे म्हणता की महाराष्ट्र राज्याची उर्जेची गरज वाढल्याने महाजेनको हा प्रकल्प हाती घेत आहे. हे मी मान्य करतो. कारण दिवसेंदिवस उर्जेची गरज वाढतच आहे. पण पर्यावरण मुल्याकन अहवालात व आता सादरीकरणात सांगण्यात येते की इतरचे पाच ठिकाणचे १२५० मेगावॅटचे प्रकल्प बंद करुन विस्तारीकरणाचा प्रस्ताव हा फक्त कोराडीमध्ये आहे. म्हणजे महाराष्ट्रातील इतर प्रकल्प बंद होणार, फक्त कोराडी येथे १३२० मेगावॅटचा प्रकल्प प्रस्तावित करत आहोत. हा कुठला न्याय झाला. आपण भुसावळ, परळी, नाशिक येथील प्रकल्प बंद करणार, तर विस्तारिकरण करायचे आहे, तर ते भूसावळला, नाशिकला, परळीला करा. येथे कोराडी व नागपूरलाच विस्तारिकरण कशासाठी करत आहेत | समितीने सांगितले की सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | या प्रकल्पातून फ्लाय ऍश मोठ्या प्रमाणात उत्पन्न होते. त्या फ्लाय ऍशमध्ये मोठ्या प्रमाणात सल्फर-डाय-ऑक्साईड, कार्बन-मोना-ऑक्साईड, कार्बन-डाय-ऑक्साईड हे विषारी वायू हवेत मिसळत असतात. ते कमी करण्यासाठी आपण शमन उपाय (mitigation measures) व फ्लु गॅस प्रकल्प उभारत आहात. या विषारी वायूंमुळे नागपूर व आजूबाजूच्या परिसरातील लोकांचे जीवन धोक्यात जाणार असल्याचे माहित असूनही हा प्रकल्प उभारण्याच घाट कशासाठी घालत आहेत? नागपूरला २,००० मेगावॅटचे उत्पादन होत असून ते निश्चितच | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे ऍश विल्हेवाट शास्त्रीयपध्दतीने होत नाही असा आक्षेप नोंदविण्यात आलेला होता. महाजेनकोचे जे सात प्लँट आहेत, त्यापैकी चारमध्ये १००% राखेची विल्हेवाट लावण्यात येते. तर कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे तेवढे होत नाही. दिनांक ३१-१२-२०२१ च्या अधिसूचनेनुसार ड्राय व पॉंड ऍश अशी विभागणी केलेली आहे. तर कोराडीतील ड्राय ऍश कमी प्रमाणात जात असली, तरी पॉंडमधून जी ऍशचे लिफ्टीग आहे, ते जवळपास ७०-८०% आहे. येथील जे |

| | | |
|---|---|---|
| | पुरेशे आहे. आज नागपूरची लोकसंख्या ही तीस लाखाच्या वर झालेली आहे. म्हणजे विषारी वायू हवेत सोडला जातो, त्यात भर टाकण्याची काय गरज आहे? | वीटभट्टीधारक व छोटे छोटे उद्योग आहेच ज्यांना ॲशची गरज आहे, ते लोक नेत असतात.<br>नविन अधिसूचनेनुसार कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे पाच वर्षांचे टर्म दिलेली आहे. पहिले दोन वर्षे ८०% नंतर १००% टार्गेट राखेची विल्हेवाट लावण्याचे दिलेले आहे. |
| २) | पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे उर्जा प्रकल्पाबाबतचे निर्देश वाचून दाखविले.<br>Cumulative impact of all sources of emissions including handling and transportation of existing and proposed project on the environment of the area shall be assessed in detail.<br>पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे निर्देश आहेत. म्हणजे जो कार्यरत प्रकल्प आहे व जी कोळशाची वाहतुक करतात, त्याचा अस्तित्वात असलेला प्रकल्प व भविष्यात होणा-या प्रकल्पामुळे होणारा परिणाम याचा पूर्ण अभ्यास – Risk Analysis करणे गरजेचे आहे. हे केले आहे का, हे करण्यास आपणास कमीतकमी एक वर्ष लागेल. पर्यावरणावर परिणाम, लोकांच्या आरोग्यावर परिणाम, यामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे का, श्वसनाचे रोग वाढले आहेत का, लोकांच्या घरावर राखेचे थर जमतात का, याचा अभ्यास करायला किमान एक वर्ष लागेल. जर Risk Assessment केले नसेल. तर या प्रकल्पास मान्यता मिळणारच नाही. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, एका एनजीओने तक्रार केली होती की महाजेनकोच्या राखेमुळे परिसरातील पिण्याचे पाण्याचे स्त्रोत, नदी नाले हे बाधित झालेले असून त्यात रेडिओ एकटीव्ह व हेवी मेटल्स ब-याच प्रमाणात आहेत. तेथील रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यानतर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी संयुक्त पाहणी केली, त्यावेळी तक्रारदारांना बरोबर घेतलेले होते. तक्रारदार यांनी सांगितलेल्या जलस्त्रोताचे नमुने, परिसरातील विविध पिण्याचे पाण्याचे स्त्रोत, विहीरी इ. ची पाहणी करुन पाण्याचे नमुने गोळा करण्यात आले. ते एनएबीएल ने मंजूर केलेल्या प्रयोगशाळेत तपासण्यात आले. त्यात कुठेही हेवी मेटल्स व रेडिओ एक्टीव्ह आढळले नाही. त्याचप्रमाणे सर्व मानके ही निर्देशित पातळीत होती.<br>त्याचप्रमाणे महाजेनकोने बीएआरसी कडून एक अहवाल प्राप्त केलेला होता. त्यातही सर्व मानके पाळण्यात येतात असाच अहवाल आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | नविन प्रकल्प हा अत्याधुनिक असून त्यात प्रकल्पाबरोबरच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा, ESP. FGD असणार. भूसावळला असाच अत्याधुनिक प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. तरी नवीन प्रकल्पामुळे प्रदूषणाचा कोणताही त्रास होणार नाही याची ग्वाही देऊ शकतो. |
| ३) | प्रकल्पास लागणा-या पाण्याची गरज, सादरीकरणात दर्शविले की सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रकल्पातील पाण्याची गरज भागविण्यात येईल. तर हा कोराडी प्रकल्प फक्त सांडपाण्यावरच चालू आहे का, याबाबत स्पष्टीकरण करण्यात यावे. आमच्या माहितीप्रमाणे या कोराडी प्रकल्पासाठी पेंच मधून पाणी उपसा करण्यात येत आहे. शिवाय एकूण उपसा केलेल्या पाण्याच्या १५% पाणी हे बॅकअप सोर्स म्हणून ठेवण्यात येणार आहे. म्हणजे नागपूर शहरासाठी जे पिण्याचे पाणी येणार आहे, त्यातील १५% पाणी राखीव ठेवण्यात येणार आहे. हे आपण सादरीकरणात सांगितलेले नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की पेंचच्या पाण्याचा विषय होता. पेंचच्या पाण्याच्या फिगर चुकीच्या आहेत व पुढे सांडपाणी वापरणार नाहीत.<br>भारतातील महाजेनको अशी संस्था आहे की त्यांनी प्रथमतः सांडपाण्यावर प्रकिया करुन त्याचा पुनर्वापर कोराडी व खापरखेडा येथे वापरण्यात येणार आहे. त्यामुळे पेंचचे जे ताजे पाणी उपसा ७०% कमी झालेला आहे. जे ३० % आहे, ते पिण्यासाठी वापरणार आहेत. नविन २ x ६६० आम्ही तेच प्रस्तावित केलेले आहेत.<br>पेंचचे ताजे पाण्याची गरज आम्ही कमी केलेली आहे. पेंचचे पाणी पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी घेण्यात येईल. |
| ४) | भविष्यात नागपूरची लोकसंख्या वाढणार आहे. टँकरने पाणी पुरवावे लागत आहे. २४ x ७ पाणी पुरविण्याची योजना घोषित केलेली होती, पण पाणी मिळतच नाही. नागपूरला कमी मिळणा-या पाण्यात आपण परत वाटा करत आहोत, हे कितपत योग्य आहे. म्हणजे हा प्रकल्प सुरु झाला, तर भविष्यात नागपूरकरांना पिण्याचेही पाणी मिळणार नाही. | पेंचचे ताजे पाण्याची गरज आम्ही कमी केलेली आहे. पेंचचे पाणी पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी घेण्यात येईल. |
| ४) | आपण अहवालात पहिलेच वाक्य लिहिलेले आहे की To meet the increasing power demand and to generate power at cost lower than the | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की गरे पालमाचा कोळसा खाजगी कंपनीचा आहे |

| | | |
|---|---|---|
| | average cost of power generation. तर १३२०.० मेगावॅट साठी जो कोळसा लागेल, तो आपण गरे पालमा - II कोल माईन, छतीसगड, ही खाण आपणास वाटप करण्यात आलेली आहे, तेथून आपण रेल्वे रॅकमधून आणणार आहात. छतीसगडहून कोळसा आणणार, विशिष्ट व्यक्तीच्या कोल व्रॉशरीत तो धुण्यासाठी पाठवणार, धुतल्यानंतर या प्रकल्पास देणार. त्याने पॉवर कॉस्ट कमी होणार आहे का. छतीसगडहून आणण्याचा खर्च, कोल वॉशरीत धुण्याच खर्च, त्यात २५% तो कोळसा घेतो. म्हणजे फक्त ७५% मिळतो, तर उर्जा निर्मितीचा खर्च वाढणार नाही का? मग आपण कमी किंमतीत वीजनिर्मिती कशी करणार? तर छतीसगडच्या ज्या खाणीचे वाटप झालेले आहे, तेथेच आपण प्रकल्प का सुरु करत नाही? तेथून आपण वीजनिर्मिती करुन त्याचे तेथून वितरण करावे, म्हणजे वाहतुकीचा खर्च वाचेल. | WCL चा न आणता सुमारे ६०० कि.मी. लांबून खाजगी कंपनीचा घेण्यात येतो असा आक्षेप नोंदविण्यात आलेला होता. त्यांनी सांगितले की गरे पालमा ही आम्हांला अलॉट झालेली असून ती भारतातील एक मोठी खाण आहे. पिक इयर्समध्ये कोळसा उपलब्ध होणार आहे. ती कोणत्याही खाजगी कंपनीची नसून महाजेनकोची स्वतःची आहे. नियमानुसार थर्ड पार्टीला कोळसा काढून देणे एवढे काम दिलेले आहे. मालकी हक्क हा महाजेनकोचा आहे. पूर्ण क्षमतेने प्रकल्प चालविण्यासाठी लागणार कोळसा पूर्णक्षमतेने अजूनही मिळत नाही. भविष्यात एखादे कोळशाच्या बाबत संकट/न मिळणे असा प्रसंग आल्यास या खाणीमुळे आम्ही तो सोडवू शकतो. |
| ५) | या सगळ्यांचा विचार करुन महाजेनकोने कोणाच्याही दबावाखाली न येता, कुठल्याही मोठ्या उद्योगाच्या दबावाखाली न येता, नागपूर शहर व जिल्ह्याचा विचार करुन पाण्याची टंचाई, आरोग्य, प्रदूषण, , पुढील पिढ्यांचा विचार करुन हा प्रकल्प येऊ देऊ नये. अन्यथा, पुढील पिढी तुम्हांला माफ करणार नाही. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

१) **श्री विकास ठाकरे, मा. आमदार, पश्चिम नागपूर विधानसभाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे महाजेनकोची नविन प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. मात्र कार्यरत प्रकल्पात प्रदूषणाबाबतचे काही प्रश्न | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, याचे उत्तर देण्यात आलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | निश्चितच आहेत, कारण गेल्या अधिवेशनात ब-याच आमदारांनी या कार्यरत प्रकल्पाबाबत तक्रारी नोंदविलेल्या आहेत. प्रकल्पात उत्पन्न् होणारी फ्लाय अँशची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लावत नाही असा आरोप होता. ती राख कोलार मार्गे कन्हान येथे पिण्याच्या पाण्यात मिसळते, शेतक-यांच्या शेतात पडते, या भागातील पर्यावरणवाद्यांच्या तक्रारीमुळे याबाबत चर्चा झालेली आहे. म्हणजे जो प्रकल्प कार्यान्वित आहे, त्याबाबत अनेकांच्या तक्रारी आहेत, कारण या कार्यरत प्रकल्पामुळे पर्यावरणास धोका आहे, हे सिध्द झालेले आहे. नविन प्रकल्पामुळे पर्यावरणास धोका आहे. मात्र हा भार आमच्या व आमच्याच जिल्ह्यावर आहे. हा प्रदूषणाचा भार नागपूरने व विदर्भानेच का सहन करायचा? लोड शेडिंग नागपूर, विदर्भालाच आहे, मुंबईत नाही. | बैठकीत एका उपस्थितांनी आक्षेप नोंदविला होता की येथील ऍश मुंबईला रेल्वेव्दारे नेणार असाल तर तेथेही प्रदूषण होईल. याचा खर्च स्थानिक लोकांवर लादला जाईल. याबाबत महाजेनको यांनी पेपरात जाहिरात दिलेली होती, जरी प्रथम वेळेस त्याचा प्रतिसाद समाधानकारक नव्हता, तरी नविन अधिसूचनेनंतर जेथे ऍश वापरली जाते, तेथे ती मिळण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. ऍश कमी पडत असल्याने राख विकत घेणा-या ब-याच संस्था महाजेनकोशी संपर्कात आहेत. कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथील राखेस मागणी आहे, कारण संबंधित व्यक्ती/संस्था यांच्याकडून राखेसाठी विचारणा सुरवात झाली. त्यांनी सांगितले ऍश मागणी असलेल्या क्षेत्रात पुणे, मुंबई, नाशिक येथे रेल्वेने स्वखर्चाने नेतो. पण महाजेनकोतर्फे काही मदत झाल्यास ते नक्कीच सुरु करु शकतो. महाजेनकोने याबाबत असे ठरविले की जी कोरडी ऍश आहे, ती उपलब्ध करण्यात यावी,त्यासाठी लागणारा खर्च ऍश उचलणाऱ्यांना देण्यात यावा. त्यामुळे अनेक व्यक्ती/संस्था महाजेनकोच्या संपर्कात आहेत. महाजेनको निश्चितपणे सांगते की येत्या एक-दोन वर्षात कोरड्या राखेचे वापराचे प्रमाण निश्चितच वाढेल. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांनी दिलेले निर्देश (टारगेट) हे निश्चितपणे पूर्ण करु शकू. |
| २) | जर आम्हांला प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागणार आहे, तर कार्यरत प्रकल्पामुळे येथील शेतकरी हवालदिल आहेत काय, येथील लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम झालेला आहे का, | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे ऍश विल्हेवाट शास्त्रीयपध्दतीने होत नाही असा |

| | | |
|---|---|---|
| | प्रदूषणाची पातळी किती आहे, याचा अहवाल आपण सादर करावा. नंतरच प्रकल्पास सुरवात करावी ही मागणी | आक्षेप नोंदविण्यात आलेला होता. महाजेनकोचे जे सात प्लँट आहेत, त्यापैकी चारमध्ये १००% राखेची विल्हेवाट लावण्यात येते. तर कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे तेवढे होत नाही. दिनांक ३१-१२-२०२१ च्या नविन अधिसूचनेनुसार कोरडी ऍंश व पॉड ऍंश अशी विभागणी केलेली आहे. तर कोराडीला ड्राय ऍंश कमी प्रमाणात जात असली, तरी पॉडमधून जी ऍंशचे लिफ्टीग आहे, ते जवळपास ७०-८०% आहे. येथील जे वीटभट्टीधारक व छोटे छोटे उद्योग आहेत ज्यांना ऍंशची गरज आहे, ते घेऊन जातात.<br>नविन अधिसूचनेनुसार कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे पाच वर्षांचे टर्म दिलेली आहे. पहिले दोन वर्षे ८०% नंतर १००% टार्गेट दिलेले आहे. |

<u>३)श्री संदेश सिंगलकर,महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी सेक्रेटरीः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश आखून दिलेले आहेत. त्या निर्देशांचे संपूर्णपणे उल्लंघन येथे करण्यात आलेले आहे. त्यामुळे ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.<br>त्यात महत्वाचा प्रश्न म्हणजे दिनांक ९ जून, २०२१ ला श्री ए.के. अग्रवालसाहेब यांचे पत्र आहे. कोविडकाळात जनसुनावणी कशी घ्यायची याबाबत स्पष्ट निर्देश आहेत. त्यानंतर कुठलेही निर्देश पारित झालेले नाहीत.<br>पुढील मुद्दा Appendix 5 नुसार आपण जनसुनावणी आयोजित करण्याची पध्दत पाहतो, | समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या २००६ च्या अधिसूचनेनुसार ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. कोविड काळातील निर्देशांनुसार येथील प्रत्यक्ष जनसुनावणीबरोबरच ऑनलाईन जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | तर त्या निर्देशांनुसार येथे काहीही पाळले गेलेले नाही. | |
| २) | कार्यरत प्रकल्पात कधिच जनसुनावणी घेतली जात नाही. येते प्रकल्प कार्यरत आहे. तर येथे जनसुनावणी कशी आयोजित करण्यात आलेली आहे? जनसुनावणी आतापर्यंतच्या उद्योग भवनला झालेल्या आहेत. तर अशी काय परिस्थिती झाली की ही जनसुनावणी या प्रचंड उष्माघातात दुपारच्या १२.३० च्या सुमारास कोराडी येथील प्रकल्पात घ्यावी लागते | समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या २००६ च्या अधिसूचनेनुसार प्रकल्प स्थानावर जनसुनावणी घेणे बधनकारक आहे. |
| ३) | पुढील मुद्दा पंचायत युनियनला या जनसुनावणीची आगाऊ माहिती देणे आवश्यक होते. त्या नियमांचे उल्लंघन झालेले आहे.<br>पुढील मुद्दा - आपण NMC, NMRDA, NIT यांना ईआयएची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, हे तुमच्याच पत्रात दिलेले आहे. फक्त तीन संस्थानाच आपण अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे. | समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या २००६ च्या अधिसूचनेनुसार सर्व अधिसूचित शासकीय विभाग, प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील सर्व ग्रामपंचायती यांना प्रकल्पाचा सर्व दस्तावेज सादर करण्यात आलेला आहे. |
| ४) | पुढील मुद्दा - रेडिओवर व टि.व्ही. वर जाहिरात द्यावी लागते. ती देण्यात आलेली नाही. यात Appendix 5 -iii चा मुद्दा आहे की येथे untoward emergency situation , विदर्भातला हा भाग येतो. अशा वेळेस दुपारी १२.३० वाजता कोराडी येथे ही जनसुनावणी कशा घेण्यात येत आहे, हा महत्वाचा प्रश्न आहे.<br>म्हणजे येते जनसुनावणी आयोजित करण्याचे संपूर्णपणे उल्लंघन केलेले आहे.<br>तरी ही जनसुनावणी थांबविण्यात यावी. | समन्वयक यांनी उत्तर दिले की २००६ त्या अधिसूचनेतील सर् निर्देश पाळणयात आलेले असून ज्यांना प्रकल्प स्थानावर येणे शक्य नाही, त्यांच्यासाठी ऑनलाईन सुध्दा आयोजित करण्यात आलेली आहे. वरिल अनुक्रमांक ०६ ते २२ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. |

<u>४)श्री सचिन मानवटकर, कोराडी प्रकल्पग्रस्त शेतक-याचा मुलगा, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वीज अधिकारी व कर्मचारी फोरम, अध्यक्ष, कोराडी पॉवर शाखा, कॉंग्रेस पक्ष कार्यकर्ताः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी एकच मागणी आहे की आमच्या घरावर दररोज प्रकल्पाच्या चिमणीतून सोडलेली राख पडलेली असते. माझा काका एमएसईबीत नोकरीस होता, तो पोटाच्या कॅन्सरने मरण पावला. त्याच्या कॅन्सरचे कारण राख डॉक्टरने सांगितले. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. याबाबत कार्यवाही करण्यास प्रकल्पास सांगण्यात येईल. |

५) <u>श्री मोरेश्वर उर्फ बंडू कापसे,राहणार-खैरी गाव, कोराडी सर्कल, तालुका-कामठी, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खैरी गावाची जमिन, वारेगाव, सुरादेवी अनेक ठिकाणची हजारो हेक्टर जमिन ३०-४० वर्षांपासून या प्रकल्पास देण्यात आलेली आहे. शिवाय येथील अनेक एकर जमिनी अधिग्रहित झालेल्या आहेत. प्रदूषणाचा विचार केला तर प्रदूषण नियंत्रण मंडळाने गावागावात जाऊन पाणी चांगले आहे की नाही ह्यावर लक्ष दिलेले आहे. . चाळीस वर्षांपूर्वी आमच्या स्थानिक शेतक-यांच्या जमिनी घेण्यात आल्या, तरीही निकामी झालेले दोन्हीही संच याठिकाणीच लावण्यात यावेत. दुसरीकडे नेऊ नयेत. कारण दुसरीकडेही शेतक-यांची जमिन अधिगृहित करुन शेतक-याचे नुकसान करु नये. या सर्कलमध्ये १४-१५ गावे येतात. येथे बरेच बेरोजगार आहेत. त्यांना रोजगाराची गरज आहे. तरी दोन्ही संच येथे लावण्यात यावेत. त्याचप्रमाणे प्रकल्पात प्रदूषण नियंत्रणासाठी आता उपलब्ध असलेली अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

६) <u>श्री राजेश रंगारी, नगराध्यक्ष, नगरपरिषद, महादुला, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी महादुला नगरपंचायतीच्या वतीने या प्रकल्पास जाहिर पाठिंबा घोषित करत आहे. आमच्याकडे जमिन आहे, कोळसा आहे, रेल्वे ट्रॅक आहे. येथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. येथे उपस्थितांनी त्यांच्या घरावर राख जमा होते याबाबत तक्रार केलेली आहे. काहींनी आरोग्याबाबत तक्रारी उपस्थित केलेल्या आहेत. मात्र हा अत्याधुनिक सुपरक्रिटिकल औष्णिक विद्युत प्रकल्प आहे. या पॉवर प्रकल्पाने सर्व पर्यावरणाची दक्षता घेतलेली आहे. या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि मिळणार आहे. येथील स्थानिकांचे जीवनमान सुधारणार आहे. येथे नागपूर जिल्ह्यात बाजारपेठ उपलब्ध आहे. येथील बेरोजगाराला नोकरी मिळेल. तरी या दोन्ही संच प्रकल्पात मंजूरी द्यावी, अशी आमच्या सर्व तेरा ग्रामपंचायतीने या प्रकल्पास पाठिंबा दिलेल्याचे घोषित करत आहे. लेखी निवेदन सादर करत आहे. तरी या प्रकल्पास मंजूरी देण्याची मी विनंती करत आहे | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

७) <u>श्री अहमद कादर, केंद्रीय महासचिव, नाग विदर्भ आंदोलन समितीः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | हा प्रकल्प यावा का येऊ नये हा येथे विषय नाही. तर मी येथे वेगळाच विषय मांडत आहे. बुटीबोरी, मिहान येथे प्रकल्प येत होते. विदर्भातील जे पालक आहेत, ते आपल्या | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | वैयक्तिक इच्छा आकांक्षा विसरुन मुलांना शिकवितात आणि आशा करतात की जेणेकरुन येथे आपल्या मुलांना नोकरी मिळेल. मात्र विदर्भातील मुलांनी नोकरी मिळत नाही. येथे पोलिस खात्यात पहा -येथे मुंबई-पुणे, पश्चिम महाराष्ट्रातील मुलांना विदर्भात नोकरी मिळते. तरी मी शासनास विचारतो की आम्ही येथील प्रदूषण सहन करायचे, मग प्रकल्प सुरु झाल्यानंतर आपल्या कोराडी, खापरखेडा येथील मुलांना नोकरी मिळेल याची काय हमी आहे? तरी येथील स्थानिक मुलांना नोकरी देण्यात येईल हे लेखीस्वरुपात हमी द्यायला पाहिजे. खापरखेडा, कोराडी, महादुला येथील मुलांसाठी कमीतकमी २०% जागा राखीव पाहिजेत. स्थानिक मुला-मुलींना रोजगार देण्यात येईल याचीच हमी शासन व कंपनी प्रशासनाकडून देण्यात यावी. | |

८) **<u>श्री मलिकार्जुन रेड्डी, माजी आमदार,भारतीय जनता पार्टी, रामटेक विधानसभाः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जर उपरोक्त नविन प्रकल्प २ X ६६० मेगावॅट विद्युत प्रकल्प जर पर्यावरण निकषामध्ये कोराडीला बसत नसेल, तर येथून १० कि.मी. अंतरावर सदरहू प्रकल्प अंशतः चालू करण्यात यावा. कारण मध्य भारतात नागपूर हे स्मार्ट सिटीमध्ये आलेले आहे. स्मार्ट सिटीच्या निकषामध्ये आपण मागे पडत आहे. जर नागपूर स्मार्ट सिटी करावयाची असेल, तर पर्यावरणाच्या निकषामध्ये नविन प्रकल्प हा बसला पाहिजे. जर सदरहू प्रकल्प बसत नसेल, तर महाजेनकोने नांदगांव जेथे राख टाकण्यासाठी ७०० एकर जमिन अधिग्रहित केलेली आहे. ती | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, प्रक्रल्पातील राखेचे शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाटीबाबत माहिती सांगण्यात आलेली आहे. इतर सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | जमिन अधिग्रहित केल्याने तेथे पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. शेतक-यांनी अनेकवेळा तक्रारी केलेल्या आहेत. तेथे महाजेनकोने खाजगी कोल वॉशरी लावलेली आहे. कोल वॉशरीमुळे परिसरातील शेतक-यांची दुषित पाण्यामुळे शेतक-यांच्या पीकांचे नुकसान होत असून त्याची भरपाई आजपर्यंत महाजेनकोने व खाजगी कोल वॉशरी कंपनीने दिलेली नाही. म्हणून आमची मागणी आहे की तेथील शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात यावी.<br>माझी मागणी आहे की महाजेनकोने स्वतः कोल वॉशरी युनिट आपल्या जागेत सुरु करावे. स्वतः महाजेनकोने आपले युनिट सुरु करावे, आपण वीजनिर्मिती येथे करता, पण प्रदूषण तिकडे होते. शेतक-यांना व आम्हा स्थानिकांना पर्यावरणीय प्रश्नांना तोंड द्यावे लागते. तरी कोल वॉशरी हा प्रकल्प तेथून कोराडीला स्थलांतरीत करण्यात यावी. | |
| २) | आपण म्हणलात की प्रकल्प उत्पादनासाठी पाणी घेणार नाहीत. पण मध्य प्रदेश पेंच येथे चौराई धरण झालेले आहे. त्यामुळे पाण्याची कपात झालेली आहे. आता पेंचमधून पाणी कोराडीला वापर होत आहे. नागपूरचे सांडपाणी प्रकल्पात वापरणार आहात. जर सांडपाणी कमी पडले, तर प्रक्रिया करुन पेंचचे पाणी वापरणार आहात. तर पेंचच्या शेतक-यांच्या वाट्याचे पाणी आपण या कोराडीच्या प्रकल्पाला वापरु नये. त्यासाठी वेगळा तरतुद करण्यात यावी. पाण्यासाठी वेगळा प्रकल्प उभा करण्यात यावा, अशी माझी मागणी आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की पेंचच्या पाण्याचा विषय होता. पेंचच्या पाण्याच्या फिगर चुकीच्या आहेत व पुढे सांडपाणी वापरणार नाहीत.<br>भारतातील महाजेनको अशी संस्था आहे की त्यांनी प्रथमतः सांडपाण्यावर प्रकिया करुन त्याचा पुनर्वापर कोराडी व खापरखेडा येथे वापरण्यात येणार आहे. त्यामुळे पेंचचे जे ताजे पाणी उपसा ७०% कमी झालेला आहे. जे ३० % आहे, ते पिण्यासाठी वापरणार आहेत. नविन २ x ६६० आम्ही तेच प्रस्तावित केलेले आहेत.<br>पेंचच ताजे पाण्याची गरज आम्ही कमी करुन घेतलेली आहे. पेंचचे पाणी आम्ही |

| | | |
|---|---|---|
| | | पिण्यासाठी व घरगुती वापरासाठीच घेण्यात येईल |
| ३) | आपण सर्व प्रकल्प नियमात बसविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यास माझी हरकत नाही. पण आपण जे कोळशाची वाहतुक मोठेमोठे ट्रक लाऊन वाहतुक करत आहेत, कोळसा खाणीतून येते येईपर्यंत अनेक गावे पडतात. अनेक गावांमधून ते ट्रक्स येतात. तेथे ध्वनी प्रदूषण व वायू प्रदूषण होते. माझी मागणी आहे की जो आपण कोल वापर करणार आहेत, छतीसगडची पण तरतुद केलेली आहे, रेल्वेमधूनच आणावी, आता रेल्वेची तरतुद करत आहेत. येथे दोन कन्व्हेअरचा प्रकल्प निर्माण केला, पण तो आतापर्यंत सुरुच केलेला नाही. आताही ट्रकव्दारे वाहतुक करतात. बोंडेगाव, खुराडी,कामटी येथून आमच्याकडे वाहतुक होते. रोज बरेच ट्रक्स जातात. त्यामुळे गावात कोळशाची राख उडून गावात जातात. हे प्रदूषण न होण्यासाठी आपण जे कोल कन्व्हेअर सिस्टिम आहे, ती सुरु करण्यात यावी व आपण रेल्वेव्दारे वाहतुक करावी. ट्रकसची वाहतुक त्वरित बंद करावी. जर हा प्रकल्प पर्यावरणाच्या निकषात बसत नसेल तर नांदगाव जेथे महाजेनकोची ७०० एकर जमिन आहे. तुम्हांला नविन जमिन घेण्याची गरज नाही. आपण जे २,५०० कोटी रुपये जमिन अधिग्रहणासाठी खर्च दाखवत आहेत, त्याची गरज नाही. तरी जर प्रकल्प कोराडी येथे पर्यावरण निकषात बसत नसेल तर तो नांदगाव येथे अंशतः सुरु करण्यात यावा | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

९) **<u>श्री विशाल बरबटे, प्रतिनिधी-शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) -</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या पक्षाचे बरेच पदाधिकारी व कार्यकर्ते या बैठकीत उपस्थित आहेत. आमच्या पक्षाचा विकासाला कधीच विरोध नाही. वीजनिर्मिती ही काळाची गरज आहे. वीजनिर्मितीशिवाय काहीही चालणार नाही. मात्र सादरीकरण करताना प्रस्तावित प्रकल्पात रोजगार किती उपलब्ध होईल, त्यात किती कुशल (Skilled), अर्धकुशल (Semi-Skilled) व अकुशल (Non-Skilled) पदे उपलब्ध होतील, याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. येथे पाचशे व्यक्तींसाठी रोजगार दाखवायचे, त्यातील शंभर लोकांना फक्त नोकरी द्यायची व येथील लोकांच्या आरोग्यावर परिणाम केला, असे होऊ नये. तरी येथे कुशल (Skilled), अर्धकुशल (Semi-Skilled) व अकुशल (Non-Skilled) पदे यांचे वर्गीकरण करण्यात यावे. ही आमच्या पक्षाची प्रथम मागणी आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | आपण पुढे सांगितले की प्रकल्पातील उत्पन्न होणा-या राखेची विल्हेवाट ही आता अस्तित्वात असलेल्या पध्दतीप्रमाणे लावण्यात येईल. तर मी निदर्शनास आणू इच्छितो की गेल्या वर्षापासून ही सुविधा - प्रकल्पातील उत्पन्न होणा-या राखेची विल्हेवाट लावण्याची सुविधा ही बंद आहे. त्यावर अतिरिक्त १३२० मेगावॅटचा प्रकल्प लादणे व फ्लाय ऍश व्यवस्थापन योग्यप्रकारे कार्यान्वित नसणे हे कोराडीवासियांना समजणे गरजेचे आहे. येथील ग्रामीण जनता भोळी आहे, त्यांना वाटते येथे चांगला रोजगार मिळेल. असा अनुभव आहे की प्रकल्प आला की रोजगार हे मुठभरच मिळतात, पण स्थानिकांना पिण्यासही पाणी मिळत नाही, श्वसनाचे आजार, कॅन्सरसारखे महाभयानक आजार होतात. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, प्रकल्पात उत्पन्न होणा-या राखेबाबत सविस्तर उत्तर देण्यात आलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३) | आज कनान नदीची जी अवस्था आहे, ती अत्यंत दयनीय आहे. मी परत प्रतिपादन करतो की आमचा प्रकल्पास विरोध नाही. पण सादरीकरणात अनेक मुद्द्यांचा खुलासा नव्हता. त्यात एक बाब आहे की एवढ्या लांबून कोळसा आणतो, त्यावर वाहतुकीचा एवढा खर्च लावतो, येथील स्थानिक उद्योजक त्याचे ग्रेडींग करतात,येथे सडलेला कोळसा पाठवितात, तर बाहेर कोटीकोटी रुपयांना कोळसा विकतात. तर अधिसूचित शासकीय विभागाने येथील कोळशाच्या गुणवत्तेची परिक्षण करणे गरजेचे आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | पुढील महत्वाचा मुद्दा जर स्थानिक लोक येते प्रकल्प त्वरित सुरु करण्याच्या मताचे आहेत तर आम्ही त्यांच्या स्थानिकांच्या सोबत राहू. पण पर्यावरणाची हानी करुन विकास करायचा प्रयत्न केल्यास आमचा या प्रकल्पास तीव्र विरोध राहिल. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१०) <u>श्री देवेंद्र पंजाबराव गोडबोले, जिल्हाप्रमुख, ग्रामीण-(उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना) -</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी प्रकल्पग्रस्त आहे. एनटीपीसीत माझीपण जागा गेलेली आहे. एनटीपीसीच्यावेळी जनसुनावणी झाली. त्यावेळीही सादरीकरणात या परिसराचा कायापालट करु असे सांगितले होते. मात्र प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सादरीकरणातील ब-याच गोष्टींची अंमलबजावणी होत नाही.<br>महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे की राख वाहतुक करताना ती बंद गाडीतूनच केली पाहिजे. पण एनटीपीसीत तसे होत नाही. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | एनटीपीसीचे सांडपाणी मोहद्यापासून सांड नदीत सोडले जाते. हजारो जलप्राणी, मासोळ्या मरतात, पण आम्ही त्या मेलेल्या मासोळ्या आमच्या डोळ्याने पाहतो. याबाबत अनेकवेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार केली. मात्र एनटीपीसीवर कारवाई करत नाहीत. | |
| २) | कोराडीचे पाणी हे कोलार नदीत जाते. कोलार नदीच्या पाण्याचा रंग बदलला आहे, पांढरे पाणी झालेले आहे. ते पाणी कनान नदीत जाते, ग्रामीण भागात अजूनही पिण्याचे पाणी हे नदीतील पाणी आपण नळावाटे देतो. भविष्यात येणारी पिढी या प्रदूषणामुळे आरोग्यवान होईल का याचा आपण विचार करणे गरजेचे आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | अहवालात असे लिहिलेले आहे की कमी खर्चात वीजेचे उत्पादन करण्यात येईल. पण कोल वॉशरीमुळे प्रत्येक युनिटवर एक ते दोन युनिटचा भार पडलेला आहे. कोल वॉशरीचा प्रकल्प जो भांडेगावला चालू आहे, त्यामुळे दोन रुपये प्रति युनिट वाढला आहे. सादरीकरणात ज्या गोष्टीचे अभिवचन देण्यात आले, त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | या प्रकल्पासाठी येथे जमिन अधिग्रहित करण्यात आलेली असेल. किती प्रकल्पग्रस्तांना नोक-या दिल्या व किती लोकांना नोक-या देणे बाकी आहे. १५०० लोकांना नोक-या देणार, तर त्यांना कायमच्या देणार का कंत्राटी देणार याचा खुलासा करण्यात येणे आवश्यक आहे. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, रोजगार - ज्यावेळी, ३ X ६६ प्रकल्प सुरु झाला, त्यावेळी प्रकल्पग्रस्त २,०५१ पैकी १९५२ प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरुपी रोजगार दिलेला आहे. १९९९ मध्य उर्वरित लोकांना विद्यावेतन देण्यास सुरवात केली व जसजशा जागा होतील, त्याप्रमाणे त्यांना सेवेत सामावून घेण्यात येईल. कंत्राटी कामगार म्हणून ३-४ हजार काम करत असतात. शासनाच्या नियमांप्रमाणे त्यांना वेतन देण्यात येते. |

११) श्री ज्ञानेश्वर खंबाले,जिल्हा परिषद सदस्य-कोराडी, तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष,कामठी, राहणार-पांजरा गाव,

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्प उभारणीस मी विरोध करत आहे. कारण या भागात लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. येथून १०० मीटरवर शहर लागून आहे. माझे गांव हे पांजरा आहे. १०० फूटावर गांव आहे. प्रकल्पाच्या भिंतीलाच लागून आहे. सकाळी आमच्या घरात, भांड्याकुड्यांवर राखड बसते, ती पाण्यात, अन्नात मिसळून आमच्या पोटात जाते. ब-याच लोकांचे आरोग्य हे धोक्यात आलेले आहे. म्हणून हा प्रकल्प १० कि.मी. परिघात लोकवस्ती नाही, खाणीजवळ जेथे कोळशाचा साठा आहे, पाण्याची व्यवस्था आहे अशा ठिकाणी नेला तर योग्य होईल. नागपूर हे स्मार्ट सिटी बनविण्याचा प्रयत्न आहे. नागपूर हे मेट्रो रिजनसुध्दा घोषित झालेले आहे. तरी अशा नागपूर शहराजवळ दुषित हवा प्रदूषण करणारा प्रकल्प कशाला पाहिजे? तर आताचा प्रकल्प कार्यान्वित ठेऊन नविन प्रकल्प दुस-या क्षेत्रात न्या. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, प्रकल्पात उत्पन्न होणा-या राखेची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट कशी लावणार याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |
| २) | या प्रकल्पाची पूर्वीही अशीच जनसुनावणी झालेली होती. त्या बैठकीत कंपनीने व पर्यावरण विभागाने जी काही आश्वासने दिलेली होती, त्याची पूर्तता झालेली नाही. त्यावेळी FGD लावण्याचे आश्वासन दिलेले होते. सात वर्षे होऊनही अजूनही FGD कार्यान्वित करण्यात आलेली नाही. या सात वर्षात दुषित वायू व राखेमुळे अनेक लोकांचे आरोग्याचे नुकसान झालेले आहे. ५० वर्षापासून हा प्रकल्प कार्यान्वित असून अजूनही प्रकल्पग्रस्त नोकरीसाठी भटकत आहेत. जर पन्नास वर्षात | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की नविन प्रकल्प हा अत्याधुनिक असून त्यात प्रकल्पाबरोबरच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा, ESP. FGD असणार. भूसावळला असाच अत्याधुनिक प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. तरी नवीन प्रकल्पामुळे प्रदूषणाचा कोणताही त्रास होणार नाही याची ग्वाही देऊ शकतो. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळत नसेल, तर हा वीजनिर्मिती प्रकल्प कशाला हवा? | |
| ३) | अगोदर आश्वासन दिले की ८०% कोराडी, महादुला गावातील लोकांना रोजगार देण्यात येईल. अजूनपर्यंत त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. मग हा प्रकल्प कशाला हवा, कारण या प्रकल्पाचे दुष्परिणाम येथील जनतेने सहन करायचे, पण येथील स्थानिकांना नोकरी पण द्यायची नाही हे आम्हांला अन्यायकारक आहे. म्हणून हा प्रकल्प इतरत्र घेऊन जावा, या प्रकल्पास आमचा विरोध कडाडून राहिल. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पात स्थानिकांना व प्रकल्पग्रस्तांना रोजगाराची संधि देण्यात येईल. |

१२) <u>श्री शुभम पांडुरंग आवरकर, राहणार-कोराडी,जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पूर्वजांपासून राहत आहोत. आमच्या शेती प्रकल्पात गेल्या. ५०-५५ वर्षांपूर्वी २१० मेगावॅटचा प्रकल्प बनलेला होता. आमच्या पूर्वजांना नोक-या देण्यात आलेल्या होत्या. त्या शेत्या आता शासनाकडेच आहेत. पण आम्ही आता बेकार झालेलो आहोत. जर हा प्रकल्प दुसरीकडे गेला, तर आम्ही बेकार युवकांनी कोठे जायचे. मी तीस वर्षांचा आहे. माझ्याबरोबरच अनेक युवक युवती येथे आलेल्या आहेत. गेले तीस वर्ष आम्हांला या प्रदूषणाचा त्रास झालेला नाही. काही लोकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांनुसार कोणतेही अपंगत्व आमच्यात नाही. येथे फक्त २०% लोक प्रकल्पाच्या विरूध्द आहेत. ८०% लोक प्रकल्पास पाठिंबा देत आहेत. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| २) | आम्हांला प्रकल्प पूर्ण होण्याअगोदर एक प्राधान्य देण्यात यावे, प्रकल्प बाधित तेरा ग्रामपंचायतीतील गावातील लोक आहेत, जे बेरोजगार आहेत, त्यांना प्रथम येते घेण्यात यावे. हे कृपया आपल्या अहवालात नमुद करण्यात यावे. प्रकल्पाच्या ७० कि.मी. लांब असलेले युवक,युवती प्रकल्पात रुजू होत आहेत, पण येथील स्थानिक मात्र बेरोजगार असून ते आशेवर जगत आहेत. तरी प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की नवीन प्रकल्पात स्थानीकांना व प्रकल्पग्रस्तांना रोजगाराची संधि देण्यात येईल. |

१३) <u>श्री बाळासाहेब घरडे, रिपब्लिकन पक्ष कार्यकर्ता, उत्तर नागपूर, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | नागपूरच्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची कार्यप्रणाली ही सक्षम करण्यात यावी. या बैठकीत प्रकल्पामूळे जे काही आरोग्यविषयक विचार उपस्थितांनी व्यक्त केले, ते बरोबर आहेत. जर प्रदूषण नियंत्रण व आरोग्यविषयक निर्देशांचे काटेकोरपणे पालन केल्यास या प्रकल्पास कोणाचाही विरोध राहणार नाही. नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी असे आमचे म्हणणे आहे. परिसरात मोठ्या प्रमाणात अवैधपणे ले-आऊटचे काम चालू आहे. हमखास त्यांना मान्यता मिळते, ना हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) मिळते. तरी अशा लोकांना अटी व शर्ती पाळण्याचे आदेश देण्यात यावेत. या प्रकल्पामुळे माणूस,पशूपक्षी, वनस्पती यांना कोणत्याही प्रकारची इजा होऊ नये अशी आमची मागणी आहे. | समितीने सांगतले की, सूचनेची नोंद घेण्यात यावी. |
| २) | प्रकल्पात स्थानिक युवक-युवतींनाच रोजगाराची संधि देण्यात यावी ही रिपब्लिकन पक्षातर्फे मागणी करण्यात येते. रिपब्लिकन पक्ष आठवले | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | गटाच्या वतीने या प्रकल्पाला जाहिर पाठिंबा देत आहोत. | |

१४) <u>**श्री आशीश रॉय.**</u>

| अनु. क्रं. | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | मी महाजेनकोला प्रश्नावली पाठविली होती. त्यांनी सांगितले की या प्रश्नांची उत्तरे ही पर्यावरणविषयक जनसुनावणीत देण्यात येतील.<br>प्रकल्पात सुपरक्रिटिकल टेक्नॉलॉजी वापरणार आहात. ३६० चे ३ युनिट आहेत, ते पण क्रिटकल आहेत. पण त्याच्यामुळेही प्रदूषण हे होत असते. म्हणजे प्रकल्प प्रवर्तक प्रदूषण नियंत्रण करु शकत नाही म्हणून लोकांची दिशाभूल करण्यात येत आहे की नविन २ X ६६० हे सुपर क्रिटिकल असून प्रदूषण होणार नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोराडी व खापरखेडा प्रकल्पाच्या बँक गॅरंटीज जप्त केलेल्या आहेत. मग सुपर क्रिटिकल असून प्रदूषण होणार नाही हे कसे प्रतिपादन करण्यात येते. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्पात सुपरक्रिटिकल टेक्नॉलॉजी वापरणार असून प्रदूषण होणार नाही. |
| २) | दोंडाईला ३३०० चा प्रकल्प प्रस्तावित केलेला होता. तेथे लोकांनी विरोध केला. तर आपण २५० मेगावॅटचा सोलर पार्क केला. तेथे लोकांना रोजगार मिळेल व इतर फायदे मिळतील असे सांगूनही मग प्रकल्प का सुरु केला नाही. तर येथील या प्रकल्पामुळे ठेकेदारांचे भले होणार आहे. महाराष्ट्रात खाजगी पॉवर प्लॅन्ट पुष्कळ रिकामे पडले आहेत. सिन्नरचा १३५० मेगावॅटचा पॉवर प्लॅन्ट आहे. बुटीबोरीत रिलायन्सचा ६०० मेगावॅटचा पॉवर प्लॅन्ट आहे. मिहानमध्ये २५० मेगावॅटचा पॉवर प्लॅन्ट रिकामा | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पडलेला आहे. ते प्लॅन्ट महाजेनकोने अधिगृहित करावे. तेथील स्थानिकांना रोजगार तरी मिळेल. | |
| ३) | त्याचप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांचा फ्लाय ॲश युटीलायझेशन/ मॅनेजमेंट कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे शून्य प्रमाणात आहे. त्यामुळे ती राख वा-यामुळे शेतक-यांच्या शेतात जाते. कन्हान नदीत जाते. तर कार्यरत प्रकल्पातच फ्लाय ॲश मॅनेजमेंट नाही, तर प्रस्तावित प्रकल्पात करणार याची काहीही हमी नाही. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, या मुदद्यावर उत्तर देण्यात आलेले आहे. |
| ४) | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की FGD लावणार असे सांगितलेले आहे. तर ३०३ युनिटवर भारत सरकाराची अट होती, तर तेरा वर्ष झाली, अजूनही लावलेला नाही. तर या नविन प्रकल्पात लावणार याची हमी काय आहे?<br><br>तसेच या सुपरक्रिटकल युनिटमुळे प्रदूषण कसे कमी होईल ह्याचे स्पष्टीकरण महाजेनकोने द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की ब-याच जणांनीFGD लावलेला नाही याबाबत तक्रार केलेली आहे. मागील तीन वर्षापूर्वी टेन्डरींग प्रोसेस सुरु केलेली होती. काही तांत्रीक बाबींमुळे ते एक वर्ष टेंडर रखडले. त्यानंतर कोविडमुळे ते एक-दीड वर्ष रखडले गेले. आता नविन २ x ६६० चे टेंडरिंग अंतिम टप्प्यात आलेली असून जूनमध्ये FGD लावण्याच्या ऑर्डर्स आम्ही पारित करत आहोत.<br>१) कोराडी न.६ व खापरखेडा येथील FGD ऑर्डर्स आम्ही पारित केलेल्या आहेत. कामे प्रगतीपथावर आहेत.<br>२) पारसला आणि परळी ६,७ व ८ ला सर्व ऑर्डर्स प्रगतीपथावर आहे.<br>३) त्यामुळे महाजेनको FGD बाबत काहीही करत नाही त्यात काही तथ्य नाही.जूनमध्ये कोराडीसाठी ऑर्डर्स पारित होतील |

| | | |
|---|---|---|
| | | नविन प्रकल्पासोबतच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व FGD येणार आहेत. |

१५) <u>श्री प्रताप गोस्वामी, प्रतिनिधी, आम आदमी पार्टीः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | हा नविन प्रकल्प येण्यापूर्वी कार्यरत प्रकल्पात युनिट नं. ८.९ व १० आहेत, तर येथे बैठकीत सांगण्यात यावे की सदरहू प्रकल्पाची बँक गॅरंटी प्रदूषण नियमांच्या उल्लंघनामुळे किती वेळा जप्त करण्यात आलेली आहे. किती कोटी रुपये आपण जप्त केले. तर प्रकल्प प्रवर्तकांची काय हमी आहे की हे भविष्यात प्रदूषण नियंत्रण करतील. फक्त आश्वासन देतात, बाकी काहीही करत नाहीत. FGD प्रकल्प जो २०१० ला कार्यान्वित करणे बंधनकारक होते, तर आता २०२३ सुरु झालेले आहे.<br>त्याचप्रमाणे ही जमिन अधिगृहित करण्यात आलेली आहे. तर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन का करण्यात आले नाही, सर्व प्रकल्पग्रस्तांना का नोकरी देण्यात आलेली नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की ब-याच जणांनीFGD लावलेला नाही याबाबत तक्रार केलेली आहे. मागील तीन वर्षापूर्वी टेन्डरींग प्रोसेस सुरु केलेली होती. काही तांत्रीक बाबींमुळे ते एक वर्ष टेंडर रखडले. त्यानंतर कोविडमुळे ते एक-दीड वर्ष रखडले गेले. आता नविन २ x ६६० चे टेंडरिंग अंतिम टप्प्यात आलेली असून जूनमध्ये FGD लावण्याच्या ऑर्डर्स आम्ही पारित करत आहोत.<br>४) कोराडी न.६ व खापरखेडा येथील FGD ऑर्डर्स आम्ही पारित केलेल्या आहेत. कामे प्रगतीपथावर आहेत.<br>५) पारसला आणि परळी ६,७ व ८ ला सर्व ऑर्डर्स प्रगतीपथावर आहे.<br>६) त्यामुळे महाजेनको FGD बाबत काहीही करत नाही त्यात काही तथ्य नाही.जूनमध्ये कोराडीसाठी ऑर्डर्स पारित होतील<br>नविन प्रकल्पासोबतच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व FGD येणार आहेत. |
| २) | मा. जिल्हाधिकारी , आपल्या रजिस्टरमध्ये किती प्रकल्पग्रस्त नावांची यादी आहे, गेले तीस वर्षे प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करत आहेत. आता सांगतात ५३४ व्यक्तींना रोजगार देण्यात | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | येईल. येथील परिसरातील लोकसंख्या किती आहे, येते लाखो लोक बेरोजगार आहेत. | |
| ३) | त्यांनी आक्षेप नोदविला की ही सर्व खोटी आश्वासने असून या प्रकल्पाचा स्थानिकांना काहीही फायदा होणार नाही, येथील वीज ही मुंबई व पश्चिम महाराष्ट्रासाठी आहे. स्थानिकांना फक्त प्रदूषण, आरोग्याच्या तक्रारी हे मिळणार आहेत. स्थानिकांना फक्त खराब पाणी मिळणार आहे. आम्ही या प्रकल्पास विरोध करतो. महाजेनकोने आपली कार्यक्षमता वाढवावी. दुसरे पॉवर प्लॅन्ट बंद पडलेले आहेत. या वीज प्रकल्पाची येथे काहीही गरज नाही. हा विदर्भावर अन्याय असून आम्ही त्याचा विरोध करतो. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की जनसुनावणी घेणे हे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र हा राजकीय मंच नाही. येथे प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक प्रश्नांबाबत सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावेत.

१६) **श्री सचिन पाटील, स्थानिक रहिवाशीः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी स्थानिक. स्थानिक म्हणजे सर्वात प्रथम प्रकल्प सुरु झाला, त्यावेळी आमच्या जमिनी गेल्या आहेत. ज्या सुखसुविधा बाहेरच्या लोकांना मिळतात, त्या स्थानिकांनाच द्यायला पाहिजे. कोराडीला मोफत पाणी देण्यात येते. महादुला गावातील लोकांना महिन्याचे बील भरावे लागते. लोक पाणी भरुन भरुन त्यांना वेड लागायची पाळी आलेली आहे. तरी त्यासाठी एखादी पाणीपुरवठा योजना आखली पाहिजे. स्थानिक लोकांना रोजगार मिळत नाही. स्थानिक लोकांसाठी हॉस्पिटलची गरज आहे. प्रकल्पातील राख आमच्या अन्नावर पडते. ती | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, आपल्या मागण्यांचा सकारात्मक विचार करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | अन्नात व पाण्यात जाते. पण स्थानिकांना रोजगाराची गरज आहे. आमच्या मुलांना शिक्षणासाठी शाळा असणे आवश्यक आहे. येथे सगळी पब्लिक स्कूल आहेत. तेथे वार्षिक फी ही २५,००० - ३०,००० रुपये आहे. येथे कामगार काम करतो, त्यास महिना १५,०००-२०,००० पगार आहे. प्रकल्पात स्थानिक लोकांनाच रोजगाराची संधि देण्यात यावी. प्रकल्पात स्थानिक लोकांना मूलभूत गरजा या मिळाल्याच पाहिजे. जे परप्रांतीय येथे येतात, त्यांची दादागिरी खपवून घेणार नाही व त्यांना स्थानीकसुध्दा होऊन देणार नाही. | |

१७) **<u>श्री प्रकाश जाधव, माजी खासदार,रामटेक लोकसभा मतदारसंघः-</u>**

या उद्योगांमुळे जे प्रदूषण वाढले, त्याचा सातत्याने आम्ही विरोध करत असतो. ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे, तर पर्यावरणाबाबतच प्रश्न उपस्थित करणे गरजेचे आहे. हवा, पाणी किती प्रदूषित झाली यावर लक्ष ठेवणे हे पर्यावरणाचेच काम आहे. रोजगार कोणाला हा येथे प्रश्न येत नाही. आज चंद्रपूर जिल्हा रडत आहे. जिल्ह्यात चारी बाजूस खाणी व एक पॉवर प्रकल्प आहे. त्याच मार्गावर नागपूर जिल्हा चाललाय. कन्हान नदीबाबत कोणीही बैठकीत बोलले नाही. महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्याच्या ज्या वीस नद्या आहेत, त्यात नदीमधील प्रमुख नदी कनान नदी आहे. त्या नदीचे पाणी पुर्ण नागपूर जिल्हा पितो. त्या नदीचे पाणी जमिनीखाली झिरपते. आरआरझेड धोरणानुसार नदीपासून किती अंतरावर उद्योग सुरु करावा याचे नियमन केलेले आहे.

त्यांनी पुढे सांगितले की कंपनीच्या पर्यावरण सल्लागार यांनी येथे सादरीकरण केले. मात्र प्रकल्पामुळे हवा किती प्रदूषित होणार, त्यात किती पार्टिकल्स असतील व त्यावर काय उपाय योजना करणार याबाबत काहीही सांगितले नाही. पाण्याबाबत तसेच झाले. तीच व्यक्ती पाणी प्रदूषणाबाबत काहीही बोलला नाही. अशी कशी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असते का? म्हणजे पर्यावरण सल्लागार यांनी प्रदूषणाची पातळी व प्रदूषणावरिल उपाययोजना या उपस्थितांना सांगणे अपेक्षित होते. ती व्यक्ती या विषयाबाबत काहीच बोलली नाही.

श्री जाधव यांनी सांगितले की जो कनव्हेअर बेल्ट बसविणार आहेत, त्याच्यामार्फत कोराडी व खापरखेडा येथे कोळसा पुरविणार आहे. पर्यावरण अनुमती भारत सरकारने मंजूर केलेली असून त्यात कनव्हेअर बेल्टला नदी पात्रात फक्त २० कॉन्क्रीट खांबांची परवानगी मिळालेली आहे. ५१२ कोटीचा प्रकल्प, ४९० कोटी खर्च करण्यात आले आणि २० कॉन्क्रीट खांबांची परवानगी

असताना ९५-९६ कॉन्क्रीट खांब बांधण्यात आलेले आहेत. याच्याबाबत कोणी बोलणार का नाही. त्या कन्हान नदीच्या संरक्षण, संवर्धनासाठी कोणी बोलणार का नाही? आम्ही कन्हान नदी प्रदूषणापासून वाचवा, हे आंदोलन प्रतिष्ठान मार्फत चालू केलेले आहे. कन्हान नदीच्या पात्रात एकाच ठिकाणी ६-६ पूल बनलिले आहेत. तर नागपूरला उत्तराखंड सारखा पूर आणायचा आहे का, जे ९६ कॉन्क्रीट खांब टाकले, ते वॉटर बेडमध्ये टाकलेले आहेत.

त्यांनी आक्षेप नोदविला की २० कॉन्क्रीट खांब बांधण्यास परवानगी असताना ९५-९६ खांब नदीच्या पात्रात उभारले, त्यासाठी अतिरिक्त खर्च कोणी केला, त्या अतिरिक्त खर्चास कोणी मंजूर दिली याबाबत जिल्हाधिकारी यांनी त्वरित चौकशी करुन संबंधित व्यक्तींवर गुन्हा नोंदविणे आवश्यक आहे.

मा. जिल्हाधिकारी हे पर्यावरण टास्क फोर्सचेसुध्दा सदस्य आहेत. नागपूर जिल्ह्याचे न्यायाधीश हे सुध्दा टास्क फोर्सचे सदस्य आहेत, त्याचप्रमाणे प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर हेही सदस्य आहेत. तर आपण २० कॉन्क्रीट खांब बांधण्यास परवानगी असताना ९५-९६ खांब नदीच्या पात्रात उभारले, त्यावर आपण मा. जिल्हाधिकारी काय कारवाई करणार की नाही. येथे जो कोळसा येतो, त्या खाणीतील सर्व पाणी प्रक्रियेशिवाय नागपूर जिल्ह्याची तहान भागविणा-या कन्हान नदीत सोडले जाते, त्यावर मा. जिल्हाधिकारी आपण काय कारवाई करणार आहेत. दर दिवशी किती प्रमाणात खाणीतील पाणी कन्हान नदीत सोडले जाते. तसेच खाणीतून कोळसा कोल वॉशरीत जातो, त्या कोल वॉशरींनी वराडा, नांदगाव येथील सर्व शेती ही कोल डस्टने भरून काढलेली आहे. सर्व पीकांवर कोल डस्ट आहे. तत्कालीन पर्यावरण मंत्री आले, शेतक-यांनी प्रचंड निदर्शने केली. शेतीची भरपाई देण्याची घोषणा केली, रक्कमसुध्दा घोषित झाली, अजून एकही पैसा शेतक-यांना मिळालेला नाही. फक्त एक कॅन्सर हॉस्पिटल नागपूरला होते, आता सहा कॅन्सर हॉस्पिटल नागपूरला झालेली आहेत.

आमच्या पाण्यावर, अन्नावर, श्वसनावाटे, जमिनीवर, पीकांवर या प्रकल्पाची राख मिश्रित झालेली आहे. पाणी प्रदूषित झालेले आहे, स्वच्छ हवा जर आम्हांला या प्रकल्पामुळे मिळत नसेल, तर आम्ही कोणत्या तोंडाने या प्रकल्पाचे स्वागत करायचे.

प्रकल्प आला तर स्थानिकांना नोकरी मिळेलच. हा काय लढाईचा भाग आहे. हे शासनाचे धोरणच आहे. तर अनेक लोकांचे जीव जाणारी मशिनरी आणत आहेत काय, कॅपटीव्ह पॉवर प्रकल्पाचे काय झाले? विदर्भात कितीतरी कॅपटीव्ह पॉवर प्रकल्प आलेले होते. जबाबदारीने विधान करतो की एकही कॅपटीव्ह पॉवर प्रकल्प चालू नाही. त्याच्यावर का चर्चा होऊ नये. जर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेत आहात, तर पर्यावरणावर बोलले पाहिजे.

या प्रकल्पात ज्यांच्या जमिनी घेतल्या, त्यांना नोक-या मिळतील. पण प्रकल्पासाठी लागणारा कोळशामुळे ज्यांची शेती उध्वस्त झाली, त्यांनाही नोक-या मिळाल्या पाहिजेत. या प्रकल्पासाठी पाणी उपसा करण्यात येईल, दुस-याच्या हक्काचे पाणी घेणार, त्यालाही नोकरी मिळाली पाहिजे.

कारखाना येण्याच्या अगोदर पर्यावरणविषयक जनसुनावणी ठेवलेली आहे, तर आपण जो पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी अहवाल उपलब्ध केला, तो मराठीत आहे का. शासनाचे धोरण आहे की सर्व व्यवहार हा स्थानिक भाषा मराठीतच केला पाहिजे. आपण मराठीत संक्षिप्त माहिती दिलेली आहे. मग मराठी मोठी की इंग्रजी मोठी याचा खुलासा करण्यात आला पाहिजे.

आपण प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यास केलेला आहे. प्रकल्पात २७५ मीटरची चिमणी बसणार आहे. म्हणजे ८५० फूटाच्या वरची चिमणी बनणार आहे. कोळसा पेटल्यावर त्याचा धूर वर उडणार आहे. तो कोल डस्टटेड धूर आहे. कोल डस्टटेड धूराला वजन असते. तो हवेत जाईल, तो काय फक्त १० कि.मी. वर पडणार आहे. १० कि.मी.पेक्षा लांब शेत्या नाहित का, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत नाहीत का त्यात राख पडेल. जनसुनावणीची दवंडी का पिटविली नाही, १० कि.मी. परिघाच्या बाहेर जर एखाद्याला कॅन्सर झाला, तर तो खर्च महाजेनको करणार आहे का.

आपण सांगितले की वृक्षारोपण करु, दवाखाना काढू. पर्यावरण अनुमती (Environment Clearance) मंजूर करताना भारत सरकारचे निर्देश आहेत, ज्याठिकाणी कोळसा हाताळणी, कोळसा क्रशिंग, कोळसा लोडिंग व अनलोडिंग होते, तेथे ४५ मीटर रुंदीचा Buffer Zone - हरित पट्टा विकसित करणे बंधनकारक आहे.

मात्र लोकांना हिरवे दिसावे म्हणून कोराडी, खापरखेडा येथे बांबूची झाडे लावलेली आहेत. जर आपणास प्रकल्प आणायचाच असेल, तर शेवटी आम्ही न्याय पालिकेकडे जाऊ.

जर प्रदूषण नियंत्रण संयत्रणा नविन प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रणासाठी अत्याधुनिक Electro Static Precipitator (ESP) कार्यान्वित करणार आहात, तर कार्यरत प्रकल्पात का लावले नाही? याचा अर्थ जनसुनावणीत लोकांची धुळफेक करण्यासाठी आश्वासन द्यायचे आणि पर्यावरण अनुमती मिळाल्यानंतर सर्व आश्वासने विसरुन जायची. याबाबत प्रथम ज्या ग्रामपंचायतीने ना हरकत प्रमाणपत्र दिले, त्यांना Affidavit देण्यात यावे.

सादरीकरणात प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती सांगण्यात आलेली नाही. तर माझा पहिला आक्षेप नोंद व्हावी की हा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल ज्यांनी तयार केला, ज्यांनी हवेबाबत अभ्यास केला, ज्याने पाण्याचा अभ्यास केला, ज्याने जमिनीचा अभ्यास केला त्या महाजेनकोच्या जबाबदार अधिका-यांनी येथे सादरीकरण करणे आवश्यक होते. महाजेनकोच्या जबाबदार अधिका-यांनी येथे सांगणे आवश्चक आहे की किती नोक-या देणार, कुठल्या संवर्गात नोक-या उपलब्ध होतील, प्रकल्प केंव्हा सुरु होईल, येथे एका व्यक्तीने नुसते वाचून दाखविले. त्यामुळे माझा निषेध आहे, पूर्ण ताकदीने विरोध आहे. या प्रकल्पास माझा विरोध आहे.

समर्थन तेव्हा मिळेल, जेव्हा येथे लोकहित संरक्षित होईल. आम्ही लढू, या विषयास जबरदस्त विरोध करु. विरोध करणे हा आमचा अधिकार आहे.

त्यांनी पुढे सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. तर त्याच विषयावर बोलले पाहिजे. येथे अगोदर लोक एक-एक तास बोलून दुस-या विषयांवरच बोलले.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की बंद झालेला युनिट्स आपण एमईआरसीला सादर केलेले आहेत. तर ही चुकीची माहिती जनतेसमोर ठेऊन दिशाभूल करणे आहे. आता या बंद झालेल्या युनिटमधील कामगारांचे काय झाले?

त्यांनी आक्षेप नोंदविला की कोल लिंकेज हे छतीसगडमधील खाणीबरोबर आहे. ज्या खाणीबरोबर कोल लिंकेज केलेले आहे, ती गोरे पल्मा - II ही महाजेनकोची खाण असून ती चालवायला अदानी ग्रुपला दिलेली आहे. तर पॉवर प्लॅन्ट येथे टाकायचा, आमचा कोळसा घ्यायचा नाही. जे युनिट बंद केले, त्यांची लिंकेज वापरायची नाही, तर कोळसा आणायचा छतीसगडहून. तरीही पॉवर ही स्वस्त उत्पन्न करणार आहेत, ती कशी?

म्हणून येथे पॉवर प्लॅन्ट आणणार आहात, तर इथलाच कोळसा घेतला पाहिजे. पर्यावरण संरक्षणाच्या सर्व उपाययोजना आपण अंगिकारल्या पाहिजेत. तर पर्यावरण संरक्षित राहत नसेल, व ज्याप्रकारे येथील माणसाने वाचन केले, त्यावर माझा पहिला आक्षेप आहे, कारण त्या माणसाने चुकीची माहिती दिली. जर त्याने हवेवर अभ्यास केलेल नाही, तर त्याने हवेबाबत कशी माहिती दिली? तरी ज्यांनी ज्यांनी ईआयए अहवाल करताना अभ्यास केलेला असेल, त्यांना येथे बोलविण्यात यावे तरी या विषयाला मी पूर्ण ताकदीने विरोध करणार आहे.प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की - नदीपात्रातील खांबांबाबत पाहणीकरुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. ई.एस.पी. व एफ.जी.डी. यंत्रणा बसविण्यात येईल. ई.आय.ए. व ई.एम.पी. करिता परिसराच्या हवा गुणवत्तेचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

१८) **<u>श्री भैय्यालाल सूर्यभान माकडे, म्हसाळा, तालुका-कामठी, जिल्हा-नागपूरः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमची (म्हसाळा गावाची) व खसाळा गावाची जमीन प्रकल्पात उत्पन्न होणारी राख टाकण्यासाठी अधिग्रहित करण्यात आलेली आहे. ही जमिन जेव्हा अधिग्रहित करण्यात आली, त्यावेळेसही असेच सादरीकरण करण्यात आलेले होते. त्यावेळसही आमचा विश्वास बसत नव्हता की महाजेनको एवढे चांगले करु शकेल काय. मागच्या वर्षी पावसाळ्यात खसाळा गावातील Ash Dam फुटला. तर आमचा आक्षेप आहे की | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, राखेची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट संदर्भात अगोदर उत्तर देण्यात आलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | तो एकदम कसा फुटला, फुटण्याअगोदर त्याला काही क्रॅक गेली असेल. तो दुपारी फुटला म्हणून चांगले झाले, तो रात्री फुटला असता तर अख्ख म्हसाळा गाव हे पाण्याखाली गेले असते. अशी दिशाभूल करुन प्रकल्प उभे करण्यात येत आहेत. तरी प्रकल्प कार्यान्वित करताना अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा त्याचप्रमाणे कार्यान्वित करण्यात यावी व स्थानिक शेतकरी, प्रकल्पग्रस्त यांना नोकरी देणार असाल तर त्याचे अभिवचन हे स्टॅंप पेपरवर देण्यात यावे. तसे न करता अशा प्रकल्पासाठी शेतक-यांना देशोधडीला लावत असतील तर असे प्रकल्प आमच्या कामाचे नाहीत. त्या Ash Dam फुटल्यामुळे म्हसाळा, खरडी, खसाळ्याची जमिन ही खरडून निघालेली आहे. ती जमिन दहा वर्षांसाठी पिकाला राहिली नाही. तर आपण सांगावे की शेतक-याने परिवाराचे उदरभरण कसे करावे? या यक्ष प्रश्न म्हसाळा, खसाळा, खरडी, सुरादेवी व इतर गावांमध्ये आहे. असे अनेक प्रश्न या प्रदूषणामुळे निर्माण झालेले आहेत. तेरा गावे ही बाधित झालेली आहेत. | |
| २) | मी महाजेनकोने आमच्या म्हसाळा, खसाळा, खैरी येथे दवाखाना बांधून द्यावा ही मागणी केलेली होती, मागणी एक वर्षापूर्वी केलेली होती. अजूनही काही नाही. तर आम्ही सादरीकरणावर कसा विश्वास ठेवायचा? तरी प्रथम रोजगाराचे, प्रदूषणाचे प्रश्न सोडवा, नंतरच प्रकल्प उभा करण्यात यावा. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या सूचनांचा सकारात्मक विचार करण्यात येईल. |

१९) **<u>श्री मदन राजुरकर, खापा पाटण ग्रामपंचायतीतर्फे -</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी शेतकरी आहे. गेल्या ७-८ वर्षांपूर्वी येथे जो जुना प्रकल्प होता, त्या प्रकल्पापासून आमचे गावे खापा, लोणकारी, नांदा व इतर गावे त्रस्त होतो. उभे पीक हे खराब होऊन जायचे. भाजीपाला खराब होऊन जायचा. पण हा नविन प्रकल्प झाला आणि आमचे शेतीचे उत्पन्न दुपटीने वाढले. या प्रकल्पापासून आम्हां शेतक-यांना कोणत्याच प्रकारची बाधा नाही व येणा-या प्रकल्पापासून होणार नाही याची आम्हांला ग्वाही आहे. येणा-या प्रकल्पाचे मी ग्रामपंचायतीतर्फे समर्थन करतो. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

२०) <u>श्री रविंद्र बाबूराव पारधी, माजी सरपंच-ग्रामपंचायत खसाळा तथा सदस्यः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी प्रकल्प बाधित गावांतर्फे या प्रकल्पास जाहिर पाठिंबा करत आहे. या प्रकल्पबाधित गावातील बेरोजगारांची एकच मागणी आहे की येथे मोठया संख्येने बेरोजगार जनसुनावणीस उपस्थित आहेत. ह्या प्रकल्पाविषयी फक्त स्थानिकांनाच आस्था आहे. कोराडी प्रकल्पाच्या सावलीत आम्ही जन्मलो, वाढलो. कधी लुळापांगळा आमच्या कुटुंबात जन्माला आला नाही. याठिकाणी काही लोक ज्यांना प्रकल्पाशी देणेघेणे नाही, ते खोटे आरोप करतात. आम्ही | सूचनेची नोंद घेण्यात आली. नविन प्रकल्पात प्रकल्पग्रस्त व स्थानीकांनाच रोजगाराची संधि देण्यात येणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कोराडीच्या सावलीत वाढलो, कधी दमा झाला नाही, कधी राखड गेली नाही.<br>आमची एकच मागणी आहे की या भागातील स्थानीक बेरोजगारांना प्रकल्पात प्रथम प्राधान्य मिळाले पाहिजे. या प्रकल्पाच्या सीएसआर निधीतून येथील बाधित शेतक-यांना सानुग्रह अनुदान मिळाले पाहिजे<br>महाजेनकोकडून पर्यावरणाची काळजी घेतली जात आहे, त्याच्यापेक्षा दुपटीने पुन्हा पर्यावरण संरक्षण कसे करता येईल या गोष्टीकडे महाजेनकोने लक्ष द्यावे. महाराष्ट्र सरकारचा दहा हजार कोटी रुपयांचा हा पॉवर प्लॅन्ट आहे. याठिकाणी जागा, कोळसा उपलब्ध आहे. पाणी उपलब्ध आहे. नागपूर महानगरपालिकेच्या प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यावर हा प्रकल्प चालतो. प्रकल्पातील पाण्यामुळे परिसरातील शेतक-यांच्या विहीरीतील पाण्याची पातळी वाढलेली आहे. त्या पाण्यामुळे शेतक-यांना ओलिताची शेती करता येत आहे. त्या पाण्याचा शेतक-यांच्या शेतीला फायदा होत आहे. या सर्व बाबी आम्हां स्थानिक लोकांना माहित आहेत. तरी स्थानिक लोकांना प्रथम बोलण्याची संधि द्यावी, त्यांना समजून घ्यावे.<br>या प्रकल्पास आमचा स्थानिकांचा पूर्ण पाठिंबा आहे. | |

२१) <u>श्री धनंजय इंगोले, सरपंच, खसाळा ग्रामपंचायत, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खसाळ्याची हजारो एकर जमिन प्रकल्पात गेली. ५० वर्षापासून कोणाल आजार झालेला नाही. ज्यांची जमिन गेली, त्यांना नोक-या मिळाल्या. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | ते सेवानिवृत्त झालेले आहेत. जर हा प्रकल्प जर दुसरीकडे नेणार असाल, तर जमिनी आम्हांला आमच्या परत करा व नंतर दुसरीकडे प्रकल्प न्या. आता ज्याची जमीन घेतली, त्याला पाच मुले असतील, तर एकाला नोकरी दिली व जमीन मात्र पूर्ण घेतली. या प्रकल्पामुळे कोणालाही त्रास नाही. गावातील बरेच प्रकल्पग्रस्त आहेत, त्यांना १०,०००-१५,००० रुपयांच्या कामावर आहेत. तर त्यांना शासकीय पगारावर घ्यावे. आमच्याकडे धरण आहे. तेथे खूप पर्यटक येतात. तरी ते पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यात यावे. तेथील रस्ते सिमेंटचे आहेत. तेथे एमएसईबी जागा आहे, तेथे स्थानिकांसाठी दवाखाना बांधून द्यावा. आमच्या हजार गावाच्या वस्तीत दीडशे बेरोजगार आहेत. या प्रकल्पास आमचा पाठिंबा आहे. | |

२२) <u>श्री ताराचंद भास्कर पाकिंडे, राहणार-महादुला, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | दिवसेंदिवस वीजेची गरज वाढलेली आहे. त्याअनुषंगाने कोराडी येथे शासनाने नविन प्रकल्प उभारणीचे प्रयोजन केलेले आहे, ते समर्थनीय आहे. ही जनसुनावणी आयोजित केलेली आहे, त्याबद्दल मी आयोजकांचे अभिनंदन करतो. कोराडी येथील ७-८ कि.मी. राहणा-या लोकांनी गेले ४५ वर्षे पर्यावरणाचा त्रास सहन केलेला आहे व आपली जमीन देऊन | कोराडीऐवजी पट गोवारी येथे प्रकल्प होऊ शकतो ह्या सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, कार्यान्वित असलेल्या विद्युत प्रकल्पामध्ये आवश्यक असलेली हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पास योगदान दिलेले आहे. शासनाने पूर्वीही विस्तारिकरण केलेले आहे. सध्याचा विचार करता कोराडी .येथे लोकसंख्येची वाढ व जवळचे शहर नागपूरसुध्दा कोराडी येथे पोहचलेले आहे. पर्यावरणाचा विचार करता वर्तमान पत्रातील मागणीनुसार कोराडीऐवजी पट गोवारी येथे होऊ शकतो. तेथे सर्व सोयी उपलब्ध असून जवळच पेंच नदी आहे. जंगलाने व्यापलेला आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होऊ शकते. तेथील जमीन अधिग्रहण केल्यामुळे तेथील लोकांना रोजगाराची संधि चालून येईल. त्यांच्या जीवनात बदल घडून येईल. पारधुनी व रामटेक हे जोडणारे रस्ते उपलब्ध आहेत. तरी नविन प्रकल्प कोराडी येथे न होता पट गोवारी येथे स्थापन करावा ही विनंती. | |

२३) <u>मिस दिशा चंद्राफुले, सभापती, पंचायत समिती, कामठी, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आता पर्यंत जे वक्ते बोलून गेले, ते लोकहितासाठीच बोलून गेले आहेत. मी प्रकल्पबाधित वारेगाव गावातील मी एक मुलगी आहे. एमएसईबीने ३५-४० वर्षापूर्वी ज्या जमीनी अधिग्रहित केलेल्या होत्या, तुटपुंजी रक्कम दिली व घरातील फक्त एका व्यक्तीस नोकरी दिली. त्या शेतक-याच्या जमिनीवर इतर लोक (भूमीहिन शेतकरी) मोलमजुरी करुन उपजीवीका | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, नवीन प्रकल्पग्रस्तांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | करत होते. जमिनी अधिग्रहित केल्याने ते बेरोजगार झाले. ज्याची जमिनी गेली, त्या कुटुंबातील एकालाच नोकरी मिळाली, इतर लोक भटकत आहेत. त्यामुळे गावात सामाजिक समस्या उद्‌भवल्या आहेत. त्यातल्यात्यात नविन पॉवर प्लॅन्ट तयार होतात, तेथेही पक्षपात केला जातो. आमच्या परिसरात निवडक लोकांनाच रोजगाराची संधि मिळाली, बहुसंख्येने लोक बेरोजगार आहेत. आम्ही पदाधिकारी असल्याने आमच्या कडे चकरा मारतात. आम्ही आश्वासने देऊन थकून गेलो. जे व्यवस्थापनाच्या अनुकूल आहेत, त्यांनाच नोकरी मिळते. | |
| २) | हा नविन प्रकल्प येथे करत आहेत. तर लोकहितासाठी पाणी, हवा, पर्यावरण या सर्वांचा विचार केला पाहिजे. कार्यरत प्रकल्पामुळे कोराडीला काय त्रास होतो, ह्यास आपण अवगत आहात. १९९४ सालची गोष्ट आहे. माझा भाऊ ऍश बंड तलावामध्ये पडून त्याचा मृत्यू झाला. हा महाजेनको (त्यावेळेस एमएसईबी) यांचा हलगर्जीपणा आहे, त्यामुळे माझ्या भावाचा मृत्यू झाला. आपण फक्त प्रकल्पाची उभारणी करतात. पण तेथील कर्मचा-यांची सुरक्षिततेचा विचार करत नाहीत. आपण प्रदूषण नियंत्रण करत नाहीत. आज प्रकल्प सगळीकडे आहेत. स्थानिकांनी निषेध व विरोध केला तरीही आपण प्रकल्प उभारणी करणार. प्रकल्पात स्थानिकांना रोजगार दिला जात नाही. येथे सर्वेक्षण केल्यास असे दिसून येईल की येथे परराज्यातून आलेले लोक जास्त आहेत. | ह, सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, सुरक्षेचे सर्वंकष उपाययोजना करण्यात येतील. स्थानिक बेरोजगारांना नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. |
| ३) | येथे बरेच लोक प्रकल्पाच्या विरुध्द बोलले. काही बाजूने बोलले. प्रकल्पाचे फायदे व तोटे हे असणारच. आमचा या प्रकल्पास आक्षेप आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पण आम्ही आमच्या वारेगाव ग्रामपंचायतीच्या वतीने मागण्या सादर केलेल्या आहेत. या मागण्यांचा विचार केला गेला तर ख-या अर्थाने पाठिंबा देण्यात येईल. अन्यथा आंदोलन करण्याची भूमिका घेऊ असे मी आश्वासित करते. | |

२४)श्री कमलाकर बांगरे, सरपंच, वारेगाव ग्रामपंचायत, जिल्हा-नागपूरः-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| | आपण अत्याधुनिक सयंत्रणा उभारुन प्रकल्प उभारणी करत आहेत. म्हणजे आपण प्रदूषण संरक्षणाची जबाबदारी घेणार आहात. प्रकल्प सुरु करताना स्थानिकांना रोजगार देऊ असे आश्वासन देण्यात येते, पण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ते वचन पाळण्यात येत नाही. तरी येथे स्थानिक लोकांनाच रोजगार मिळायला पाहिजे असे आमची मागणी आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, प्रदूषण नियंत्रणाकरिता अत्याधुनिक सयंत्रणा उभारली जाईल. स्थानिकांना रोजगार दिला जाईल. |
| २) | मी पुढे मागणी करत आहे की प्रकल्पग्रस्त गावांना मोफत वीज देण्यात यावी.<br>प्रकल्पबाधित लोकांसाठी हॉस्पिटल बांधून त्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करण्यात याव्यात,<br>प्रकल्पात हरित पट्टा विकसित करताना परिसरातील गावांमध्ये हरितपट्टा, वृक्षारोपण करण्यात यावे.<br>गावांमध्ये बचतगट असतात. त्यांना रोजगार देण्यात यावा. | समितीने सांगितले की, सूचनेची/मागणीची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्र्वर्तकाने सांगितले की, प्रकल्पात हरित पट्टा विकसित करताना परिसरातील गावांमध्ये हरितपट्टा, वृक्षारोपण करण्यात येईल. |

२५) सौ. योगिता किशोर दांडे, सरपंच, खेरे ग्रामपंचायत, जिल्हा-नागपूरः-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी या प्रकल्पास काही अटी व शर्तीसह संमती आहे -<br>कोराडी खापरखेडा वीजनिर्मित कंपनीमध्ये स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन द्यावे. प्रकल्पग्रस्त गावाच्या हद्दीतील राखड तलावाजवळ उंच प्रजातीची झाडे लावून लागवड करावी. सर्व भागात प्रकल्पग्रस्तांना विस्तारित नविन प्रकल्पात सामावून घ्यावे.<br>प्रकल्पग्रस्त गावांना प्रतिवर्षी पन्नास कोटी विकासकामांसाठी खर्च करण्यात यावेत.<br>पर्यावरण योजनांसाठी गावात दहा कोटी रुपये राखीव ठेवावेत.<br>प्रक्लपग्रस्त गावात सीएसआर निधितर्गत विविध सामाजिक कामांसाठी रस्ते, पाणी पुरवठा, सार्वजनिक आरोग्य सेवा प्रति वर्षी एक करोड रुपये ग्रामपंचायतीस देण्यात यावेत. | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रतर्वकांने सांगितले की, वृक्षलागवड करण्यात येईल, स्थानिकांना रोजगार देण्यात येईल. सीएसआर अंतर्गत कामे करण्यात येतील. |
| २) | प्रकल्पबाधित स्थानिक कंत्राटदार व बेरोजगारांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे कंत्राट उपलब्ध करुन द्यावे.<br>कंपनीच्या दुषित पाण्यामुळे व राखेमुळे प्रकल्पग्रस्त लोकांना आजारासाठी बीज निर्मिती कंपनीने हॉस्पिटल बांधून प्रकल्पग्रस्त लोकांना विनामुल्य औषधोपचार उपलब्ध करण्यात यावेत. | सूचनांची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तक म्हणाले की, कंपनीच्या दुषित पाण्याचे शुध्दीकरण करण्याकरिता उपयुक्त सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसविण्यात येईल. |
| | प्रत्येक प्रकल्पबाधीत गावांना शुध्द पाणी पुरवठा. पिण्याच्या पाण्याची सोय करुन देण्यात यावी. जनक्षेत्र गावात प्रदूषण होणार नाही याची काळजी घेणे. गावात ५०-६० फुटांवर उंच प्रजातीचे वृक्ष लावले. | प्रकल्प प्रवर्तक म्हणाले की, राखेची योग्य विल्हेवाट करण्यात येईल, खुल्या जागेच्या ३३ टक्के वृक्षलागवड करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पग्रस्त गावात कंपनीच्या राखेमुळे पीकांचे नुकसान झाल्यास शेतक-यांना नुकसानभरपाई द्यावी. | |
| ३) | प्रकल्पग्रस्त गावात पर्यटन स्थळ विकसित करण्यात यावेत.<br>या सर्व अटी मान्य असतील, तर माझा या प्रकल्पास विरोध नाही. या पूर्ण झाल्या पाहिजेत. कागदोपत्री फक्त नसाव्यात. | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात यावी. |

२६) <u>मिस लीना भुदे, एनजीओ चालकः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागच्या दोन वर्षापासून कोराडी व खापरखेडा या परिसरात जी गावे आहेत, तेथे आम्ही पर्यावरणीय दृष्टीने स्थानिकांना कशाप्रकारे अडचणी येत असतात याचा अभ्यास केला होता. गावातील लोकांना सोबत घेऊन हा अभ्यास करण्यात आलेला होता. पाण्याचे नमुने गोळा करुन त्याचा अभ्यास केला.<br>सदरहू प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (ईआयए) जो येथील प्रकल्पबाधित गावक-यांसाठी उपलब्ध करण्यात आला, तो फक्त दहा गावांनाच उपलब्ध करण्यात आलेला आहे, मात्र ईआयए अहवालातच लिहिलेले आहे की प्रकल्पबाधित एकूण ४६ गांवे आहेत. | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. तसेच इआयए व इ.एम.पी. च्या प्रती सरकारी कार्यालय व १० कि.मी. परिक्षेत्रातील ग्रामपंचायतीमध्ये ठेवण्यात आल्या होत्या. |
| २) | तर पहिला आक्षेप आहे की सर्व ४६ गावात प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (ईआयए) का उपलब्ध करण्यात आलेला नाही? त्याचप्रमाणे सदरहू ईआयए अहवाल हा स्थानिक | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आली. समन्वयक म्हणाले की, २००६ च्या अधिसूचनेचे पालन करण्यात आलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | भाषा मराठीत सर्व ग्रामपंचायतीस का उपलब्ध करुन देण्यात आला नाही? | |
| ३) | पुढील आक्षेप आहे की ईआयए - पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात पूर्णपणे चुकीची माहिती दिलेली आहे. त्यामुळे ज्या खाजगी पर्यावरण सल्लागार यांनी या कंपनीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला, त्या पर्यावरण सल्लागारावर कायदेशीर कारवाई त्वरित करण्यात यावी, त्या पर्यावरण सल्लागाराला ब्लॅक लिस्ट करण्यात यावे. या अहवालात पूर्णच्यापूर्ण माहिती ही चुकीची दिलेली आहे. | समितीने सांगितले की,सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| ४) | त्यांनी प्रकल्पग्रस्त लोकांच्या आरोग्याविषयी लिहिलेले आहे की येथील जे लोक आहेत, ते घाणेरडया रितीने राहतात, त्यांची स्वच्छता खूपच खराब आहे. त्यामुळे ते आजारी पडतात. हे पूर्णपणे चुकीचे अहवालात नमुद केलेले आहे. | समितीने सांगितले की, नोंद घेण्यात आली. |
| ५) | माझा आक्षेप आहे की महाजेनको प्रकल्पातील राख सर्व गावात उडते. ती पाण्यात, अन्नात मिसळते, त्यामुळे लोकांना त्रास होत आहे. परिसरात त्वचा संसर्ग (skin infection) रोग आढळतो. कारण प्रकल्पातील राख ही पाण्यात मिसळते व स्थानीक लोकांना अंघोळीसाठी ते पाणी वापरावे लागते. | प्रकल्प प्रवर्तक म्हणाले की, राखेची शमन करण्याकरिता पाण्याची फवारणी करण्यात येईल. शास्त्रीयदृट्या विल्हेबाटीबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |
| ६) | या राखेचे वैज्ञानिक पृथ्थकरण केले असता त्यात भरपूर हेवी मेटल आढळून येतात. ते हेवी मेटल असलेले पाणी स्थानिकांना प्यावे लागते, तेच पाणी शेतात पीकांना द्यावे लागते. ते हेवी मेटल पाण्यातून पिकांना मिळते व शेवटी ते अन्नावाटे आपल्या सर्वांच्या पोटात जाते. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की एका एनजीओने तक्रार केली होती की महाजेनकोच्या राखेमुळे परिसरातील पिण्याचे पाण्याचे स्त्रोत, नदी नाले हे बाधित झालेले असून त्यात रेडिओ एकटीव्ह व हेवी मेटल्स ब-याच प्रमाणात आहेत. तेथील रहिवाशांच्या |

| | | |
|---|---|---|
| | महाजेनको १००% फ्लाय एशची शास्त्रीयदृट्या विल्हेवाट लावण्यास अपयशी ठरलेली आहे. | आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यानतर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी संयुक्त पाहणी केली, त्यावेळी तक्रारदारांना बरोबर घेतलेले होते. तक्रारदार यांनी सांगितलेल्या जलस्त्रोताचे नमुने, परिसरातील विविध पिण्याचे पाण्याचे स्त्रोत, विहीरी इ. ची पाहणी करुन पाण्याचे नमुने गोळा करण्यात आले. ते एनएबीएल ने मंजूर केलेल्या प्रयोगशाळेत तपासण्यात आले. त्यात कुठेही हेवी मेटल्स व रेडिओ एकटीव्ह आढळले नाही. त्याचप्रमाणे सर्व मानके ही निर्देशित पातळीत होती.<br>त्याचप्रमाणे महाजेनकोने बीएआरसी कडून एक अहवाल प्राप्त केलेला होता. त्यातही सर्व मानके पाळण्यात येतात असाच अहवाल आहे. नविन प्रकल्प हा अत्याधुनिक असून त्यात प्रकल्पाबरोबरच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा, ESP, FGD असणार. भूसावळला असाच अत्याधुनिक प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. तरी नवीन प्रकल्पामुळे प्रदूषणाचा कोणताही त्रास होणार नाही याच ग्वाही देऊ शकतो. |
| ७) | येथील कोलार नदी ही पूर्णपणे राखेची नदी झालेली असून कोलार नदी ही कन्हान नदीला मिळते. कनान नदीतूनच सर्व नागपूर जिल्ह्याला पाणी मिळते. पावसाळ्यात ते पाणी नागपुरपर्यंत येऊन नागपूर दक्षिण व पूर्व भागातील पाणी व्यवस्था ही पूर्णपणे ठप्प होऊन जाते. जरी अहवालात शुध्द पाणी असल्याचे सांगितले<br>नविन विस्तारिकरण प्रकल्पात फ्लाय ऍशची विल्हेवाट कशी लावणार याबाबत कुठलाच खुलासा केलेला नाही. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, राखेच्या शास्त्रीय विल्हेवाटीबाबत अगोदर उत्तर देण्यात आलेले आहे. विट बनविणाऱ्यांना राख दिली जाते. तसेच राखेचा उपयोग जमिनीच्या खोलगट भाग भरण्याकरिता केला जातो. |

| | | |
|---|---|---|
| ७) | अहवालात सांगितले की कोराडी येथे जुना ऍश बंड आहे, तो वापरणार आहेत. त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास कोराडीचा ऍश बंड पाहणी करुन पुढील कार्यवाही करण्याची विनंती केली. आजच्या स्थितीत ते ऍश बंड स्थगित (Abandoned) अवस्थेत आहे. आजच्या स्थितीत ते ऍश बंड आहे, त्यात बांबूची लागवड केलेली आहे. ते ठिकाण पूर्णपणे वनासारखे दिसते. तेथील राख ही काढण्यात आलेली नाही. त्या कोराडी ऍश बंडची क्षमता (Capacity) पूर्णपणे संपलेली आहे. त्यांनी तो ऍश बंड बंद करुन दुसरा चालू केला. | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. जुन्या ॲश बँडची पाहणी करण्यात येईल व आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. |
| ८) | पुढील आक्षेप त्यांनी नोंदविला की कोराडी व खापरखेडा येथील ऍश बंडला लायनिंग नाही. नियमाप्रमाणे आधी लायनिंग नंतर ऍश टाकावी लागते. आज legacy fly ash आहे, ती २.४ कोटी टन आहे. ती राख उडते व शेतात जाते. श्वसनाव्दारे ते लोकांच्या शरीरात जाते. मी एक व्हिडिओ तयार केलेला होता. त्यात तेथील स्थानिक लोकांनी जे आता येथे प्रकल्पास समर्थन करत आहेत, त्यांनी त्यावेळेस सांगितले की ते रोज राख खात आहेत. त्याचे आरोग्य संपलेले आहे. तरी Health Impact Assessment हे करायलाच हवे. तसेच तेथील सद्यस्थिती आरोग्याची तपासणे आवश्यक आहे. कारण तेथे थॉयराईडचे, किडनी स्टोनचे रोगी वाढलेले आहेत. | राखेच्या शास्त्रीय विल्हेवाटीबाबत व श्वसनाच्या तक्रारीबाबत अगोदर उत्तर देण्यात आलेले आहे. राखेचे शमन करण्याकरिता पाण्याची फवारणी करण्यात येते. legacy fly ash ची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली जाते. |
| ९) | अहवालात असे लिहिले आहे की गावात स्वच्छता नसल्याने मलेरिया होतो. ही चुकीची माहिती त्यांनी दिलेली आहे. | सूचनांचा नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, FGD बसविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | त्याचप्रमाणे FGD आहेत, त्याचा Waste Management Plan अहवालात दिलेला नाही. त्याचा Gypsum Waste निघणार आहे, तर Gypsum Waste Management बाबत काहीही लिहिलेले नाही. | |
| ९) | आक्षेप आहे की कार्यरत प्रकल्पातील प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न महाजेनको करत नाही. स्थानिकांची इच्छा असेल तर प्रकल्प होईल, मात्र स्थानिकांनी प्रकल्पात होणा-या प्रदूषणाचा विचार करावा. जोपर्यंत महाजेनको विहिरीत, नाल्यात गेलेली फ्लाय ऍश काढत नाहीत,तोपर्यंत प्रकल्पास परवानगी देऊ नये. | सूचनांची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, कार्यरत प्रकल्पात सांडपाणी संयंत्रणा बसविण्यात आली आहे. हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणाा बसविण्यात आली आहे. तसेच नाला व परिसराची पाहणी करण्यात येईल व योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |

२७) <u>मिस अनुसुया काळे छाब्रयानी, स्वच्छ असोशियन एनजीओः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | बैठकीत स्थानीक या शब्दावरुन चर्चा झालेली आहे. स्थानीकांना प्रकल्प हवा आहे आणि प्रकल्पात स्थानीकांनाच नोक-या देण्यात यावा ही मागणी झाली. प्रकल्प येणे वा न येणे ही फार पुढची गोष्ट, पण हवा, पाणी हे कधिही स्थानीक नसते. हवा कुठही जाऊ शकते, तसेच पाणी कुठेही जाऊ शकते. आतापर्यंत जे खसारा गावात जे प्रदूषण झालेले आहे, जे फ्लाय ऍश बंडचे ब्रेक झालेले होते, त्याचे बरेच अहवाल २०२२ मध्ये आलेले आहेत. पण मला आश्चर्य वाटते खसारा गावाचे, ते प्रकल्पास समर्थन देत आहेत. आता आपण कोराडी तलावाजवळ जाऊ. जेवढे लोक प्रकल्पाच्या समर्थनार्थ टाळ्या वाजवत होते, त्यांनी कोराडी तलाव पाहिला तर आहे काय? त्या कोराडी तलावावर एका | सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्पातील राखेच्या विल्हेवाटी संदर्भात अगोदर उत्तर देण्यात आलेले आहे. तसेच नोकरीत स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | समाजाचा उदरनिर्वाह चालतो. मासेमारीवर त्यांची उपजिविका चालते. गेले तीन वर्षे दर तीन महिन्यात आम्ही त्यांच्यासोबत येथे येत असतो. त्यांना आता तेथे रोजगारच उपलब्ध नाही. कारण कोराडी तलाव सुकत चाललेला आहे. कोराडी तलावात जी प्रकल्पातील राख गेलेली आहे, त्यामूळे त्यांना मासेमारी करता येत नाही. याच्याबद्दल कोणीच बोलले नाही. जर आपण स्थानिक कोण यावर चर्चा करतात, तर कोराडी तलाव हा स्थानिकच आहे. | |
| २) | ४६ गावात आपण ५३४ रोजगार देण्यात येतील. त्यात कुशल, अर्धकुशल व अकुशल किती पदे आहेत, याबाबत स्पष्टीकरण नाही. | समितीने सांगितले की,सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | तसेच राष्ट्रीय हरित लवाद व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पारित केलेल्या निर्दशांनुसार महाजेनको मानके पाळत नाही. अजूनही राख टाकली जाते. लेगसी राख जी २.५ कोटीची बोलली जाते, त्यावर महाजेनकोने काहीही केले नाही, व त्यावर पुढील कडक कारवाई महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून झालेली नाही.<br>प्रकल्पाचे फायदे सांगण्यात आले, पण दुष्परिणा काय आहेत हे सांगण्यात आलेले नाहीत. | समितीने सांगितले की,सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. महाजेनको विरुध्द यापूर्वी म.प्र.नि. मंडळाने वेळोवेळी कडक कारवाई केलेली आहे. |
| ४) | येथे एवढे हवेचे प्रदूषण असतानाही पीएम - २.५, पीएम - १० यांची पातळी ही मानकांपेक्षा कमी दाखविलेली आहे. ही कशी खरी असू शकेल? खसारा ऍश बंडविषयी अगोदरच सांगितलेले आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५) | आज चाळीस वर्षे झाले, कोराडीचा प्रकल्प राबवत आहेत. येथे कोठे ग्रीन बाऊंडरी दिसत आहे का? या विषयांवर आपण बोलत नाहीत. येथे जे प्रकल्पाचे समर्थ आहे, त्यांनी ईआयए अहवाल वाचला तरी आहे काय? रोजगार मिळणार, प्रकल्प चांगला आहे, पण प्रकल्पाच्या समर्थकांनी ईआयए वाचला नसेल तर तो वाचावा, तो आपल्या फायद्याचा आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रकवर्तकाने सांगितले की, कार्यरत प्रकल्पाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. |

२८) <u>श्री विवेकसिंग सिसोदिया, चक्की खापा गाव, जिल्हा-नागपूर:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी शेतकरी आहे. मी शहर सोडून वावरात राहायला आलेलो आहे. मला फ्लाय ऍशचा खूपच त्रास होतो. माझ्या मुलांना नेबुलायझर लागला. मी स्वतः पाहतो की ग्रामीण भागात फ्लाय ऍशमुळे ८०% मुलांना नेबुलायझरची गरज आहे. ते हवा प्रदूषणामुळेच होत आहे.<br>परिसरातील वरिष्ठ नागरिकांना मायस्थेशिया असा आजार होत आहे. श्वास घेताना श्वास नलिकेच्या शिरा काम करत नाहीत. तसेच माझे संत्राचे झाड पूर्णपणे खराब झालेले आहे, कारण त्यावर फ्लाय ऍश पडते. मी शेतकरी असून माझे उत्पन्न हे शून्य झालेले आहे.<br>त्यांनी आक्षेप नोंदविला की महाजेनको फ्लाय ऍश एनएचआय ला देते. एनएचआय त्याची ट्रकने वाहतुक करतो. एनएचआय गावातील रस्ते खराब करत आहे. ती राख पाणी अडवा, पाणी जिरवा येथे जे बंधारे आहेत, तेथे अडकून पडलेली आहे. फ्लाय ऍशमुळे सर्वांनाच त्रास होतो. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, फ्लाय ऍश शमविण्यासाठी पाण्याचे फवारे वापरले जातात. तसेच परिसरात पक्के रस्ते बांधलेले आहेत. वृक्षलागवडीचे प्रमाण वाढविलेले आहे. |
| २) | मी निषेधासाठी उभा राहिलेलो आहे. माझा या प्रकल्पास विरोध नाही. तरी प्रथम प्रदूषण कमी | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे |

| | | |
|---|---|---|
| | केल्याशिवाय नविन प्रकल्प चालू करू नये. दुसरी गोष्ट येथे प्रकल्पात जी नोकरी मिळाली, ती नियमांप्रमाणे मिळालेली नाही. त्या कंत्राटी स्वरुपाच्या आहेत. | |

२९) <u>सौ. सीमा अविनाश मोरे,सरपंच, गुंतीया गाव, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे या प्रकल्पास समर्थन आहे. त्याचप्रमाणे माझ्या गावातील सर्वांचे या प्रकल्पास समर्थन आहे. कारण माझ्या गावात पुष्कळ प्रमाणात बेरोजगारीची समस्या आहे. युवकांना या प्रकल्पात रोजगार मिळालाच पाहिजे ही माझी अपेक्षा आहे. | प्रकल्प प्रवर्तक म्हणाले की, प्रकल्पात प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात येईल. |
| २) | दुसरी गोष्ट महाजेनकोने जास्तीतजास्त माझ्या गावात वृक्षलागवड करावी. तसेच गावातील विविध सामाजिक कामांसाठी निधी आवश्यक असतो. फक्त जनतेच्या करभरणीवर अवलंबून राहू शकत नाही. त्यामुळे माझ्या गावाला आर्थिक मदत ही मिळालीच पाहिजे. मी जिल्हाधिकारी यांना विनंती करते की समाजहीत लक्षात घेऊन हा प्रकल्प कोराडी येथेच व्हावा, दुसरीकडे बाहेर जाऊ नये. | सूचनांची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की महानिर्मती ही वेळोवेळी परिसरातील गावात वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेत असते. उद्योग परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केलेली आहे. सीएसआर चे पालन करण्यात येते. |

३०) <u>श्री अशोक बरगे, राहणार-कोराडी,जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पाच्या प्रदूषणाशी बराच निगडीत आहे. माझे ठाम मत आहे की हा प्रकल्प कोराडी येथेच झाला पाहिजे. कारण त्यामुळे महाजेनकोच्या/महानिर्मितीच्या पैशाची खूप | सूचनेची नोंद घेण्यात आली |

| | | |
|---|---|---|
| | प्रमाणात बचत होणार आहे. हा पैसा जनतेचा पैसा आहे. मी कुठल्याही राजकीय पक्षाचा नाही. सादरीकरणात पर्यावरण व्यवस्थापन योजना जी सांगण्यात आली, त्याचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे. माझे या प्रकल्पास पूर्णपण समर्थन आहे. | |

३१) <u>श्री नीतीन दिलिपराप रोंघे, महाविदर्भ जनजागरण संस्थाः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वरकरणी हा प्रकल्प जरी विदर्भाच्या प्रगतीसाठी दिसत असला तरी माझ्या काही शंका आहेत. कारण महाराष्ट्रातील ७०% वीज ही विदर्भात होते. मात्र विदर्भात फक्त ११% वीज ही विदर्भात वापरली जाते. फारच झाले तर २,०००.० मेगावॅटच्यावर आमचा वीजेचा वापर नाही. मग हा प्रकल्प कोणासाठी येतो? कारण येथे ७,२०० मेगावॅट उर्जा निर्मिती होत आहे. जगातले कोणतेही शहर दाखवा, जेथे १५ कि.मी.परिघात ७,२००,० मेगावॅट + या प्रकल्पाची १३२०.० मेगावॅट उर्जा बनणार आहे. तर नागपूरकर हे गॅस चेंबर नाही, तर ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेले आहोत. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | खालील प्रश्न विचारतो -<br>या प्रकल्पातून मरक्युरी म्हणजे पारा व रेडिओ ॲक्टीव्हिटी म्हणजे किरणोत्सर्ज म्हणणार आहे, त्या गोष्टींचा अभ्यास येते झालेला नाही. | प्रकल्प प्रर्वतकांनी सांगितले की, एका एनजीओने तक्रार केली होती की महाजेनकोच्या राखेमुळे परिसरातील पिण्याचे पाण्याचे स्त्रोत, नदी नाले हे बाधित झालेले असून त्यात रेडिओ एकटीव्ह व हेवी मेटल्स ब-याच प्रमाणात आहेत. तेथील रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यानतर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, महाराष्ट्र प्रदूषण |

| | | |
|---|---|---|
| | | नियंत्रण मंडळ यांनी संयुक्त पाहणी केली, त्यावेळी तक्रारदारांना बरोबर घेतलेले होते. तक्रारदार यांनी सांगितलेल्या जलस्त्रोताचे नमुने, परिसरातील विविध पिण्याचे पाण्याचे स्त्रोत, विहीरी इ. ची पाहणी करुन पाण्याचे नमुने गोळा करण्यात आले. ते एनएबीएल ने मंजूर केलेल्या प्रयोगशाळेत तपासण्यात आले. त्यात कुठेही हेवी मेटल्स व रेडिओ एकटीव्ह आढळले नाही. त्याचप्रमाणे सर्व मानके ही निर्देशित पातळीत होती.<br>त्याचप्रमाणे महाजेनकोने बीएआरसी कडून एक अहवाल प्राप्त केलेला होता. त्यातही सर्व मानके पाळण्यात येतात असाच अहवाल आहे.<br>नविन प्रकल्प हा अत्याधुनिक असून त्यात प्रकल्पाबरोबरच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा, ESP. FGD असणार. भूसावळला असाच अत्याधुनिक प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. तरी नवीन प्रकल्पामुळे प्रदूषणाचा कोणताही त्रास होणार नाही याच ग्वाही देऊ शकतो. |
| ३) | कोराडीचे पाणी हे पिण्यालायकच नाही. .तुमच्या गावात वॉटर एटीम कशासाठी लागले? | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | महाराष्ट्राला वीजेची गरज असेल, पण विदर्भात वीजेची अजिबातच गरज नाही. सर्वजण असे सांगतात की नागपूरला कोळसा भरपूर आहे. पण प्रकल्पात तर आता छत्तीसगडहून म्हणजे ६०० कि.मी. वरुन कोळसा आणणार आहेत. त्यासाठी आपण प्रकल्प भूसावळ, परळी, नाशिकचे बंद करणार आहेत. जर छत्तीसगडहून कोळसा जाळायचा आहे, तर तो नाशिकला, परळीला, भूसावळला जाळला तरी काय? | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रणाकरिता सर्वंकष उपाययोजना करण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | पुण्यालाही जाळता येईल. आता अशी पळवाट काढण्यात येते की दुसरीकडे जागा उपलब्ध नाही. तर महाजेनकोच्या अधिका-यांना विचारा - कोकणातील धोपावे, जळगावातील दोंडाईचा येथे ३,२०० मेगावॅटसाठी जमिनीचे अधिग्रहण झालेले आहे. तेथील लोकांना पुढच्या पिढीची काळजी असल्याने त्यांनी तेथे प्रकल्प होऊ दिला नाही. | |
| ५) | यात एक हायफाय वाक्य वापरले जाते -Merit Order dispatch.<br>म्हणजे कोराडीतील वीज ही सर्वात स्वस्त राहिल. कोराडीत वीज बनणार, तर त्याचा वापर होणार आहे का.<br>त्यांनी सांगितले की पॉवरचा एक नियम असतो, एनर्जीचा एक नियम असतो, जेथे एनर्जी बनते, तेथे काहीच विकास होत नाही. जिथे ती वापरली जाते, तेथेच पैसा येतो.<br>त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की येथे असे सांगण्यात येते की नागपूर महानगरपालिकेचे १४० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते कोराडीला देणार आहोत. तर पुण्याला आजच्या घडीला मूळा व मुठा नदीतून ६०० एमएलडी सांडपाणी उपलब्ध आहे. २०२५ पर्यंत ८५७ एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे. मग तिथे का पॉवर प्लॅन्ट लागत नाही. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| ६) | वृत्तपत्रात आलेल्या बातमीनुसार वायू प्रदूषणामुळे सुमारे ६० लाख मुदतीपूर्व प्रसूती होतील. (Pre mature baby), दुःखाने सांगावे लागत आहे. हा धोका उष्णतेने १६% जास्त वाढतो. जे लोक पूर्वी साखर कारखाने काढत होते, कॉलेजस काढत होते, ते आता कॅन्सर हॉस्पिटल काढत आहेत. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, नवीन प्रकल्पात प्रदूषण नियंत्रणाकरिता सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ७) | ईआयए मध्ये सांगितलेले आहे की प्रकल्पात ५४३ नोक-या मिळतील. विदर्भ जेव्हा महाराष्ट्रात सामील झाला, तेव्हा लोकसख्येच्या प्रमाणात म्हणजे २३% नोक-या पाहिजे होत्या. मी माहिती अधिकारात माहिती मिळविली असून विदर्भातील लोकांना फक्त ७-८% नोक-या मिळाल्या आहेत. तरी मी या प्रकल्पास विरोध करत आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येतील. |

३२) <u>श्री संजय सत्यकार, महाविदर्भ शेतकरी संघटना,कन्हन:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या बैठकीत ज्या स्थानिकांना प्रकल्प येथेच कार्यान्वित करावा हा जो मुद्दा मांडला, त्याबद्दल त्यांचे धन्यवाद. त्यांनी आपल्या भागात प्रकल्प व्हावा हे चिकाटीने मांडला आहे. सादरीकरण करताना जे मुद्दे मांडण्यात आले, त्यातून काही प्रश्न विचारायचे आहेत.<br>सादरीकरणात सांगितले की छत्तीसगडहून सुमारे ७०,०००.० टन कोळसा आणणार आहेत. तर तो वार्षिक असावा. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्प हा किती दिवस चालणार आहे याबाबत काहीही माहीत देण्यात आलेली नाही. समजा दहा वर्ष प्रकल्प चालला, तर ७ कोटी टन कोळसा येथे आणला जाईल. त्याची राखड ही ४०% निघणार, म्हणजे दर वर्षी अडीच कोटी टन. तर त्या राखेची विल्हेवाट कशी करणार, त्यासाठी आपल्या नागपूरची जिल्ह्याची तेवढी क्षमता आहे का? येथे प्रकल्पाचे जे समर्थक आहेत, त्यांच्याशी मी १००% सहमत आहे. | सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.<br>प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे ॲश विल्हेवाट शास्त्रीयपध्दतीने होत नाही असा आक्षेप नोंदविण्यात आलेला होता. महाजेनकोचे जे सात प्लेंट आहेत, त्यापैकी चारमध्ये १००% राखेची विल्हेवाट लावण्यात येते. तर कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे तेवढे होत नाही. दिनांक ३१-१२-२०२१ च्या नविन अधिसूचनेनुसार कोरडी ॲश व पॉड ॲश अशी केलेली आहे. तर कोराडीला ड्राय ॲश कमी प्रमाणात जात असली, तरी पॉडमधून जी ॲशचे लिफ्टीग आहे, ते जवळपास ७०-८०% आहे. येथील जे वीटभट्टीधारक व छोटे छोटे उद्योग आहेच ज्यांना ॲशची गरज आहे, ते लोक नेत असतात.<br>नविन अधिसूचनेनुसार कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे पाच वर्षांचे टर्म दिलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | पहिले दोन वर्षे ८०% नंतर १००% टार्गेट दिलेले आहे. बैठकीत एका उपस्थितांना आक्षेप नोंदविला होता की येथील ॲश मुंबईला रेल्वेव्दारे नेणार असाल तर तेथेही प्रदूषण होईल. याचा खर्च स्थानिक लोकांवर लादला जाईल. याबाबत महाजेनको यांनी पेपरात जाहिरात दिलेली होती, जरी प्रथम वेळेस त्याचा प्रतिसाद समाधानकारक नव्हता, तरी नविन अधिसूचनेनंतर जेथे ॲश वापरली जाते, तेथे ती मिळण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. ॲश कमी पडत असल्याने राख विकत घेणा-या ब-याच संस्था महाजेनकोशी संपर्कात आहेत. कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथील राखेस मागणी आहे, कारण संबंधित व्यक्ती/संस्था यांच्याकडून राखेसाठी विचारणा सुरवात झाली. त्यांनी सांगितले ॲश मागणी असलेल्या क्षेत्रात पुणे, मुंबई, नाशिक येथे रेल्वेने स्वखर्चाने नेतो. पण महाजेनकोतर्फे काही मदत झाल्यास ते नक्कीच सुरु करु शकतो. महाजेनकोने याबाबत असे ठरविले की जी कोरडी ॲश आहे, ती उपलब्ध करण्यात यावी,त्यासाठी जी बंडला लागणार खर्च ॲश उचलणा-याना देण्यात यावा. त्यामुळे अनेक व्यक्ती/संस्था महाजेनकोच्या संपर्कात आहेत. महाजेनको निश्चितपणे सांगते की येत्या एक-दोन वर्षात कोरड्या राखेचे वापराचे प्रमाण निश्चितच वाढेल. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांनी दिलेले निर्देश (टारगेट) हे निश्चितपणे पूर्ण करु शकू. |
| २. | दोन दिवसांपूर्वी पेपरात बातम्या येत असतात की प्रदूषणापेक्षा रोजगाराची समस्या गंभीर आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | मी कन्हान भागात राहतो. तेथे आम्ही कोळशाचे नुकसान भोगणारे लोक आहोत. कारण आमच्या येते ३००-४०० फूट खोल विहिर करण्यात आल्या, पण तेथील पाणी गेले. आता ते ढिग १०-१२ कि.मी. सगळीकडे दिसतात. हे किती दिवस आम्ही भोगायचे. आम्ही प्रकल्पाच्या विरुध्द नाही. पण यामूळे आमच्यायेथील रोजगार गेले. नागपूर जिल्ह्यातील कन्हान हे क्षेत्र उत्पन्नाच्या दृष्टीने महाराष्ट्रात पिंपरी चिंचवडनंतर दुस-या क्रमांकावर होते. कोळसा खाणीमुळे आमच्या येथील सर्व उद्योग गेले. तरी आमची विनंती आहे की आपण प्रकल्प उभारताना आमच्या कन्हान येथील सर्व परिसरातील लोकांचा विचार करण्यात यावा | |
| ३. | प्रकल्पातील राखेमुळे आमच्यी जवळजवळ सर्व शेत्या या पूर्णपणे बरबाद झालेल्या आहेत. एमएसईबीने ७५० एकर जागा घेऊन ठेवली आहे. दहा हजार रुपये एकराने घेतली. त्यांना त्यावेळी सांगितले की नोकरी देऊ. नंतर नोकरी नाही, जमिन गेली. येथे ठेकेदारीच्या नोकरीसाठी ३-४ लाख रुपये द्यावे लागतात. | प्रकल्प प्रवर्तक म्हणाले की, राखेचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करण्यात येईल. तसेच स्थानिकांना रोजगारात प्राधरान्य देण्यात येईल. |
| | त्याचप्रमाणे कोळसा वापरणार तो वॉशरीचा वापरणार का बिना वॉशरीचा वापरणार हेसुध्दा सांगण्यात आले पाहिजे. जर सत्तर लाख कोळसा वॉशरीतून धूऊन आणत असतील, तर तो छतीसगडलाच धूऊन इकडे आणायला हवा.<br><br>एमएसईबीने ७५० एकर जागा घेऊन ठेवली, तर तेथून २-३ कि.मी. अंतरावर सगळ्या कोल माईन्स आहेत.<br>खदानीतून कोळसा काढण्यासाठी १० हजार एच.पी.च्या मशिन्स लावल्या. पाणी उपसून कन्हान नदीत सोडतात. म्हणजे कन्हान नदी ही | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, चांगल्या दर्जाचा कोळसा वापरण्यात येईल.<br><br>समितीने सांगितले की, नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पूर्णपणे खदानच्या पाण्यावर आहे. ७५० एकरात १५० एकराचा पॉन्ड आहे. जेथे खदान तेथेच पॉवर प्लॅन्ट केल्यास वाहतुकीचा खर्च वाचेल व वीज स्वस्तात मिळू शकेल. आणि त्याहून प्रदूषण वाचेल. | |

अध्यक्ष यांनी उपस्थितांना नवीन सूचना असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात.

<u>३३) श्री रमेश गणोरकर, महाराष्ट्र राज्य वीज अधिकारी कर्मचारी सेना परमनंट संघटनेचा उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी व अधिकारी व कर्मचारी सेना कॉन्ट्रॅक्ट संघटनेचा अध्यक्ष:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आतापर्यंत ब-याच लोकांनी आपले मत व्यक्त केले. काहीजण म्हणाले हा प्रकल्प नको, काहींनी पाठिंबा दिला तर काहींनी दुसरी जागा सूचविली. काहीजण म्हणाले येथे प्रदूषण आहे, तर प्रकल्प दुसरीकडे न्या. तर तेथेही प्रदूषण होणार नाही का? तिथल्या जमिनी खराब होणार नाही का? मग येथेच प्रकल्प करावा. प्रकल्प येथेच व्हायला पाहिजे, नाही तर मी महाराष्ट्रात भव्य मोर्चा काढीन.<br>हा प्रकल्प सुरु झाला ५० वर्षापूर्वी, त्यावेळेस विरोध का केला नाही. तसेच माझी मागणी आहे की अगोदर ठेकेदारीतील लोक प्रथम कायमसेवेत समाविष्ट करुन घ्या, नंतरच दुसरे घेण्यात यावे. त्यासाठी तीव्र आंदोलन करण्यात येईल. तरी हा प्रकल्प येथेच राहावा. | समितीने सांगितले की,सूचनांची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, नवीन प्रकल्पामुळे प्रदूषण होणार नाही याकरिता आवश्यक ते सर्व उपाययोजना करण्यात येतील. |

३४) **श्री दिलीप लक्ष्मणजी नरवडीया, नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | भारतात सर्वात जास्त तापमान विदर्भात का आहे, तर येथे पॉवर प्लॅन्ट चालत असल्याने येथे तापमानात प्रचंड वाढ झालेली आहे. साथियों, ज्याच्या घरी कॅन्सरने मृत्यू झालेला आहे, ज्याच्या कुटुंबातील लोक प्रदूषणामुळे, श्वसनाच्या त्रासाने मरण पावलेले आहेत, तर त्यांच्या घरातील लोकांची स्थिती कशी असेल हे सांगण्याची गरज नाही.<br>आज सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो की विदर्भात ७,२०० मेगावॅट वीजेचे उत्पादन होते. नागपूर जिल्ह्याला वीजेचा पुरवठा आहे २,८०० मेगावॅट. उर्वरित ४,४००.० मेगावॅट येथील कोळसा, येथील पाणी वापरुन पुणे,मुंबई येथील रस्ते झगमगीत करतात. पुण्यातील सॉफ्टवेअर कंपन्या वीज विदर्भातून जाते. त्यासाठी पाणी विदर्भातील, कोळसा विदर्भातील वापरला जातो. त्यांना वीज हवी आहे, तर त्यांनी त्यांचे पॉवर प्लॅन्ट त्यांच्या परिसरात उभारावे. आम्हांला आता अतिरिक्त वीजेची गरज नाही. तरी या प्रकल्पास आमचा विरोध आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

३५) **श्री लीलाधर भोयर, गट ग्रामपंचायत लोणकरी,जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | माझ्या ग्रामपंचायतीतर्फे मी या प्रकल्पास पाठिंबा देत आहे. येथे सर्वांनाच माहित आहे की येते जमिन, पाणी उपलब्ध आहे. काही लोकांनी प्रदूषणामुळे दुसरीकडे न्या असे | प्रकल्पात स्थानिक व प्रकल्पग्रस्तांना नोकरीची संधि देण्यात येईल असे परत आश्वासन देण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | सूचविले. तर प्रदूषण हे अगोदर होतच होते. काही लोक गावागावात फिरुन प्रकल्पामुळे कॅन्सर व इतर आजार होतात हे सांगत फिरत आहेत. पण आजार जर होणार असेल, तर येथील दहा गावांनाच कशी होतील? सर्वांनाच व्हायला पाहिजेत. येथील प्रकल्पात आमच्या मुलांना नोक-या मिळाल्याच पाहिजे ही अपेक्षा. | |

३६) **श्री इफाज अहमद, माजी उपाध्यक्ष, कामठी नगरपरिषदः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कामठी हे वीणकरांचे शहर आहे, बीडी मजूरांचे शहर आहे, कामठीच्या तीन्ही बाजूंनी भारतीय सेनेचे ठिकाण आहे. १,८०,००० लिटर पाणी रोज आपल्या सेनेला देण्यात येते. तर कधिही भारतीय सेनेकडून राख पाण्यात आल्याची तक्रार आलेली नाही. खापरखेडला पण प्रकल्प आहे. कधिही भारतीय सेनेची तक्रार आलेली नाही. तर येथे प्रकल्प आल्याने स्थानिकांना रोजगार मिळेल. तरी माझी विनंती आहे की सदरहू प्रकल्प लवकरात लवकर सुरु व्हावा, | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

३७) **श्री भीवा तांडेकर, बीना संगम सामाजीक कार्यकर्ताः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जे पर्यावरणप्रेमी आहेत, येथून पाच कि.मी. अंतरावर माझे गांव असून मी प्रकल्पग्रस्त आहे. येथील पर्यावरणप्रेमी यांनी प्रश्न विचारायचा आहे की यांना प्रदूषणाचा त्रास होतो आहे की कोराडीला प्रकल्प येत आहे म्हणून त्रास होत | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | आहे. जर दुसरीकडे न्यायचा आहे, तर येथील कामगारांनी काय करावे?<br>माझ्या गावात बेरोजगारीमुळे कितीतरी लोकांवर चोरीच्या केसेस झाल्या. त्याला केवळ जबाबदार महाराष्ट्र शासन आहे. मी बेरोजगार आहे. माझ्या मित्रांनी बिनव्याजी ट्रक्स घेतले. गावातील ८०% लोक हे राखड, वाळू भरत असतात. त्यांना प्रदूषणाचा त्रास होत नाही का? तरी येथे प्रकल्प हा झाला पाहिजे. | |

३८) <u>श्री राहूल सोणारे, घोगली सरपंच, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी घोगली गावाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी या जनसुनावणीत उभा आहे. माझे गाव हे हजार लोकसंख्येचे आहे. गावाची जमिन ही ३०० हेकटर आहे, त्यातील १५० हेक्टर ही जमीन नदीनाले व कोराडीची तलाव नं.३ यासाठी अधिगृहित करण्यात आलेली आहे. उरलेल्या ५०-६० एकर जमीनीत ले-आऊट पडलेले आहेत. १००% माझ्या गावात बेरोजगारी आहे. जमिन अधिग्रहित करुनसुध्दा माझ्या गावातील युवकांना या पॉवर स्टेशनमध्ये रोजगार उपलब्ध झालेला नाही. तलाव निर्मिती झाली, तेथे पावसाळ्यात गेट बंद असतात. गेट बंद असल्याने नाल्याचे पाणी हे आजूबाजूच्या शेतीत येते. त्यामुळे शेतातील पीके पायदळी तुडविल्या जातात. त्या शेतक-यांना कुठल्याच प्रकारची नुकसानभरपाई मिळत नाही. आम्हांला सांगितले जाते की ही नैसर्गिक आपत्ती असून आपण तहसीलदारकडे नुकसानभरपाईची मागणी | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. प्रक्रियाकृत सांडपाण्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | करा. महाजेनकोकडून कुठलीच नुकसानभरपाई मिळत नाही. | |
| | दुसरी गोष्ट गावाला लागून बांबूचे रोपण झालेले आहे. त्या बांबूला मागच्या वर्षी आग लागली होती. गावाला आग लागली असे होत होते. संपूर्ण धूर व जळलेले लाकूड येत होते. तरी महाजेनकोला विनंती आहे की गावठाणाला लागून जी बांबूची झाडे आहेत, ते काढून टाकून सरकारी पांजर मोकळी करावी. येथे ६६० मेगावॅटचा प्रकल्प येणार आहे. तर त्यापेक्षाही मोठ्या क्षमतेचा सुरु करा, पण या प्रकल्पामुळे होणा-या समस्यांचा विचार व्हायला पाहिजे | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |

३९) **<u>सौ. सविता रामचंद्र जितकार, पंचायत समिती सदस्य,कोराडी सर्कलः-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | आमच्या येथे बेरोजगार आहेत. हा १३२० मेगावॅटचा प्रकल्प सुरु झाल्यास आमच्या येथील बेरोजगारांची संख्या कमी होईल. या कोराडी सर्कलमधील तेराही ग्रामपंचायतीत जे बेरोजगार आहेत, ते शेतकरी वर्ग आहे. पूर आला किंवा वादळ आले तर त्यांच्याकडे जेवणाची परिस्थिती नसते. त्यांच्या दोन वेळच्या जेवणाची सोय नसते. जर हा प्रकल्प झाला तर आमच्या .येथील लोकांची खाण्याची तरी सोय होईल. काही दुस-या भागातील पर्यावरण पर्यावरण म्हणणा-या लोकांना मी सांगू इच्छिते की बेरोजगारीने कुटुंबात भांडणे व शेवटी कंटाळून बेरोजगाराने आत्महत्या करण्यापेक्षा जर या प्रकल्पामुळे दोन वेळच्या जेवणाची सोय होत असेल, तर प्रर्यावरणाचा धोका स्विकारणे आम्हांला मंजूर | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पात स्थानिकांना व प्रकल्पग्रस्तांना रोजगारात प्राधान्य देण्यात येणार आहे अशी ग्वाही परत देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | आहे. तरी या प्रकल्पास मान्यता देण्यात यावी. तरी तेराही गावातील बेरोजगारांना बेरोजगारमुक्त करावे ही विनंती करते. | |

४०) <u>श्री प्रकाश भालेराव, महाराष्ट्र राज्य वीज निवृत्ती कामगार संघ-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मला एवढेच सांगायचे आहे की पर्यावरणाच्या नावाने एवढा आगडोंब सुरु आहे. आम्हांला मान्य आहे की शासनाचे पर्यावरणाबाबत कडक निर्देश आहेत. येथील वातावरण चांगले राहावे हाही पर्यावरण खात्याचा हेतू असतो. मी थर्मल पॉवर स्टेशन व्हावे या मताचा आहे. कारण या थर्मल पॉवरमधून ३८ वर्षे सेवा करुन निवृत्त झालेलो असून मजबूत व ठळकपणे वावरत आहे. गेले दहा वर्षे निवृत्त कामगार या परिसरात राहतात. अजूनही सकाळी ५ - ५.३० वाजता रोज पाच कि.मी. फिरायला जातात. येथील आम्ही सर्व निवृत्त आरोग्यवान आहोत, बैठकीत उपस्थित केलेल्या शंका म्हणजे श्वसनाचा त्रास, कॅन्सर वा त्यासारखे दुर्धर आजार आम्हांला नाहित. येथे काही पर्यावरणवादींनी पुस्तकी पाढा वाचलेला आहे. एखाद्याला माणूस म्हणून तसा त्रास कदाचित झालेला असेल, त्यास विरोध नाही. पण येते पॉवर स्टेशन व्हावे ही माझी व माझ्या निवृत्त संघाची मागणी आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

४१) <u>राष्ट्रधन भीमराव चंद्रशेखर,मागासवर्गीय कल्याणकारी सचिवः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | माझा जन्म होण्यापूर्वी १९७४ ला येथे प्रकल्प सुरु झालेला आहे. १९७४ पासून आजपर्यंतचे रेकॉर्ड तपासल्यास कोणालाच त्रास नव्हता. २०११ ला तत्कालीन उर्जामंत्री यांच्या हस्ते ६६० मेगावॅटचे उद्‌घाटन झाले. त्यावेळेस मी विद्‌यार्थी असताना पाहिले की या प्रकल्पास एकाही माणसाने विरोध केला नाही. आज नाग नदीचे प्रदूषण बघितले. मी पॉलिटेकनिकला असताना त्या रस्त्याने जात असे. जाताना वास सहन व्हायचा नाही. पर्यावरणवादी आता पैदास झाले आहेत. पूर्वीला हे पर्यावरणवादी होते कुठे?आज एवढा मोठा प्लॅन्ट आला, लोकांना रोजगार मिळाले, येथे जेवढी पर्यावरणवादी आहेत, मी संभाजीअनगर मध्ये राहतो. प्रकल्प व संभाजीनगर यांचे अंतर जवळजवळ शून्य अंतरावर आहेत. ४५ वर्षापासून आम्ही लोक तिथे राहत आहोत. आताही तिथे लोक राहत आहेत. माझ्या वडिलांचे वय ७५ वर्षाचे आहे. त्यांना प्रकल्पापासून कोणताच त्रास झालेला नाही. वयोमानानुसार त्यांना आजार आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | मी माहिती अधिकारी, २००५ चा कार्यकर्ता आहे. मी लहानपणापासून येथे मोठा झालो. मला प्लॅन्टमुळे आजार झालेला नाही. प्रकल्पामुळे येथील १० कि.मी. परिघात अद्‌याधुनिक सुसज्ज आशा विविध हाऊसिंग सोसायटी होत आहेत. नागपूरचे खूप लोक सुट्‌टीच्या दिवशी पर्यटनासाठी येते येत असतात. येथे खूप लोकांनी त्यात प्र्यावरणवादी आहेत, करोडो रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. प्रकल्प हा समाजविकासासाठी येतो. येथून जवळच वारेगाव येथे एनडीआरएफचे प्रशिक्षण केंद्र विकसित करण्यात येत आहे. तरी हा प्रकल्प लवकरात लवकर सुरु व्हावा. | समितीने सांगितले की,सूचनेची नोंद घेण्यात आली. |

४२) <u>श्री आकाश सुखे, कॉंग्रेस पार्टी कामगार सेना-नागपूर जिल्हा ग्रामीणः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी येथे राहत असताना कामगारांच्या समस्या पाहत आहे. पण नागपूर येथील मी पहिली व्यक्ती आहे की मला भारत सरकारकडून कामगारांसाठी प्रशिक्षण देण्यात आले. हा प्रकल्प येथे सुरु झालाच पाहिजे, मात्र मी महाजेनकोला सांगू इच्छितो की येते टेंडरने काम करण्यात येते. त्यात भ्रष्टाचार आहे. मी आरटीआय कार्यकर्ता असून माझ्यावर ३-४ वेळा हल्ले झालेले आहेत. मी कामगार हितासाठी काम करतो. येथे ॲश बंड फुटला. त्या कंत्राटदारावर कारवाई का झाली नाही? | येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी फक्त प्रस्तावित प्रकल्पाविषयी विचार, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| २) | श्री आकाश सुखे यांनी सांगितले की बाबासाहेबांनी सर्वांना बोलण्याचा अधिकार दिलेला आहे. गार्डनचा बावीस कोटींचा भ्रष्टाचार झाला. हा प्रकल्प जनतेच्या पैशातून येत आहे. प्रकल्प येऊ द्या.. लोकांना रोजगार मिळालाच पाहिजे. करोनामध्ये महादुला येथील ५४ लोक मरण पावले. मात्र एकही आमदार आला नाही. हा प्रकल्प झाला पाहिजे. जर प्रकल्प झाला नाही, तर मी आंदोलन करीन.<br>मी महादुलाला उपोषण केले. आम्हांला पाणी हे एमएसईबीच्या सीएसआर निधीतून मिळालेच पाहिजे. मी सादर केलेल्या १६ मुद्द्यांवर काम झाले पाहिजे. येथील दवाखान्यात २४ तास | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | डॉक्टर उपलब्ध पाहिजे. गोळ्या उपलब्ध असालया पाहिजे. | |

४३) <u>सौ नलिनी महेश धुडप, नगरसेवक, नगरपंचायत, महादुलाः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे बरेच लोक सूचना, विचार उपस्थित करण्यासाठी जमलेले आहेत. तर प्रत्येकास बोलण्याची संधि देण्यात यावी. आपण वेळ मर्यादित ठेवावी. येथे जो प्रकल्प येणार आहे,तर खूप लोक येथे फक्त प्रदूषण प्रदूषण म्हणत आहेत. गेले ५० वर्षे प्रकल्प कार्यान्वित असून येते कामगार काम करत आहेत. त्यांच्या बाबतीत कोणीच बोलत नाही. आमच्या महादुला पंचायत समितीच्या वतीने या प्रकल्पास समर्थन आहे. प्रकल्प येथेच झाला पाहिजे. | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आली |

४४) <u>श्री विक्रम राऊत, माजी ग्रामपंचायत सदस्य,कोराडी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष संघटन सचिवः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या कोराडीत नविन प्रकल्पाचे स्वागत करत आहे. माझे निवेदन आहे माझ्या शेतात राख पडते, मी राखग्रस्त आहे. मी माझे निवेदन सादर करत आहे. कृपया त्याचा विचार करावा ही विनंती. | सूचनांची नोंद घेण्यात यावी. समन्वयक यांनी सांगितले की, पाहणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, याची शहानिषा करून उपाययोजना करण्यात येईल. |

४५) **श्री भीमराव बाजनगाटे, वीज कर्मचारी अधिकारी अभियंता सेनेचा सहसरचिटणीसः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी माझ्या संघटनेतर्फे मा. जिल्हाधिकारी,नागपूर आणि पर्यावरण अधिकारी यांना माझ्या संघटनेतर्फे विनंती करतो की प्रस्तावित प्रकल्प हा कोराडीतच व्हायला पाहिजे. नियमानुसारच व्हायला पाहिजे. ते कोराडीलाच मंजूर झालेले आहेत. जे पर्यावरणाच्या नावाने विरोध करत आहेत, त्यांना या प्रकल्पाविषयी काहीही देणेघेणे नाही. ते विरोधाला विरोध करत आहेत. प्रकल्प म्हणला की प्रदूषण हे आलेच, हा आधुनिक प्रकल्प असल्याने येथे प्रदूषण अगदीच कमी आहे. सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे जर योग्य प्रकारे काम केल्यास प्रदूषण हे नाहीच्या बरोबर आहे. जर पॉवर प्लॅन्टला विरोध करायचा आहे, तर सर्व पॉवर प्लॅन्ट बंद करा, मग बघा. पर्यावरणाच्या नावाने विरोध करण्याचे कारण वेगळे आहे. विरोध करणा-यांनी बेरोजगारांना त्यांच्याकडे प्रथम नोकरी द्यावी व नंतर प्रकल्प बंद करावा. जर आपण नोकरी देऊ शकत नाहीत, तर रोजगारही कोणाचा घेऊ शकत नाही. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रणाकरिता सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येईल. |

**४६) श्री मोहित शर्मा, अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी फेडरेशनः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोराडीला जो प्रस्तावित २४६६० मेगावॅट सुपरक्रिटिकल औष्णिक विद्युद प्रकल्प आहे, त्यासाठी येथे प्रर्यावरणविषयक जनसुनावणी चालू आहे. प्रकल्पाबाबत आमचे स्पष्ट म्हणणे आहे की महाराष्ट्राची जी वीजेची मागणी आहे, महत्तम मागणी ही २८,०००.० मेगावॅट आहे, तर बाहेरच्या खाजगी कंपनीकडून ती विकत घेऊन | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्रातील जनतेस पूरवत आहोत. येथे काही प्रश्न आहेत. त्यांचा विचार व्हायलाच पाहिजे. प्रकल्पामुळे काही पर्यावरणीय प्रश्न तयार होतील, तर आज जे तंत्रज्ञान उपलब्ध झालेले आहे, ते आत्मसात करुन यातून मार्ग काढणे आवश्यक आहे. प्रश्न उत्पन्न होतात, ते महाजेनको व्यवस्थापन, शासन व जनता हे एकत्र बसून सोडवितात, तसे सोडविण्यात यावे. त्यासाठी प्रकल्पाला विरोध करु नये. या प्रकल्पाची महाराष्ट्राला गरज आहे, त्यासाठी लागणारी पायाभूत सुविधा ही कोराडीला उपलब्ध आहे. १२ हजार कोटी रुपये येथे उपलब्ध आहेत. | |
| २) | जर प्रकल्प दुसरीकडे नेला, तर बारा हजारपेक्षा जास्त खर्च वाढेल व सरकारच्या तिजोरीवर जास्त भार पडेल. पण पर्यावरणाचा प्रश्न आहे हे विसरता कामा नये. पण हे सर्व प्रश्न त्रिसदस्य समितीने पुढाकार घेऊन सोडविण्यात यावेत. प्रदूषण नियंत्रण आवश्यक आहेच, तरी या सर्वांचा समन्वय साधून प्रकल्प सुरु करावा. लोकांच्या आरोग्याचा प्रश्न,झाडे लावण्याचा प्रश्न आहे, स्थानिकांना नोकरी देण्याचा प्रश्न आहे हे प्रश्न सोडविण्यात यावेत. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता ईएसपी व एफजीडी संयंत्रणा बसविण्यात येईल. |

४७) <u>मिस संगिता भूजालवटी, महादूला नगरपरिषदेची नगरसेविका:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | माझे प्रकल्पास समर्थन आहे.<br>मात्र माझी इच्छा आहे की स्थानीकांना काम देण्यात यावे. येथे बरेच तरुण-तरुणी बेकार आहेत. तसेच कोराडी गावात प्रकल्प आहे, पण मुलांना बाहेर जाऊन नोकरी करावी लागते, ही मोठ खंत आहे. तरी स्थानिक बेरोजगारांना नोकरीची संधि देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

४८) <u>श्री दिनेश नायडू,सेक्रेटरी, विदर्भ कनेक्ट संस्था:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी पुर्वीपासून प्रकल्पाचा निरिक्षक आहे. मी २०१९ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला प्रकल्पाचा जो नकारात्मक परिणाम आहे, त्याबाबत कळविले आहे. आमच्या लेटरहेडवर ईआयए अहवालात त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. मात्र त्याचे उत्तर आजपावेतो मला मिळालेले नाही. त्यांनी जनसुनावणीची व्यवस्था उत्तमप्रकारे केली म्हणून प्रशासनाचे आभार मानले.<br>प्रकल्प होईल किंवा होणार नाही हा पुढील प्रश्न आहे. बैठकीत बहुसंख्य लोक हे प्रकल्प यावा या विचाराचे आहेत. प्रकल्पास विरोध करणारे कमी प्रमाणात आहे. मी सदर भागात राहतो. २०१० पासून आपणासाठी मी संघर्ष करत आहे. त्यास १३ वर्ष झाली. प्रकल्पात एफजीडी अजूनही कार्यान्वित करण्यात आलेली नाही, त्यामुळे प्रचंड प्रमाणात प्रदूषण होते. येथे मी कंत्राटे मागत नाही. हा प्रकल्प एका खोट्या गोष्टीवर उभा करण्यात आलेला आहे. ते समजून घ्या. येथे प्रत्येकजण नोकरीचाच विचार करत आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, कार्यरत प्रकल्पामध्ये एफजीडी संयंत्रणा लावण्याचे काम सुरू आहे. तसेच नवीन प्रकल्पामध्ये एफजीडी संयंत्रणा बसविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २) | प्रकल्पाच्या ईआयए अहवालानुसार ५३४ पदे प्रकल्पात भरण्यात येतील. त्यात १४५ लोक तर प्लॅन्ट ऑपरेशनमध्ये राहतील.<br><br>तर ३०० व्यक्ती हे मेन्टन्समध्ये कंत्राटी पध्दतीने राहतील. ९० लोक हे सप्लायमध्ये राहतील. बाकी सर्व पदे ही कंत्राटी राहणार आहेत. जशी प्रगती होते, तसे सर्व प्रकल्प हे अत्याधुनिक होतात. आधीचा प्रकल्पसुध्दा सुपर क्रिटिकलच होता, प्रकल्पात एफजीडी न लावल्याने राख बाहेर येते. मला येथे दुःख वाटते की येथील तरुण येथील तांत्रिक बाब लक्षात घेत नाही | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | नविन प्रकल्पास आपली जमीन व पाणी जात आहे. प्रदूषण विदर्भाने का सहन करायचे. महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेले आहे की २०२५ पर्यंत ७,००० मेगावॅट सोलर उर्जाव्दारे करणार आहे. तर या १२,००० कोटी प्रकल्पाची काहीही आवश्यकता नाही यात फायदा कंत्राटदारांचा व महाजेनकोच्या अधिकारी व कर्मचारी यांचा होणार आहे. यात फायदा कोल वॉशरीच्या मालकाचा होणार आहे. ते महिन्याला करोडो कमावणार आहेत. यात खाजगी कंत्राटदारांचा फायदा होणार आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | विदर्भ या प्रकल्पास विरोध करत आहे. जनसुनावणी आयोजित करण्याच्या निर्देशांचे येते उल्लंघन करण्यात आलेले आहे. बैठकीत दर्शविण्यात आलेले सादरीकरणातील माहिती व | सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, रोजगार उपलब्ध करुन देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | जोडपत्र यात तफावत आहे. जर भारत सरकारने आमचे म्हणणे ऐकले नाही तर आम्ही न्यायालयाकडे दाद मागणार आहोत. आम्ही स्थानिकांना रोजगार व आरोग्यसेवा उपलब्ध करण्याच्या बाजूने आहोत. | |

४९) <u>श्री संदीप कोडापे, ग्रामपंचायत सुरादेवी, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या ग्रामपंचायतीतर्फे या प्रकल्पास पाठींबा आहे. ग्रामपंचायतीच्या २-३ अटी आहेत - आमच्या परिसरात पिण्याचे व वापरायचे पाणी हे चांगले येत नाही. तरी आमच्या गावात त्वरित प्रकल्प प्रवर्तकांनी एक फिल्टर प्लॅन्ट बनवून द्यावा.<br>प्रकल्पाने शेतक-यांवर जास्तीतजास्त लक्ष द्यावे. कारण थोड्या प्रमाणात का होईना, राखेमुळे पीकाचे नुकसान होते. त्यामुळे आमच्या गावातील शेतकरी नाराज आहेत. विनंती आहे की त्यांच्यावर लक्ष ठेवण्यात यावे. | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आली.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल. |

५०) <u>श्री विजय पाटील, सचिव, राष्ट्रीय मजदूर सेना, नागपूर जिल्हाः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जे लोक विरोधी आहेत, त्यांचे पोट भरलेले आहे. ज्यांची अर्धि पोट भरली, ते येथे येत आहेत. प्रकल्प आला की त्याला विरोध करायचा. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | कुठलाही प्रकल्प आला की प्रदूषण होईल म्हणून बंद करायचा. प्रकल्प आला म्हणजे प्रदूषण थोडे तरी होणारच. तरी मंजूर केलेला प्रकल्प हा इथेच झाला पाहिजे. जर दुसरीकडे प्रकल्प न्यायचा असेल तर त्याठिकाणी नविन प्रकल्प मंजूर करण्यात यावा. जर येथे प्रकल्प झाला नाही तर येते जनआंदोलन करावे लागेल. | |

५१) <u>श्री अरविंद खोबे, राहणार-कोराडी,जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गेले ४० वर्षे कोराडीत राहतो, गरीबी काय है चांगलेच अनुभलेले आहे. मी येते विरोध करणा-यांना एवढेच म्हणेन की शेतक-यांच्या मुलाने मग आत्महत्याच करावी का? कोटी रुपयांच्या फ्लॅटमध्ये राहणा-या आपले नांव यावे म्हणून प्रकल्पास विरोध करतात.<br>महाजेनकोच्या अधिका-यांनी जर सोयीसुविधा वेळेवर पुरविल्या असत्या तर एवढी वेळ आली नसती. कारण त्यावेळीसुध्दा सुपर क्रिटिकलच प्रकल्प होता. करोनावरसुध्दा औषध काढले, तर ह्या प्रश्नांवरसुध्दा उपाय निघू शकतो. तरी हा प्रकल्प कोराडीतच आणावा लागेल. आजूबाजूच्या शेतक-याना चार पैसे कसे कमवायचे हे शिकू द्या, | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

५२) <u>श्री आकाशचंद्रमांजी मोझे.</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आता मी महत्वाचा विषय सांगणार आहे, तो गेले दहा वर्ष प्रलंबित आहे. या विषयासाठी आंदोलन केली, पत्रे पाठविली. मी प्रकल्पग्रस्त आहे. कुशल प्रशिक्षणार्थी. २०० मेगावॅट येथे सुरक्षितता या विभागात काम करत आहे. आमची जमीन घेताना सांगितले की आम्ही नोकरी देऊ. पण औरंगाबाद हायकोर्टाचा निर्णय आहे की तंत्रज्ञानासाठी आमची परिक्षा ही घेण्यात यावी. आता आमच्याकडे ८वी, १० वी व १२वी शिकलेली मुले आहेत. त्यांना कॅमप्युटर येत नाही. जे आमचे ट्रेड आहेत, ते विचारत नाहीत. तसेच जो तीसाव्या वर्षी लागतो, तो ४५ व्या वर्षी रिटायर होतो. काम करताना विम्याचे छत्र नाही. वैदकीय सुविधा नाहीत. प्रॉव्हिडंट फंडसुध्दा नाही. तरी यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात यावी.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, यावर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. नवीन प्रकल्पामध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. |

५३) <u>श्री देवरावजी गंगाराम पांडे, माजी सरपंच, वारेगाव, जिल्हा-नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वारेगावमधील १,००० एकर जमीन महाजेनकोने अधिग्रहित केली. ज्यांची जमिन अधिग्रहित करण्यात आली, त्यांना रोजगार मिळाला, पण त्याच्या शेजारी किंवा आजूबाजूला शेती, घरे आहेत, त्यांना प्रदूषणाचा असा फटका बसतो. माज्या शेताला लागून महाजेनकोचा एक राखडचा बंधारा आहे. बंधाराच्या बाजूला एक नाला आहे. त्यातून माझ्या व जवळील १७-१८ लोकांच्या शेतात राखड येते. याची तक्रार नागपूर येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व खापरखेडा येथे केलेली आहे. या प्रकल्पामुळे | सूचनांची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, याची शहानिशा करुन योग्य ती उपाययोजना करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | शेतात जाण्या-येण्यासाठी रस्ताच नाही. त्यामुळे गेले सात वर्षे शेत पीडीत पडलेले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास आतासुध्दा निवेदन दिलेले आहे. त्याबाबत काहीच होत नाही प्रकल्प झाला पाहिजे, प्रकल्पास माझे समर्थन आहे. तरी आमच्या अडचणी त्वरित सोडविण्यात याव्यात. | समन्वयक यांनी सांगितले की, पाहणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |

५४) <u>श्री नरेन्द्र भांगे, उपाध्यक्ष, प्रकल्पग्रस्त कृती समिती -</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे काही लोक प्रकल्पाच्या बाजूने बोलले, तर काही प्रकल्पाच्या विरुध्द बोलले. येथे इतकी वर्षे प्रकल्प कार्यरत आहे, तर येथील लोक बेकार का आहेत? माझी स्वताःची जमिन गेलेले आहे, सन १९७२ मध्ये. पुनर्वसन कार्यालयात तीन वर्षे चपल्या झिजवल्यानंतर मला प्रकल्पग्रस्त म्हणून प्रमाणपत्र मिळाले. तरी मला महाजेनकोने कायमस्वरुपी नोकरी दिलेली नाही. गेले आठ वर्षे मी प्रशिक्षणार्थी म्हणून मी काम करत आहे. फक्त १५,००० रुपयात माझा परिवार पोसत आहे. मात्र एमएसईबीतील टेकनेशियन याला ३५,०००/- रुपये पगार मिळतो. ज्या जमिनीचे मालक होतो, त्या जमिनीचे | सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, योग्यतेनुसार स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | नोकरसुध्दा आम्हांला बनवू शकत नाही. येथे जे प्रकल्पग्रस्त मुले आलेली आहेत,कारण त्यांना एक आशा आहे की नविन प्रकल्पात रोजगार मिळेल. कंपनीने नियमानुसार जर रोजगार दिला, तरच यांना रोजगार मिळणार आहे. येथे प्रकल्प पाहिजे, पण नियुक्ती करताना पारदर्शकता असायलाच पाहिजे. तरी पारदर्शकता प्रकल्प पाळतो की नाही हे पाहणे शासनाची जबाबदारी आहे. | |

५५) <u>श्री पंकज सोर, महादुला संघर्ष समितीः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महादुला संघर्ष समितीतर्फे मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आलेले आहेत की महाजेनकोतर्फे सीएसआर अंतर्गत पाणी मोफत मिळाले पाहिजे. पण आम्हांला मोफत पाणी मिळत नाही. म्हणून आम्ही उपोषण करतो. तरही आमची दखल घेतली जात नाही. मग प्रकल्प कसा येईल? प्रकल्प कोराडीतच यायला हवा. प्रकल्प येईल. यासाठी पूर्वीची आश्वासने पूर्ण करणे गरजेचे आहे. रोजगारासाठी स्थानिक व प्रकल्पग्रस्तांना दोन लाखांची लाच द्यावी लागते. नंतर ठेकेदारी मिळते किंवा नोकरी मिळते. मग अशा प्रकल्पाची गरज काय आहे? प्रकल्पात गुणवत्तेनुसार नोकरी मिळणार असेल तरच प्रकल्प हवा. त्याचप्रमाणे ज्या सोयीसुविधांची मागणी केलेले होती, त्या सर्व सोयीसुविधा स्थानिकांना मिळाल्याच पाहिजेत. नागपूरला किमान रुपये ११०/-- रुपयावर पिण्याचे पाणी मिळते. आम्हाला १८० रुपयांनी ते खरेदी करावे लागते. त्याच्यातही महिना ५६० रुपये घेतात. मग बेरोजगार स्थानिक म्हणतात | सूचनांची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तक म्हणाले की, सीएसआर अंतर्गत उपक्रम राबविले जातील. स्थानिकांना रोजगार देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | प्लॅन्ट कशाला पाहिजेत? प्लॅन्ट पाहिजे पण स्थानीकांना सर्व सोयीसुविधा पुरविल्यानंतरच पाहिजे. ८०% स्थानिक म्हणजे स्थानिकच, म्हणजे कामठी सोडता इतर सर्व विधानसभा क्षेत्रात एमआयडीसी आहेत.<br>तरी मी निवेदन करतो की प्रकल्प हा कोराडीलाच यायला हवा. पण पूर्वी आश्वासित केलेल्या सर्व सोयीसुविधा व आता केलेल्या सर्व सोयीसुविधासहित. | |

५६) <u>श्री नफिज शेख, पर्यावरण नं.१ न्युज पोर्टल मॅगझिन आणि एक साप्ताहिक चालवतो.</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | २०२२-१३ वर्षापासून नागपूर जिल्ह्यात खास करुन कामठीला राहणे. पर्यावरणाचा विद्यार्थी असल्याने पर्यावरणाचा छोटा-मोठा अभ्यास करतो. लॉक डाऊन असताना एनजीटीचे प्रदूषित नदीबाबत जे निर्देश होते आपल्या कोलार आणि कन्हान नदीच्या प्रदूषणाबाबत, तर त्याची फक्त एकच बैठक झालेली आहे. त्याची २०१९ पासून फक्त एकच बैठक झालेली आहे. त्यात महादुलाचे मुख्य अधिकारी, तहसीलदार, जिल्हा अधिक्षक ग्रामीण इ. ची समिती गठित करण्यात आलेली होती.<br>२०२१ मध्ये अजून एक अधिसूचना आली. की प्रदूषित नदीतील रेतीचा लिलाव होणार नाही, आज काय दिसते?<br>त्यांनी सांगितले की या प्रकल्पास विरोध आहे पण, नाही, पर्यावरणवादी तुमचा दुश्मन नाही. शंभरमधील एक काम करतो, तो आपल्या भविष्यासाठी करतो. | समितीने सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| २) | त्यांनी आक्षेप नोदविला की प्रकल्पापासून चार कि.मी. अंतरावर भारतीय फौजेच्या दोन कमांड आहेत. एक कॅन्टोनमेंट बोर्ड आहे. त्यांनी आक्षेप नोदविला की कन्हान नदीची जैव-वेविधता पूर्णपणे संपली. कन्हान नदीत पाणी नाही. फक्त राख आहे. बोट टाकले तर फक्त राख येते.<br><br>कंपनीने अजूनही एफजीडी प्रकल्पात कार्यरत केलेला नाही.<br>त्यांनी आक्षेप नोंदविला की जैव-वैविधता आपण सांभाळू शकू का. महाजेनको हरित पट्टा विकास कार्यक्रम वेळोवेळी हाती घेते. तर त्यास जिओ टॅगिंग का करण्यात येत नाही? | सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कार्यरत प्रकल्पात एफजीडी लावण्याचे काम सुरु आहे. नवीन प्रकल्पात एफजीडी लावण्यात येईल. |
| ३) | आक्षेप नोंदविला की या प्रकल्पाविषयी चार याचिका या प्रलंबित आहेत.<br>तरी या प्रकल्पास विरोध करतो. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

५७) <u>श्री राजेश माधवराव गोरले, महाराष्ट्र राज्य वीज तांत्रीक संघटनेचा केंद्रीय पदाधिकारी:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | १३२० मेगावॅटचा प्रकल्प येथे स्थापित होत आहे. या प्रकल्पास माझ्या संघटनेच्या सर्व सभासदांचा पाठिंबा मी जाहिर करतो. तसा प्रस्ताव मी जिल्हाधिकारी-नागपूर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनाही सादर केलेला आहे. त्या प्रस्तावात समर्थनार्थ सहा मुद्दे मांडले आहेत. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |
| २) | ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. येथे बैठकीत काहींनी विरोध दर्शिविला. त्यांचा विरोध हा बरोबर असू शकतो. पण मी या | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | औष्णिक वीज केंद्राच्या परिसरात जन्मलेला एका माजी कर्मचा-याचा मुलगा आहे. येथील प्रदूषणामुळे येथील माता या मुदतपुर्व बाळांना (pre-mature) जन्म देतील. हे अत्यंत हास्यास्पद आहे. कारण या प्रकल्पातील प्रदूषणापेक्षा इतर पॉवरहाऊसमध्ये जास्त प्रदूषण होते. | |
| ३) | पर्यावरणवाद्यांनी येथे चर्चा केली की येथे ॲश बंड फुटतात. त्याकाळात ती राख होती. त्या काळात १२० मेगावॅटचे युनिट होते. त्याला जास्त कोळसा लागत होता, त्यामुळे राखड हेही जास्त होते. आता सुपर क्रिटिकल ६६० चे युनिट आलेले आहे. मी कोळसा हातळणी विभागात काम करतो. आजही तुमच्याससमोर ठणठणीत उभा आहे. म्हणजे प्रकल्पातील प्रदूषणाचा माझ्या शरीरावर परिणाम व्हायला पाहिजे होता. आमची कंपनी दरवर्षी कर्मचा-यांच्या आरोग्याची तपासणी ही घेत असते. जर फुफ्फुसात काही आढळल्यास त्यावर वेळेत उपचार केले जातात. | सूचनांची नोंद घेण्यात येते. |
| ४) | या प्रकल्पात वेगळा पर्यावरण विभाग स्थापित केलेला आहे. पर्यावरण विभाग आजूबाजूच्या गावात दरवर्षी आरोग्य शिबिर घेत असते. मी त्या शिबिरात बरेच वर्षे काम केलेले आहे. आरोग्य तपासणी व गोळ्या औषधांचा पुरवठा करत असतो.<br>हे सर्व निर्देश आमच्या कंपनीतर्फे पाळले जातात. कंपनीचा पर्यावरण विभाग विशेष लक्ष देतो. आमच्या या प्रकल्पास स्टार ग्रेड बक्षिसे मिळालेली आहेत. | उपस्थित केलेल्या विचारांची नोंद घेण्यात आली, असे समितीने सांगितले. |
| ५) | मी पर्यावरणवाद्यांना सांगू इच्छितो की तुम्ही हा प्रकल्प घालविण्याचा विचार करु नये, तुम्ही | सूचनांची नोंद घेण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| | आमच्या पाठीशी उभे राहा. जी मानके जागतिक स्तरावरिल आहेत, ती येथे लागू करावी यासाठी भांडण्यात यावे. आम्हीसुध्दा तुमच्या सोबत येऊ. तरी जी मानके आहेत, ती तंतोतंत पाळण्याचा आग्रह धरण्यात यावा. | |
| ६) | या प्रकल्पामुळे अनेक लोक प्रकल्पग्रस्त आहेत. आमची संघटनासुध्दा त्यांच्या पाठीशी आहे. १९९४ पर्यंत प्रकल्पग्रस्तांसाठी विशेष भरती घेतली जात होती. त्यासाठी आमची संघटना ही पाठपुरावा करत आहे. यासाठी आपणही पाठपुरावा करावा. | सूचनांची नोंद घेण्याच आली. |

५८) **<u>श्री सुधीर पालीवाल, व्हाईस प्रेसिडेंट, विदर्भ कनेक्ट,संयोजक, विदर्भ पर्यावरण कृती समिती:-</u>**

मला वाटते ही रोजगारविषयक जाहिर जनसुनावणी आहे. ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे, मात्र येथे तसे काहीही झालेले नाही. मी गेले २५ वर्षे जनसुनावणीस हजर राहात आहे. विदर्भात १३२ पॉवर प्लॅन्ट येणार होते, १५ वर्षांपूर्वी. त्यांना आम्ही विरोध केला. त्यातील काही आले नाहीत. आताच येथे एका उपस्थितांनी सांगितले की लॅनको सुध्दा आला नाही. जे पॉवर प्लॅन्ट आले, ते बंद पडले. मी येथे सांगू इच्छितो की पर्यावरणविषयक जनसुनावणीची प्रक्रिया तरी अनुकरण करण्यात यावी.

कदाचित आपल्याला सांगितले नसेल की जनसुनावणी समिती गठीत करण्याच्या कायद्यामध्ये २००९ मध्ये एक सुधारणा आली. त्यात जनसुनावणी कशी आयोजित करण्यात यावी याबाबत प्रक्रिया दिलेली आहे. आपणास मी जिल्हा दंडाधिकारी म्हणून नाही, तर जिल्हाधिकारी म्हणून आपल्याशी चर्चा करत आहे. कारण ज्यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला, ती व्यक्ती स्टेजवर आली नाही. आपण घेतलेली मेहनत एवढे हजारो लोक आले, हे सर्व वाया जाणार आहे. कारण अध्यक्षांना व सामान्य जनतेस अंधारात ठेवण्यात आले. हे मुद्दामुन करण्यात आले. पण आपण एक लोकशाही देशात राहतो. जेथे न्यायपालिकासुध्दा आहे आणि आपण पहाल आणि अजूनही आपण बोलावले नाही, तर नुकसान - बैठक ही रद्द होईल. बराच वेळा या देशात जनसुनावणी ह्या रद्द झालेल्या आहेत. कारण लोकांना अंधारात ठेवण्यात आले, अध्यक्षांना वेळ नव्हता.

मी एका गोष्टीबाबत आपणास धन्यवाद देतो की १% ते २% स्वतः जिल्हादंडाधिकारी (डी.एम.) स्वतः येतात. इतर वेळी ते अशा व्यक्तींना पाठतात की येणारी व्यक्ती ही अपर जिल्हादंडाधिकारी पण नसते. पण केलेली मेहनत हा वाया जाणार आहे. आपण केलेल्या चुकातरी आता कमी करण्यात याव्यात. आमच्या संस्थेचे सेक्रेटरी यांनी सांगितलेच आहे की आम्ही न्यायालयात जाणारच आहोत. येथे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सांगण्यास पर्यावरण सल्लागार लागतो. तो स्टेजवर आता येणे आवश्यक आहे. तो कुठे आहे? येथे असे वाटते की ही कार्यक्रम रोजगारासाठीच होता. मात्र आपला पर्यावरण सल्लागार नाही, प्रकल्प प्रवर्तक नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या अगोदरच सूचना करण्यात आलेली आहे की उपस्थितांनी त्यांचे प्रश्न, सूचना उपस्थित कराव्यात. नंतर प्रकल्प प्रवर्तक त्यांना एकत्रित उत्तरे देतील.

श्री पालीवाल म्हणाले की आपण जर जनसुनावणी दहा तास चालवत असेल, तर उपस्थित व्यक्ति तेवढी वेळ नुसते बसेल का. येथील गावातील लोक त्यांना पिण्याचे पाणी व जेवणाचे पॅकेट देण्यात आले, ते सर्व बाटल्या व खाण्याचे पॅकेट टाकून निघून गेले. आता निघून गेले, तरी काही गोष्टीचे उत्तर देण्यात यावे -

त्यांनी सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारच्या दिनांक ९-६-२०२१ च्या निर्देशांनुसार आपली नियुक्ती पर्यावरण समितीवर झालेली आहे. त्यानुसार ही जनसुनावणी होणे गरजेचे आहे. ती तशी होत आहे का? त्यानुसार ही जनसुनावणीत प्रत्येकाने तोंडाला मास्क लावणे आवश्यक होते.

त्यांनी असे सांगितले की attendance register कुठे आहे, बैठकीत एक व्यक्ती रजिस्टर काही विशिष्ट व्यक्तींकडे जाऊन स्वाक्षरी घेत होता.

त्यावेळी काही उपस्थितांनी संबधित व्यक्तीच्या प्रश्नांवर व चौकशीवर आक्षेप नोंदून मत मांडले की त्यांनी जनसुनावणीत प्रश्न विचारावेत. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ही जनसुनावणी आहे, संबंधित व्यक्तीस बोलून द्यावे ही सूचना केली.

श्री पालीवाल यांनी एमपीसीबीची वेबसाईट सुरु करण्याची सूचना केली. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी संबंधित व्यक्तीस (श्री पालीवाल) यांना पर्यावरणविषयक प्रश्न विचारण्याची सूचना केली. त्यावेळी श्री पालीवाल यांनी एमपीसीबीच्या वेबसाईटवर आजच्या जनसुनावणीबाबतची नोटीस नाही. ती एक महीना अगोदर ठेवण्यात आलेली नाही.

आक्षेप नोदविला की पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) अधिसूचनेतील अपेन्डीक्स ४ मध्ये जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया (Procedure) विषद केलेली आहे. ते निर्देश येथे पाळण्यात आलेले नाहीत.

त्यावेळी काही उपस्थितांनी श्री पालीवाल यांनी इतरांनाही सूचना करावयाच्या आहेत. अध्यक्ष यांनी उपस्थितांना शांततेचे आवाहन केले.

अ)प्रर्यावरणआघात मुल्यांकन अहवाल हा त्या त्या राज्याच्या राजभाषेत (Official Language) उपलब्ध करणे आवश्यक आहे. ती मिळाली नाही. फक्त २९ पानांची समरी -सारांश (Executive Summary) मिळाली. कार्यकारी सारांश वाचून कोणीही त्याचे मत व्यक्त करु शकत नाही.

ब) आपण पर्यावरण दस्तावेज केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या झोनल कार्यालयात दिलेली नाही. त्यांनी सांगितले की त्यांच्याकडे ४-५ दिवस आधी मिळाली असा लेखी अर्ज आहे.

क) तसेच मप्रनि मंडळाने संबधित अधिसूचित कार्यालयात दस्तावेज उपलब्ध केल्यानंतर त्यास मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्याची सूचना दिलेली नाही. त्यामुळे त्या कार्यालयांनी ते केले नाही.

ड) त्यांनी ऑनलाईनबाबत आक्षेप नोदविला की ऑनलाईन जनसुनावणीबरोबरच घेणे आवश्यक होते. त्यासाठी वेगळी व्यवस्था करणे आवश्यक होते.

त्यांनी विचारणा केली प्रकल्प प्रवर्तकांना येथे बोलाविण्यात यावे.

श्री पालीवाल यांनी सांगितले की कार्यकारी सारांश अहवालात कुठले पॉवर प्लॅन्ट बंद करणार याची माहिती दिली. त्यावेळी अध्यक्ष यांनी उपस्थित व्यक्तीस सूचना, प्रश्न विचारण्याचे आवाहन केले व त्यास प्रकल्प प्रवर्तक एकत्रित उत्तर देतील अशी सूचना केली.

श्री पालीवाल यांनी कुठला प्रकल्प बंद करावा, कुठला नाही हा अधिकार कोणी दिला याबाबत विचारणा केली.त्यांनी सांगितले की एमईआरसीची ऑर्डर आहे, ती जर उपलब्ध केली असती तर आपण जनसुनावणी आयोजित केलीच नसती. त्याची माहिती ईआयए मध्ये नाही.

त्यांनी आक्षेप नोंदविला की एमईआरसीची पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नाही. त्यांनी सांगितले की एमईआरसीचे काम आहे की पॉवर प्रकल्प हा तांत्रीक, आर्थिकदृष्ट्या योग्य आहे का. तेथे प्रकल्प प्रवतकांनी सागितले की सर्वात स्वस्त वीज येथे तयार होईल.

येथे उपस्थितांनी प्रश्न योग्यप्रकारे विचारला की स्वस्त वीज उत्पन्न कशी होणार,, कारण कोळसा हा ६००-८०० कि.मी. वरुन आणण्यात येणार आहे.

त्यांनी आक्षेप नोंदविला की कोल इंडियाच्या येथे माईन्स असतानाही ६०००-८०० कि.मी. अंतरावरुन कोळसा का आणण्यात येणार?

प्रकल्पात रोजगार हा स्थानिकांना मिळालाच पाहिजे, पण बाहेरून कोळसा आणून येथील WCL च्या किती माईन्स ते बंद करणार आहेत. अहवालाप्रमाणे परळी येथील युनिट बंद करणार, म्हणजे तेथील कामगार बेकार होणार. महाजेनको परळी कितीतरी अधिकारी व कर्मचारी यांना दुस-या प्रकल्पात नोकरी देणार. त्यांना येथे आणावे लागेलच, कारण त्यांचा अधिकार आहे. जर ते लोक येथे आले, तर येथील बेरोजगारांना कशी नोकरी मिळेल.

आक्षेप आहे की सादरीकरणात १,५०० लोकांना नोकरी मिळेल असे सांगतात, मात्र ईआयएमध्ये ५०० व्यक्तींना रोजगार मिळेल असे लिहिलेले आहे. याचा अर्थ रोजगार हा बांधकाम टप्प्यातला आहे. कायम सेवेबाबत काहीही उल्लेख नाही. या त्रुटी न्यायपालिका फार गंभीर घेईल.

इलेक्ट्रिसीटी एक्ट रोजगाराचा विचार करत नाही, तर तो स्वस्त वीज निर्माणाबाबत विचार करतो.

ग्लोबल वार्मीमुळे २०३० पासून अजून परिस्थिती खराब होईल. भारताने अभिवजन दिले की २०७० नंतर कार्बन इमिशन होणार नाही. त्यासाठी आतापासूनच कार्बन उत्सर्जन शून्य करण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. म्हणून भारत सरकारने २०३० पर्यंत ४०% कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे घोषित केलेले आहे. आज पॉवर क्रायसेस दाखविला जात आहे.

भारत सरकारच्या उर्जा मंत्रालयाने निर्देश दिलेले आहेत की वीजेची टंचाई असल्याने कुठलाही प्रकल्प हा २०३० पर्यंत बंद करण्यात येणार नाही. तर महाजेनको नियमांप्रमाणे कुठलेच युनिट बंद करु शकत नाही, पुरानी असो वा नवीन असो. ज्याचे नुतनीकरण करायचे असेल तेही करावेच लागले. म्हणजे युनिट बंद करणे हे भारत सरकारच्या विरुध्द आहे. देशात २०३० पर्यंत कोणताही वीजेचा प्रकल्प बंद होणार नाही. तर नविन १६,००० गीगावॅट येत आहेत, ते डिसेंबर, २०२३ पर्यंत स्थापित होतील.

तरी वीजेची टंचाई म्हणून हा प्रकल्प हे चुकीचे आहे. १५ दिवसांपूर्वी भारत सरकारने धोरण जाहिर केले की ७,००० मेगावॅट सोलर वीज निर्माण करण्यात येईल व शेतक-यांना बारा तास उपलब्ध करण्यात येईल. म्हणजे आज जी शेतक-यांना वीज देण्यात येते ती कोळशाच्या वीज प्रकल्पातील आहे. ७,००० मेगावॅट २०२५ पर्यंत मिळू शकेल. म्हणजे आपण प्रथम सोलर उर्जा केली पाहिजे. मग हा प्रकल्प सुध्दा बंद करायला लागेल. हे सामान्य माणसांना मुद्दामून सांगितले जात नाही.

श्री पालीवाल यांनी सांगितले की प्रदूषणामुळे भारतात लाखो लोक अकाल मृत्यू पावत आहेत.

आज किती वीज निर्मिती झाली हे वेबसाईटवर कळते. २९ मे ला मुंबईची गरज २,६४८ मेगावॅट लागेल. पण मुंबईचे पॉवर प्लॅन्ट वीज उत्पादन हे फक्त ९२५ मेगावॅट बनवित होते. याचा अर्थ येथील वीज ही मुंबईला जात आहे. आज महाजेनकोचे वितरण सात

पॉवर प्लॅन्टचे ५,७६० आहे. याचा अर्थ ३,७८० मेगावॅटचा जो गॅप तो पूर्ण करता येईल (एकूण उत्पादन क्षमता ९,५४० मेगावॅट प्रतीदिन) जर कार्यक्षमतेने यत्रणा कार्यान्वित केली तर. कारण कोळसा खराब, अकार्यक्षमता, वितरणातील तोटा, वीटवाटपात तोटी व वीजेची चोरी.

म्हणजे आपले पॉवर प्लॅन्ट कार्यक्षमतेने चालवत नाही व नविन आणून ग्राहकांवर विनाकारण बोजा आणला जातो. येथे एका उपस्थितांनी मुद्दा उचलला की ११,००० कोटी गुंतवणूक आहे.

नागपूरमध्ये ७.००० मेगावॅट वीज उत्पन्न करण्याची क्षमता आहे. मिहानमधील पॉवर प्लॅन्ट बंद करावा लागला कारण त्याच्या वीजेला मागणी मिळालीच नाही. कारण तेथे कंपन्या व विकास झालाच नाही. मिहानमध्ये सांगण्यात आले की ५,००० रोजगार मिळतील.

येते सर्वांना माहित आहे की सीएसआर निधी येथला कुठे जातो. तो कंत्राटदाराच्या खिशात गेला. तो स्थानिक मुलांसाठी खर्च केला असता तर त्यांना मिहानमध्ये नोकरी मिळाली असती.

नागपूरमध्ये रिलायन्सने पॉवर प्रकल्प बंद केला, आयडीयल बंद झाला. येते फक्त एनटीपीसी चालतो, कारण तो भारत सरकारचा आहे. महाजेनको सरकारी आहे, चालू आहे.

नंतर आपण धोरण केले की येथे शेती खूप आहे, म्हणून बायोमास पॉवर प्लॅन्ट आणा. नागपूरमधील ते ६ -७ प्लॅन्ट बंद आहेत. कारण ज्याने शेतक-याकडून बायोमास विकत घेतला, कर्ज काढून कंपनी काढली, - कारण बायोमास हा कोळशापेक्षा महाग पडतो म्हणू सरकारने सांगितले की जास्त पैसे देण्यात येईल. पण ते दिले नाहीत. तसेच कायद्याप्रमाणे आपण कोठूनही कमी किंमतीत वीज घेऊ शकतो, त्यांना प्लॅन्ट बंद करावे लागले. तर आपणास या प्रकल्पाची जरुर आहे का.

आता प्रदूषणाबाबत . महाराष्ट्राच १६,००० मेगावॅट प्रकल्प बंद पडलेले आहेत. मिहान मध्ये २६% महाराष्ट्र शासनाची आहे. ती बंद पडलेली आहे. नाशिकचा एक महाजेनकोचा प्रकल्प ट्रायल रन झाले, पण बंद आहे. तो चालू करावा, पण आपल्याला येथे नविनच सुरु करायचा आहे.

तर आपणास जुने एवढे बंद केलेले वीजप्रकल्प परत चालू करायचे नाहीत, नवीन मात्र चालू करायचा आहे.

पुढची जनसुनावणी चंद्रपूरला होईल, तेथेही प्रकल्प चालू करण्यात येत आहे.

यावेळी अनेक उपस्थितांना एकत्रित आक्षेप घेतला की इतर प्रकल्प बंद पडले असतील, तो प्रश्न येथे नाही. हा प्रकल्प जर प्रगती करत असले, तर इतरांसाठी हा प्रगती करणारा बंद का करायचा. त्यांनी अध्यक्ष यांना विनंत केली की संबधित व्यक्तीस फक्त मुद्द्यावर बोलण्यास सांगण्यात यावे.

अध्यक्ष यांनी श्री पालीवाल यांना मुद्यावर व थोडक्यात बोलण्याच्या सूचना दिल्या.
श्री पालीवाल यानी सागितले की २००५ मध्ये भारत सरकारने नीरी ला पर्यावरणाच्या नुकसानीबाबत अभ्यास करण्याचे निर्देश दिले. नीरीला सांगण्यात आले की पॉवर प्लॅन्टच्या परिघात पर्यावरणाचे किती नुकसान होते ते संपतीच्या रुपात सांगण्यात यावे. निरी संस्थेने अभ्यास करुन सांगितले की एक युनिट वीज जर वितरण होते, तर दहा पैसे नुकसान आहे. नुकसान प्रभाव हा हवा, पाणी, जमीन, सामाजीक-आर्थिक वर होतो. दहा पैसे लहान वाटतात, पण वीज वितरणाशी संलग्न केल्यास तेवढे नुकसान होते. आता ती ३५ पैशाना वीज झालेली आहे.
फ्लाय एश एक युनिटमध्ये ३०० ग्रॅम उत्पन्न होते. येथे सांगण्यात आले की २.५० टन कोटी फ्लाय एश येथे उपलब्ध आहे. नागपूर, चंद्रपूर व खापरखेडा मिळून १२ टन कोटी फ्लाय ऍँश उपलब्ध आहे.
श्री पालीवाल यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यानी फ्लाय ऍँशचे काय केले हे सांगितले नाही. फ्लाय एश ही जमीनीवरील, नदीतील कमीतकमी १०% काढायची आहे. त्यावर पेनल्टी पोल्युशन कंट्रोलने १५०० रुपये टन नुसार पेनल्टी लावायची आहे. म्हणजे दर वर्षी एक कोटी टन फ्लाय एश काढावी लागेल, नाही तर पेनल्टी भरावी लागेल. ती पेनल्टी धरली तर वीजेचा दर हा काय पडेल? त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांचा नियोजन रेल्वेव्दारे फ्लाय एश नेणे हे स्वागतार्थ आहे. पण तो खर्च ग्राहकांनात द्यावा लागेल. त्याना भारतातील वीज उत्पादनाची सुरवातीपासूनची सर्व माहिती सांगितली.
त्यांनी आक्षेप नोंदविला की कार्यरत - रनिग प्रोजक्टमध्ये जाहिर सुनावणी घेण्यात येत नाही. ग्रीन फिल्जमध्ये घेण्यात येते.
श्री पालीवाल यांनी येथील शेतक-यांना किती कमी मोबदला मिळतो याबाबत माहिती दिली.

श्री पालीवाल यांनी विचारणा केली की नागपूरच्या सांडपाण्यावर टर्शरी ट्रीटमेंट देऊन बॉयलर चालवता येईल काय. जर एवढे चांगले पाणी असेल तर गावागावात एटीएम का लावण्यात आले?

त्यांनी आक्षेप नोंदविला की पाणी हे पेंचचे येणार आहे. त्यांनी आरोप केला की नाग नदीचे पाणी घेणार असून सांडपाण्याच्या नावावर नाग नदीचेचे पाणा घेणार आहेत पाणी नाही. २७,००० लिटर पाणी रोज लागणार. तर ते का घेत नाही.
तरी कोराडीस देश व सर्व नागपूरचा विचार करून पाहावे.

५९) श्री गजानन सुपे, सेवानिवृत्त संघटना सचिवः-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या पॉवर स्टेशनमध्ये तंत्रज्ञ, स्वीपर ते संचालकपासूनच लोक पॉवर स्टेशनच्या अगदी भिंतीला लागून राहतात. मुख्य अभियंता, ३-४ अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, पासून सर्व. त्यांना कोठेही प्रदूषणाचा त्रास झालेला नाही. हा त्रास होऊ नये म्हणून चंद्रशेखर बावनकुळे असताना त्यांनी पर्यावरण तज्ज्ञ त्यांना मानधन देऊन निवडले होते..त्या रिपोर्टसचे काय झाले, त्यांनी काय सूचना दिल्या हे सुध्दा फार गुपीत आहे. त्याचा सुध्दा उलगडा कंपनीने करायला पाहिजे. कुठलीही सिस्टिम असली तरी त्या सिस्टिमला सरकार, तेथील व्यवस्थापन , तेथील कर्मचारी हे काही अंशी जबाबदार असतात. अशाच प्रकारे त्यांनी पर्यावरण तज्ज्ञांचे नियोजन कमिटीवर केलेले असेल.. महराष्ट्राच असा कुठलाही प्रकल्प नाही, की जो जमीन अधिग्रहण न करता झालेला आहे. येथे आता अतिरिक्त जमिन घ्यावी लागणार नाही. सकाळपासून पहात आहोत की कितीतरी लोक जमिन गेली म्हणून पोटतिडकीने बोलत आहेत. | सूचनांची नोंद घेण्यात आली |
| २) | भारत कृषिप्रधान देश असून जमिनीला आईसारखे मानतो. जमिन जर बंजर होत असेल, ती जर सरकारच्या ताब्यात जात असेल, तर या देशात ते दुर्दैव कुठलेच नाही.. आजही किती लोकांना वाटते की आपली जमिन गेली नसती तर आपण काहीतरी केले असते. कुठलेही सरकार असले तरी ते त्यावेळच्या किमतीप्रमाणे पैसे देईल. त्यामुळे कुठलीही अतिररिक्त जमीन न जाता प्रकल्प होत आहे, तर ही आनंदाची | सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | गोष्ट आहे. लोकांच्या तोंडून ऐकले की हा प्रकल्प बाहेर का नेत नाही. तर पहिले प्रकल्प हे १२० चे होते. आता सुपर क्रिटिकल करायचा तर तो ६०० चा करायला लागेल. तो निम्मा निम्मा करता येत नाही, म्हणून तो एका ठिकाणीच करावा लागेल. या प्रकल्पासाठी इतर सर्व मंजू-या मिळालेल्या आहेत. कोणाचाही आक्षेप नाही. दिल्लीच्या एका वकिलाने खूप पत्रव्यवहार केला. पण त्याचा शेवट काय झाला. देश हा बौध्दिक पातळीवरच चालत असतो. देशाला बौध्दिक लोकांची गरज आहे. मात्र मार्ग चांगला पाहिजे. | |
| ३) | येथे काही उपस्थितांनी निदर्शनास आणले की प्रकल्पात एफजीडी कार्यान्वित होणे गरजेचे होते. त्यात व्यवस्थापनाची चूक आहे. त्या चूकेचे कारण आपल्याला माहित आहे. तरी सर्वांना सद्बुध्दी ईश्वराने देवो. | सूचनांची नोद घेण्यात आली. |

६०) <u>श्री सुनील साळवे, मुख्य संपादक, वंश न्युज पोर्टल -</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केलेली आहे. मूळात प्रर्यावरणावर चर्चा फार कमी लोकांना केली. रोजगारासाठी लोकांनी जास्त अपेक्षा केल्या. हे साहजिकच आहे, प्रकल्पाकडून लोकांच्या अपेक्षा वाढतात. पण त्यावेळी तेथील प्रशासन - येते महाजेनको प्रामाणिकपणे काम करते का हा महत्वाचा प्रश्न आहे. प्रशासनाला राजकीय दबावाखाली काम करावे लागते. ते नाकारू शकत नाही. येथे प्रत्यक्षात रोजगार किती उपलब्ध होतील | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | याबाबत चर्चात झालेली नाही. ज्या ज्या ठिकाणी गेलो त्याठिकाणी हे अनुभवले की स्थानिकांनी प्रश्न विचारला की त्यास त्या विभागातील व्यक्ती उत्तर देते. उपस्थितांनी प्रश्न मांडल्यावर त्यास उत्तर अपेक्षित होते. ब-याच जनसुनावणीत प्रश्न विचारल्यावर त्यास त्वरित उत्तर मिळालेले आहे. येथे तसे दिसले नाही. | |
| २) | मी वंश न्युज चॅनेलतर्फे येथील परिसरात फिरतो. बैठकीत जरी म्हणत असले की प्रदूषणामुळे त्रास होत नाही, प्रत्येकजण खाजगी उपचार घेत असतो. महाजेनकोच्या अधिकारी व कर्मचारी यांना विविध आरोग्य सुविधा मिळतात. पण आजूबाजूच्या परिसरात राहणा-या लोकांना जे प्रकल्पबाधित आहेत, त्यांना ग्रामीण रुग्णालय नाही. ही शोकांतिक आहे. महादुला मोठी नगर परिषद आहे, अजूनही तेथे दवाखान्याची सोय नाही. महाजेनको पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देत नाही. जर कोराडीला मिळते, तर महादुलाला, बोकारा, लोणखीडी लोकांना का नाही? याठिकाणी ते कोणी बोलत नाही. कंत्राट पाहिजे, म्हणून खूप लोक आले. बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात यावी की पुढील जनसुनावणीचा विषय हा रोजगार झाला पाहिजे. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |
| ३) | सीएसआर निधी खर्च करताना त्यावर नियंत्रण महाजेनकोचे नाही. तसेच लोकांना गरज आहे, म्हणून हॉस्पीटल स्वतः महाजेनकोने बांधण्याऐवजी इतर ठिकाणी जाहिरातींसाठी खर्च करते. येथे आरोग्याच्या, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा नाहीत. शुध्द पाणी फिल्टरने पुरवत नाहीत. आमची इच्छा आहे की प्रकल्प यावा, लोकांना रोजगार, कंत्राटदारांना कामे मिळावीत. | सूचनांची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सी.एस.आर. प्रमाणे योजना राबविण्यात येतील. शुध्द पाणी पुरविण्यात येईल. |
| ३) | माझा आक्षेप आहे प्रकल्पग्रस्तांना अवाजवी न्याय देण्यात आला. एका घरातील दहा | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | दहाजण नोकरीस लागले. त्यावेळी स्थानिकांना डावलण्यात आले. यावर महाजेनकोने काही यंत्रणा उभारुन त्याबाबत नियंत्रण ठेवण्यात आले नाही. ही जनसुनावमी हा फक्त देखावा आहे. आधीच प्रकल्प येण्याचे ठरलेले आहे. | |
| ४) | तरी पर्यावरणावर लक्ष दिले गेले पाहिजे. त्यामानाने पर्यावरणाची काळजी घेतली जात नाही. आरोग्याच्या सुविधा या सर्वानाच मिळाल्या पाहिजेत. | सूचनांची नोंद घेण्यात यावी. |

६१) <u>श्री भूषण चंद्रशेखर, जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, नागपूर ग्रामीणः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प कोराडीलाच आला पाहिजे या गोष्टींसाठी आमचे समर्थन आहे. तरी याअगोदर माझी महाजेनको व सर्वांना विनंती आहे की या बाजूची संरक्षक भिंत जी महाजेनकोची आहे, त्याच्या बाजूला जी झोपडपट्टी आहे, त्याचे सर्वेक्षण सर्वांनी करावे, भेटी द्याव्यात. १९८० पासून या झोपडपट्ट्याचा विकास का झाला नाही, याचे कारणे शोधावी. प्रकल्पाचा सीएसआर निधी किती खर्च झाला, त्याचा लेखाजोखा तपासण्यात यावा. ती रक्कम कोठे खर्च केली, ते लोकांसमोर मांडावी. येत्या काळात किती पैसा खर्च करणार आहेत, त्याचा लेखाजोखा सादर करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले झोपडपट्टी व संरक्षक भिंतीचा विषय हा समन्वयाने सोडविण्यात येईल. सी.एस.आर. ची माहिती देण्यात येईल. |
| २) | आता पर्यावरणाबाबत. मी मागणी केली होती की पिंपळाचे झाडे लावा. दोन महिन्यांपूर्वी बातमी प्रकाशित झालेली होती. कोणीही त्याबद्दल उत्सुकता दाखविली नाही. ज्या झाडापासून २४ तास ऑक्सिजन मिळणार आहे, | सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प परिसरातील विविध गावात वृक्षारोपणाचा कार्यक्रम वेळोवेळी राबवित असतात. |

| | | |
|---|---|---|
| | त्या झाडाच्या रोपणाला कोणीही प्रतिसाद दिलेला नाही. जर अधिका-यांना प्रदूषणाचा त्रास होत नाही - प्रकल्पाचा - तर बाकीच्या लोकांना होणारच नाही. प्रकल्प हा आलाच पाहिजे. पण या झोपडपट्टीचा विकास होईल का, हॉस्पीटल बनतील का हा महत्वाचा प्रश्न आहे. | |
| ३) | या भागातील भवन्ससारखी एक शाळा आहे. लाखो रुपये त्याची फी आहे. तशीच दुसरी शाळा विद्यामंदिर कॉलनीच्या वसाहतीत आहे. ती विद्यामंदिर शाळा बंद करा. तेथे भवन्सची शाळा उघडा. त्यात झोपडपट्टीच्या सर्व विद्यार्थ्यांना जागा द्या. येथे काही लोक म्हणाले प्रकल्प येऊ नये म्हणून न्यायलायात जाणार. तर सर्व गावकरी प्रकल्प येण्यासाठी न्यायालयात जाऊ. प्रदूषणाने आम्ही मरणार असू, तर भूकेने जे लोक मरतात, त्याची जनगणना कोणी करणा नाही. न्यायालयात खूर्चीवर बसणारा माणूसच आहे. करोना आला, त्यावर औषध शोधले, तरीही माणसे मेलीच. आलेला जाणारच आहे. हे सत्य आहे. पण झोपडपट्टयांचा विकास झाला, तर तो सुखाने जाईल. आज राज्यात नागपूरमध्ये जास्त वाहने चालतात. सिग्नलला एवढा धूर नाकात जातो, तेवढा तर प्रकल्पातून जाणार नाही. राखाडी जाणार नाही. येथे पैशावाल्यांचा विरोध आहे. असे लोक एखाद्या मुद्द्यावर मुद्दामून आंदोलन उभारतात. नंतर त्यावर सेटींग करतात. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | १९८० पासून त्या झोपडपट्यांचा विकास का झाला नाही, सीएसआर निधी कुठे खर्च झाला, सीएसआर निधी आमदार, खासदारांच्या सांगण्यावरुनच का खर्च होतो, प्रकल्प आल्यानंतर तेथे कंत्राटदारांची सत्ता प्रस्तापित होईल. तरी रोजगार देताना कोणाचिगी शिफारस | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सीएसआर निधी हा स्थानिक विकास कामांसाठी नियमांनुसार खर्च करण्यात येईल. योग्यतेनुसार स्थानिकांना रोजगार देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | आली तरी पात्रता ठरवून त्यास रोजगार देण्यात यावा. एखादा अनपढ कंत्राटदार अधिका-यांना शिवीगाळ करतो, कारण अधिका-यांना कोणीही वाली नाही. | |
| ५) | तरी पर्यावरणविषयक जनसुनावणीप्रमाणेच गरीबांसाठी जनसुनावणी घ्या. झोपडपट्टीतला एकही माणूस येते नाही. कारण त्याला चारशे रुपये महत्वाचे आहेत. येथे कामगार काम करतात, त्यांना किमान वेतन मिळते का याची चौकशी करा. एखादा कामगार येतो, त्यास पास मागितला जातो. पण एखादा कंत्राटदार आला, तर त्यास कोणीही अडवत नाही. आम्हां गरिबांना झाडे द्या, आम्ही फुकट लावू. आम्हा कामगार, गरिबांना खेळाचे मैदान पाहिजे. कॉलनीतील मैदानात काहीही सुविधा नाही. मी मुद्दे सांगितले ती गरीबाची भावना आहे.त्या भावनेचा विचार करावा एवढी मी विनंती करतो. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

## ऑनलाईन सत्र

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ऑनलाईन वर कोणी बैठकीत सहभागी होण्यास उत्सुक आहे काय याबाबत विचारणा केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ऑनलाईन उपस्थितांना ज्यांना प्रश्न विचारायचे आहेत, त्यांना हात वर करण्याची सूचना केली.

१) <u>श्री कौस्तुभ चटर्जी, प्रतिनिधी ग्रीन व्हिजील फाऊन्डेशन, नागपूर :-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी धन्यवाद देतो की महाजेनकोला की ते जुने (Outdated) संच बदलून नविन संच कार्यान्वित करणार आहे. आता प्रदूषणाचा विचार केला जुन्या संचापेक्षा नविन संचामुळे प्रदूषण हे | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | कदाचित कमीच होईल. आता नागपूरचा विचार केल्यास कोराडी व खापरखेडामुळे इको सिस्टमची सहन/वाहून नेण्याची क्षमता ही संपलेली आहे. तर हे दोन्ही संच परत कोराडीतच कार्यान्वित करणे मला उचित वाटत नाही. | |
| २) | मी उपस्थित केलेल्या विचारांचे स्वागत करतो की वीजेची वाढती मागणीसाठी अशा प्रकल्पांची आवश्यकता आहे. आपण सोलर एनर्जीचे नियोजन करत असलो तरी ते त्वरित होणे अवघड आहे. आता आपण २५० च्या ऐवजी २७० कार्बन रेटींगबाबत विचार करत आहोत,तर बैठकीत उपस्थित केलेल्या विचारांचे स्वागत करतो, पण कोराडी ही जागा आता योग्य नाही. कोराडीची प्रदूषण पातळी ही भयावह पातळी (alarming level) गाठलेली आहे | समितीने सांगितले की, आक्षेपांची नोंद घेण्यात आली. |
| ३) | दुसरी गोष्ट जी उर्जा उत्पादीत करण्यात येईल, ती महाराष्ट्राच्या दुस-या बाजूस वितरित करण्यात येणार आहे. येथे वीज वितरणात वीजेचा तोटा/कमतरता होईल. जेथे वीजेची गरज आहे, तेथे प्रकल्प विकसित केल्यास त्याचा सर्वांनाच फायदा होणार आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | मी सकाळपासूनचे सर्व सत्र पाहत आहे. ज्यांनी रोजगाराबाबत विचारणा केली, त्यांना माझा पाठिंबा आहे. तर कोराडीला अजून वीज प्रकल्प आणल्यास कोराडीची इको सिस्टमची सहन/वाहून नेण्याची क्षमता ही संपलेली आहे. आता कार्यरत प्रकल्पात FGD लावलेले नाही, तर भविषयात लावणार आहेत काय याबाबत आपण काहीच सांगू शकत नाही. माझ्या सूचना संपलेल्या आहेत. | प्रकल्प प्रर्वतकांनी सांगितले की, जुन्या प्रकल्पात FGD लावण्याचे काम सुरु आहे व नविन प्रकल्पात FGD लावण्यात येईल. FGD बाबत प्रकल्प प्रवर्तकांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. |

अध्यक्ष यांनी ऑनलाईन सूचना केल्याबद्दल धन्यवाद दिले व त्यांना सूचना केली की ५-१० मिनिटात प्रकल्प प्रवर्तक याची उत्तरे देणार आह, तरी आपण ऑनलाईन संपर्कात राहावे,

२) <u>श्री परमजीतसिंग अहुजा, वास्तूविशारद, नागपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/ यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे २-३ प्रश्न आहेत. कुठलाही पॉवर प्लॅन्ट हा दोन ठिकाणीच होतो - एक म्हणजे कोळसा खाणीच्या वर किंवा जवळ आणि दुसरा जेथे ग्राहकांना त्याची जरुर आहे.<br>बैठकीत अनेक वक्त्यांनी बराच वेळा सांगितले की विदर्भात कोळसा नाही, कोळसा WCL मधून घेणार नाही. तो दुस-या राज्यातून आणणार आहेत. तरी कोराडीला प्रकल्प सुरु करण्याचा काहीही फायदा नाही.<br>तर येथील मुद्दे उपस्थित केले - पॉवर प्लॅन्ट हे कोळसा खाणीजवळ किंवा वर बसवले जातात, येथे कोळसा सुमारे ६०० कि.मी. अंतरावरुन आणण्यात येणार आहे. शिवाय कार्बन फुट प्रिंटमध्ये वाढ होणारच आहे. तर जेथून कोळसा आणणार आहेत, तेथेच पॉवर प्लॅन्ट हवा. | सुचनेची नोंद घेणयात आली. |
| २) | दुसरा मुद्दा हा पॉवर प्लॅन्ट शहरात विकसित होत नाही. सदरहू प्रकल्प हा नागपूर शहराचा, एनएमआरडीएचा भाग नाही. तरी येथे ह्या प्रकल्पाचा घाट घालणे तर्कसंगत नाही. येथे एक वकत्याने दिल्ली चा प्रकलप भद्रपूरला हलविल्याचे सांगितले, तसेच येथे प्रकल्प चालू ठेवणे योग्य नाही. येथे ६६० X २ स्थापित करण्याऐवजी ६६० X ३ येथून बाद करण्याचा विचार व्हावा.<br><br>दुसरा मुद्दा - जेथे गरज आहे तेथेच पॉवर प्लॅन्ट उभारण्यात यावा. Polluters Pay Principle येथे अंमलात आणावे, त्यानुसार ज्यांना वीज हवी, | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | त्यांनी प्रदूषणाचा दंड भरावा. नागपूर जिल्ह्याने हे अतिरिक्त प्रदूषण का सहन करावे? | |
| ३) | येथे कंपनीने FGD लावले नाहीत, म्हणून मीही एक याचिकाकर्ता राष्ट्रीय हरित लवादात आहे. मी केस जिंकून आता दहा वर्षे झाली, तरीही FGD लावले नाहीत. महाजेनकोने यासाठी विविध कारणे सांगितली. मी उत्तर नागपूरला राहतो, मी माझ्या घरातील बाल्कनीतून रोज प्रकल्प बघतो, चिमणीतून धुर आलेला बघतो. जर धूर बाहेर येतो, याचा अर्थ राख फिल्टर झालेली नाही, गॅस फिल्टर झालेला नाही, आपण दुषित हवा घेत आहोत. | प्रकल्प प्रर्वतकांनी सांगितले की, जुन्या प्रकल्पात FGD लावण्याचे काम सुरु आहे व नविन प्रकल्पात FGD लावण्यात येईल. FGD बाबत प्रकल्प प्रवर्तकांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. |
| ४) | पॉवर प्लॅनटमध्ये अजून एक महत्वाचा घटक आपण विसरतो - वितरण लाईन्स. पॉवर प्लॅन्टचे प्रदूषण हे कुलींग टॉवर, स्मोक, चिमणीमुळे दिसते. पण वितरण लाईन्समधील प्रदूषण हे दिसत नाही. ज्याप्रमाणे विविध प्रकल्पांसाठी पर्यावरण अनुमतीसाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे, त्याचप्रमाणे वीज वितरण लाईन्स टाकताना तेथे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक करण्यात यावे. कारण आपण वीज वायरलेसने पाठवत नाही. वितरण लाईन्सचे प्रदूषण, मॅगनेटीक फिल्ड्स, कॅन्सर होण्याची शक्यता, विशेषतः लहान मुलांमध्ये. येथे ४५० केव्हीए पॉवर असेल. हे चुकीचे आहे की वितरण लाईन्स हा पर्यावरणविषयक जनसुनावणीत समावेश नाही. तो असावा. | समितीने सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ऑनलाईन असणा-यांना सूचना, आक्षेप नोदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना सकाळपासून उपस्थित केलेल्या सूचना, प्रश्न, आक्षेप यांनी शास्त्रीय व सविस्तर स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांचे संचालक यांनी उत्तरे खालीलप्रमाणे दिली - <u>६१ व्यक्तींनी प्रत्यक्ष व २ व्यक्तींनी ऑनलाईन प्रश्न विचारले -</u>

त्यांनी सांगितले की बरेच सामाईक मुद्दे विचारण्यात आले - म्हणजे प्लॅन्ट कोराडीत का इतरत्र का नाही, एफजीडी अजून लावलेला नाही, हवा प्रदूषण, जल प्रदूषण, आरोग्याविषयी सूचना, राखेचे प्रदूषण व विल्हेवाटीबाबत माहिती, स्थानिकांना रोजगार, सीएसआर, सीईआर निधिंतर्गत स्थानीकांना काय मदत करणार, ऍश बंडबाबत विषय छेडला, कोल माईन्स गरे पल्पाविषयी, हरित पट्टा विकास, पेंचच्या पाण्याबद्दल.

<u>त्या अनुषंगाने महाजेनकोची भूमिका - महाजेनको तर्फे डॉ. नितीन वाघ, कार्यकारी संचालक (Executive Director) यांनी खालील प्रमाणे उत्तरे / माहिती दिली.-</u>

१) प्रकल्प कोराडीतच का - तर कोराडीत जुने प्लँट होते, १२० x ४ होते, ते २०११ मध्ये बंद केले. २०० x१ २०१७ मध्ये बंद केला. २१० x १ २०२१ मध्ये बंद केला. असे एकूण ८९० मेगावॅटचे प्रकल्प बंद करण्यात आले.

२) जशी वीजेची मागणी असेल, त्याप्रमाणे आम्ही नवीन प्रकल्प आणलेले आहेत. परळीला २५० मेगावॅटचा प्लँट आणलेला आहे. चंद्रपूरला ५०० मेगावॅटचे दोन प्लॅन्ट आणलेले आहेत. भूसावळला ६६० मेगावॅटचा प्रकल्प नोव्हेंबर २०२३ मध्ये कार्यान्वित होणार आहे. आता कोराडीत ६६० x २ मेगावॅटचा कोळशावर आधारित सुपरक्रिटिकल औष्णिक विद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे.

३) कोराडीतच प्रकल्प उभारणीसाठी मुबलक जागा, पाणी, कोळसा व इतर पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. ते सर्व येथे उपलब्ध आहेत.

४) एक इंचही अतिरिक्त जागा या प्रकल्पासाठी अधिग्रहित करावयाची नाही. बंद झालेल्या प्रकल्पाची जागा महाजेनकोकडे आहे. पाण्याची व्यवस्था, कोल लिंकेज, रेल्वेचे जाळे आहे. त्यामुळे स्वस्तात वीज निर्मीती साध्य करु शकतो.

५) पेंचच्या पाण्याचा विषय होता. पेंचच्या पाण्याच्या आकडेवारी चुकीच्या आहेत व पुढे सांडपाणी वापरणार नाहीत.

६) भारतातील महाजेनको अशी संस्था आहे की त्यांनी प्रथमतः सांडपाण्यावर प्रकिया करुन त्याचा पुनर्वापर कोराडी व खापरखेडा येथे वापरण्यात येणार आहे. त्यामुळे पेंचचे जे ताजे पाणी उपसा ७०% कमी झालेला आहे. जे ३० % आहे, ते पिण्यासाठी वापरणार आहेत. २ x ६६० आम्ही तेच प्रस्तावित केलेले आहेत.

७) पेंचच ताजे पाण्याची गरज आम्ही कमी करुन घेतलेली आहे. पेंचचे पाणी आम्ही पिण्यासाठी व घरगुती वापरासाठीच घेणार आहोत.

८) FGD लावलेला नाही. मागील तीन वर्षापूर्वी टेन्डरींग प्रोसेस सुरु केलेली होती. काही तांत्रीक बाबींमुळे ते एक वर्षे टेंडर रखडले. त्यानंतर कोविडमुळे ते एक-दीड वर्षे रखडले गेले. आता २ x ६६० चे टेंडरिंग अंतिम टप्प्यात आलेली असून जूनमध्ये FGD लावण्याच्या ऑर्डर्स आम्ही पारित करत आहोत.

९) कोराडी न.६ व खापररेडा येथील FGD ऑर्डर्स आम्ही पारित केलेल्या आहेत. कामे प्रगतीपथावर आहेत.

१०) पारसला आणि परळी ६, ७ व ८ ला सर्व FGD ऑर्डर्स प्रगतीपथावर आहे.

११) त्यामुळे महाजेनको FGD बाबत काहीही करत नाही त्यात काही तथ्य नाही.जूनमध्ये कोराडीसाठी ऑर्डर्स पारित होतील.

१२) हवा प्रदूषण व जल प्रदूषण याबाबत विचार केला तर जल प्रदूषण प्रतिबंधासाठी अद्यावत प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यरत प्रकल्पात कार्यान्वित आहे.

१३) हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ईएसपी, फॉगींग सिस्टिम, ऍश आणि कोल हाताळणी क्षेत्र आहेत, तेथे स्प्रेईग सिस्टिम लावलेली आहे.

१४) नविन अधिसूचनेनुसार प्रस्तावित प्रकल्पात FGD, SCR सयंत्रणा आहेत की त्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने अनिवार्य केलेल्या आहेत. त्या नविन प्रकल्पासोबतच येणार आहेत. त्यामुळे प्रदूषण होण्याची शक्यता नाही.

१५) कार्यरत ३ x ३६० व प्रस्तावित २ x ६६० या सगळयांच्या FGD लागून झाल्यावर आजूबाजूच्या रहिवाशांना कोणत्याच प्रकारच्या प्रदूषणाचा त्रास होणार नाही.

१६) या प्रकल्पाला लागून आमचे निवासी गाळे (residential quarters) असून सुमारे ७००-८०० कुटुंबे तिथेच राहतात. त्याचप्रमाणे खापरखेडाच्या कॉलनीतही तेवढीच वस्ती आहे. प्रकल्प स्थापित झाल्योपासून ही सर्व कुटुंबे कोराडी व खापरखेडा येथे राहत आहेत. म्हणजे प्रदूषणाचा त्रास प्रथम आमच्या कुटुंबांनाच व्हायला पाहिजे तो होत नाही. त्याचप्रमाणे आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांना त्रास होऊ नये याची पूरेपूर काळजी घेण्यात येते. वर्षातून एकदा महाजेनको कर्मचारी, अधिकारी, परिसरातील नागरिक यांची आरोग्य तपासणी घेण्यात येते.

१७) जल प्रदूषणाबाबत भांडेवाडीला एसटीपी प्लेन्ट लावण्यात आलेला आहे, त्याचे पूर्ण पाणी कोराडी, खापरखेडा वीज केंद्रात वापरत आहे.

१८) प्रकल्पात जे औद्योगिक सांडपाणी उत्पन्न होते, त्यासाठी अत्याधुनिक ईटीपी सर्व प्रकल्पात कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

१९) आमच्या निवासी कॉलनीमध्ये विविध ठिकाणी एसटीपी उभारण्यात आलेले आहे. ते २४ x ७ तेथील प्रक्रिया केलेले घरगुती सांडपाणी प्रकल्पात हरित पट्टा विकसनासाठी, घरगुती वापरासाठी, ऍ्श हाताळणी व विल्हेवाट करण्यासाठी या पाण्याचा वापर करण्यात येतो.

२०) प्रकल्पातील ऍ्श विल्हेवाटीसाठी वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करुन ते प्रक्रिया केलेले पाणी हे परत ऍ्श विल्हेवाटीसाठी वापरण्यात येते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे सांडपाणी प्रकल्पाबाहेर जाऊ नये याची काळजी घेत असतो.

२१) सीएसआर व सीईआर निधी अंर्तगत आरोग्य शिबिरे ही परिसरातील गावांमध्ये आयोजित करत असतो.

२२) प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा आरोग्य केंद्र याकडून वेळोवेळी माहीती घेण्यात येते की कंपनीच्या प्रदूषणामुळे किती लोकांना श्वसनाचे आजार, त्वचेचे आजार, फुफ्फुसांचे आजार झालेले आहेत. तर कोणत्याही अधिसूचित शासकीय कार्यालयाकडून कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील लोकांना श्वसनाचे, फुफ्फुसांचे आजार झाल्याचे नोंद नसल्याचे कळविले आहे.

२३) कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे ऍ्श विल्हेवाट शास्त्रीयपध्दतीने होत नाही असा आक्षेप नोंदविण्यात आलेला होता. महाजेनकोचे जे सात प्लँट आहेत, त्यापैकी चारमध्ये १००% राखेची विल्हेवाट लावण्यात येते. तर कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे तेवढे होत नाही. दिनांक ३१-१२-२०२१ च्या नविन अधिसूचनेनुसार ड्राय ऍ्श व पॉड ऍ्श अशी विभागणी केलेली आहे. तर कोराडीला ड्राय ऍ्श कमी प्रमाणात जात असली, तरी पॉडमधून जी ऍ्शचे लिफ्टींग आहे, ते जवळपास ७०-८०% आहे. येथील जे वीटभट्टीधारक व छोटे छोटे उद्योग आहेच ज्यांना ऍ्शची गरज आहे, ते लोक नेत असतात.

२४) नविन अधिसूचनेनुसार राखेची उचल करण्यासाठी कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे पाच वर्षाची टर्म दिलेली आहे. पहिले दोन वर्षे ८०% नंतर १००% टार्गेट दिलेले आहे.

२५) बैठकीत एका उपस्थिताने आक्षेप नोंदविला होता की येथील ऍ्श मुंबईला रेल्वेव्दारे नेणार असाल तर तेथेही प्रदूषण होईल. याचा खर्च स्थानिक लोकांवर लादला जाईल. याबाबत महाजेनको यांनी पेपरात जाहिरात दिलेली होती, जरी प्रथम वेळेस त्याचा प्रतिसाद समाधानकारक नव्हता, तरी नविन अधिसूचनेनंतर जेथे ऍ्श वापरली जाते, तेथे ती मिळण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. ऍ्श कमी पडत असल्याने राख विकत घेणा-या ब-याच संस्था महाजेनकोशी संपर्कात आहेत. कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथील राखेस मागणी आहे, कारण संबंधित व्यक्ती/संस्था यांच्याकडून राखेसाठी विचारणा सुरू झाली. त्यांनी सांगितले

की, ऍश मागणी असलेल्या क्षेत्रात संबंधित संस्था पुणे, मुंबई, नाशिक येथे रेल्वेने स्वखर्चाने नेते. पण महाजेनकोतर्फे काही मदत झाल्यास ते नक्कीच सुरु करु शकतो. महाजेनकोने याबाबत असे ठरविले की जी कोरडी ऍश आहे, ती उपलब्ध करण्यात यावी,त्यासाठी जी बंडला लागणार खर्च ऍश उचलणा-याना देण्यात यावा. त्यामुळे अनेक व्यक्ती/संस्था महाजेनकोच्या संपर्कात आहेत. महाजेनको निश्चितपणे सांगते की येत्या एक-दोन वर्षात कोरड्या राखेचे वापराचे प्रमाण निश्चितच वाढेल. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांनी दिलेले निर्देश (टारगेट) हे निश्चितपणे पूर्ण करु शकू.

२६) रोजगार - ज्यावेळी, ३ X ६६० प्रकल्प सुरु झाला, त्यावेळी प्रकल्पग्रस्त २,०५१ पैकी १९५२ प्रकल्पग्रस्तांना रोजगार दिलेला आहे. १९९९ मध्य उर्वरित लोकांना विद्यावेतन देण्यास सुरूवात केली व जसजशा जागा होतील, त्याप्रमाणे त्यांना सेवेत सामावून घेण्यात येईल. कंत्राटी कामगार म्हणून ३-४ हजार काम करत असतात. शासनाच्या नियमांप्रमाणे त्यांना वेतन देण्यात येते.

२७) येणा-या पॉवर प्लॅन्टमध्ये रोजगाराची संधि उपलब्ध आहे. तर त्याठिकाणी प्रकल्पबाधित लोकांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

२८) सीएसआर व सीईआर अंतर्गत वेगवेगळ्या गावात विविध कामे केलेली आहेत. पण नवीन पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशांनुसार ग्रामपंचायत कार्यालयाने जर विविध कामांची यादी सादर केली तर नियमांप्रमाणे ते पूर्ण करण्यात येतील. त्यानुसार निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे.

२९) गरे पालमाचा कोळसा खाजगी कंपनीचा आहे WCL चा न आणता खाजगी कंपनीचा घेण्यात येतो असा आक्षेप नोंदविण्यात आलेला होता. त्यांनी सांगितले की गरे पालमा ही आम्हांला अलॉट झालेली भारतातील एक मोठी खाण आहे. महानिर्मितीला समर्पित कोळसा उपलब्ध होणार आहे. ती कोणत्याही खाजगी कंपनीची नसून महाजेनकोची स्वतःची आहे. नियमानुसार थर्ड पार्टीला कोळसा काढून देणे एवढे काम दिलेले आहे. मालकी हक्क हा महाजेनकोचा आहे. पूर्ण क्षमतेने प्रकल्प चालविण्यासाठी लागणारा कोळसा पूर्णक्षमतेने अजूनही मिळत नाही. भविष्यात एखादे कोळशाच्या बाबतचे संकट उद्‌भवल्यास या खाणीमुळे आम्ही तो सोडवू शकतो.

३०) वृक्षारोपण करताना जिओ टॅगिंग करण्याच्या सूचनेचे स्वागत करत आहोत. भविष्यात टेंडर काढताना ही अटसुध्दा टाकता येईल.

३१) आजूबाजूच्या ज्या वस्त्या आहेत, त्यांना रोजगार द्यावा, त्याचप्रमाणे त्यांना मदत होईल या दृष्टिकोणातून महाजेनकोने पहावे. ३-४ हजार कामगार काम करत असून नवीन प्रकल्पासाठी तेवढेच लागतील. नवीन प्रकल्प सुरु झाल्यावर मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधि उपलब्ध होऊन स्थानिक लोकांनाच सामावून घेणार आहोत.

३२) एका एनजीओने तक्रार केली होती की महाजेनकोच्या राखेमुळे परिसरातील पिण्याचे पाण्याचे स्त्रोत, नदी नाले हे बाधित झालेले असून त्यात रेडिओ एकटीव्ह व हेवी मेटल्स ब-याच प्रमाणात आहेत. तेथील रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यानंतर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी संयुक्त पाहणी केली, त्यावेळी तक्रारदारांना बरोबर घेतलेले होते. तक्रारदार यांनी सांगितलेल्या जलस्त्रोताचे नमुने, परिसरातील विविध पिण्याचे पाण्याचे स्त्रोत, विहीरी इ. ची पाहणी करुन पाण्याचे नमुने गोळा करण्यात आले. ते एनएबीएल ने मंजूर केलेल्या प्रयोगशाळेत तपासण्यात आले. त्यात कुठेही हेवी मेटल्स व रेडिओ एक्टीव्ह आढळले नाही. त्याचप्रमाणे सर्व मानके ही निर्देशित पातळीत होती. त्याचप्रमाणे महाजेनकोने बीएआरसी कडून एक अहवाल प्राप्त केलेला होता. त्यातही सर्व मानके पाळण्यात येतात असाच अहवाल आहे. नविन प्रकल्प हा अत्याधुनिक असून त्यात प्रकल्पाबरोबरच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा, ESP. FGD असणार. भूसावळला असाच अत्याधुनिक प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. तरी नवीन प्रकल्पामुळे प्रदूषणाचा कोणताही त्रास होणार नाही याच ग्वाही देऊ शकतो. तसेच झोपडपट्टी व सुरक्षा भिंतीचा विषय हा समन्वयाने सोडविण्यात येईल.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थितांच्या सर्व सूचना, प्रश्न यांना महाजेनकोने समर्पक उत्तरे दिलेली आहेत.

<u>एवढ्या चर्चेत २-३ मुद्दे हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी संबंधित होते. समन्वयक यांनी सांगितले की -</u>

१) नदीच्या पात्रातील पिलर्स असण्याचा - तर त्याबाबत सर्वेक्षण करण्यात येईल व सद्यस्थिती तपासून त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, <u>(श्री प्रकाश जाधव माजी खासदार-रामटेक यांनी आक्षेप नोंदविला)</u>

२) श्री. सुधीर पालीवाल यांनी २-३ मुद्दे मांडले होते, त्यात एक मुद्दा होता की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वेबसाईटवर जनसुनावणीचे आदेश व ईआयए, ईएमपी रिपोर्टस नाहीत. तर तसे नाही. वेबसाईटवर प्रसारित करण्यात आलेले असून आतासुध्दा आहेत.

३) श्री. सुधीर पालीवाल यांचा दुसरा मुद्दा असा होता की, पॅनेल हे अधिसूचनेप्रमाणे गठित करण्यात आलेले नाही. संदर्भ त्यांनी दिला २००९ च्या अधिसूचनेचा. पॅनेल हे

२००६ च्या अधिसूचनेप्रमाणे गठीत करण्यात आलेले असून २००९ च्या अधिसूचनेत पॅनल गठित बाबत कुठलाही उल्लेख नाही.

४) श्री. सुधीर पालीवाल यांनी पुढील आक्षेप नोंदविला की, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांना प्रकल्पाचा सर्व दस्तावेज उपलब्ध करण्यात आलेला नाही. तर तसे नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी प्रकल्पाचा संपूर्ण दस्तावेज उपलब्ध केलेला होता व त्यांनी जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध केलेला आहे, याची खातरजमा करण्यात आलेली आहे.

५) श्री. सुधीर पालीवाल यांनी आक्षेप नोदविला की, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची जाहिर प्रसिध्दी करण्यात आलेली नाही. तर तसे नाही. २००६ च्या अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर एका स्थानिक वृतपत्रात दैनिक लोकमत मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यांत इंग्रजीत पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. तसेच दरदिवशी या प्रकल्पाविषयी बातम्या प्रसिध्द होत होत्या.

६) पुढील मुद्दा श्री. सुधीर पालीवाल यांनी ऑनलाईन जनसुनावणीबाबत उपस्थित केला. तर ऑनलाईन बैठक सर्वासमोर झाली. त्यात ६१ लोकांनी भाग घेतला व दोन व्यक्तींनी प्रश्न विचारले.

**येथे प्रत्यक्ष जनसुनावणीत एकूण ६१ व्यक्तींनी भाग घेतला व ऑनलाईन ०२ व्यक्तींनी प्रश्न विचारले.**

समन्वयक यांनी सांगितले की सर्वांना बोलण्याची संधि प्राप्त झाली. त्यांनी अध्यक्ष यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, दुपारी १२.३० वाजल्यापासून जनसुनावणी सुरु झाली. स्थानिकांनी, मान्यवरांनी येथे सूचना, विचार, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविले व नंतर प्रकल्प प्रवर्तक यांनी सर्व प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. येथे प्रकल्पाचे अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित आहेत येथील सर्व व्यवस्था प्रकलप प्रवर्तकांनी चांगली ठेवली. पोलिस प्रशासनानेदेखील चोख व्यवस्था केली. आम्ही सर्वांचे म्हणणे ऐकले. काही प्रकल्पाच्या बाजूने, तर काहींनी विरोध दर्शविला. त्याची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. बैठकीचे इतिवृत, प्राप्त झालेले लेखी आक्षेप व अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने

मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल. सर्वाचे आभार मानतो व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित करतो.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त सूचना, आक्षेप २१७ सोबत जोडले आहेत.

| | |
|---|---|
| (उमाशंकर भादुले)<br>समन्वयक<br>पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती<br>तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>नागपूर-१<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर | (अ.मा. करे)<br>सदस्य,<br>पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर |
| (डॉ. विपीन इटनकर, भाप्रसे)<br>अध्यक्ष,<br>पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती<br>तथा<br>जिल्हादंडाधिकारी, नागपूर,<br>जिल्हा - नागपूर | |